# रचना

महाराष्ट्र मंडळ शिकागो

MAHARASHTRA MANDAL CHICAGO

मार्गशीर्ष शके १९४३

डिसेंबर २०२१

# CHARLES RUTENBERG REALTY

*"The Standard of Excellence"*

Serving the Downtown Chicago Area & All Suburbs

*Please contact us for all of your real estate needs*

Sangeeta Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 728-4871
sangeeta_chavan@yahoo.com

Hemant Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 660-6231
hxchavan@yahoo.com

BUY

SELL

INVEST

RENT

***Free Market Evaluation of Your Property***

**Detailed Comparative Market Analysis to Buy or Sell Your Property**

+ Primary Home
+ Investment Properties
+ Rental Properties
+ Commercial Properties

**Home Staging & Extensive Network of Licensed Professionals**

+ Inspectors
+ Mortgage Brokers
+ Attorneys
+ Handyman

CHARLES RUTENBERG REALTY
"The Standard of Excellence"

OUR OFFICE

3135 Book Road
Naperville, IL 60564

# अनुक्रमणिका

अध्यक्षीय ........ 7
संपादकीय ........ 9
कार्यकारिणी ........ 10
MMC 2021 AMBASSADORS ........ 14
MMC 2021 LOGO ........ 15
दिवाळी २०२१ कार्यक्रम ........ 17
अध्यक्षीय चष्म्यातून ........ 18
आघात ........ 21
ऋणानुबंध ........ 22
अद्वैताचे गाणे ........ 31
आधी चार घास गिळून घ्या ........ 33
रचना ........ 43
असे व्हावे ........ 46
तिला काय xxx कळतंय ! ........ 47
Dear Diary ........ 52
दोन बाळांची बारशी ........ 54
मराठी सिनेमा ........ 61
स्पंदन ........ 64
सहवास ........ 65
शब्द ........ 72
शब्दकोडे ........ 73
दैनंदिन मराठी शब्दप्रयोग कोडे ........ 75
'इतिहास मंच'च्या निमित्ताने ........ 77

गेला कूपर कुणीकडे? .......... 78
जीव .......... 81
माशाची कोशिंबीर / कळपुटी .......... 82
Thai Red Curry Noodle Soup .......... 84
Team Admins .......... 86
अश्शी कश्शी कॅथरिन... .......... 94
गोकुळ .......... 95
Life .......... 98
वाट पाहतो मी .......... 105
दोन शोकांतिका .......... 106
My Own Chicago .......... 109
या चिमण्यांनो .......... 110
धिनक धिन धा .......... 112
मूगलेट .......... 120
मुद्दा भाजी .......... 122
Staying Healthy in winter with Ayurveda .......... 124
देव याहुनी काय वेगळा? .......... 127
शब्दकोडे – उत्तर .......... 133
दैनंदिन मराठी शब्दप्रयोग कोडे – उत्तर .......... 134
रहे ना रहे हम .......... 135

Maharashtra Mandal Chicago Inc.
(Year of Establishment: 1969)
The first Maharashtra Mandal in United States of America, serving the community as non-profit organization

Website:
https://www.mahamandalchicago.org

Email Address for correspondence:
president@mahamandalchicago.org
secretary@mahamandalchicago.org
karyakarini@mahamandalchicago.org

मांडणी आणि संकलन सहाय्य:

- आशिष नगरकर
- मिलिंद साळी

मुखपृष्ठ:

- अमृता जोशी

मुद्रित शोधन:

- डॉ. सुजाता महाजन
- अंजली चाफेकर

महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी:
It is the first Maharashtra Mandal in the United States of America, serving local community as a non-profit organization, since 1969
It is the proud founder of (BMM) Bruhan Maharashtra Mandal, North America (http://www.bmmonline.org)

It is also initiator of BMM Newsletter – BMM Vrutant
(https://bmmonline.org/vrutta-archive)

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी संपर्क:

rachana@mahamandalchicago.org

rashmichafekar@gmail.com

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी सूचना:

- साहित्य लिहिताना मराठी फॉन्ट (उदा. मंगल - Mangal) आणि आकार १० असावा.
- लिखाणात क्रमांक वापरल्यास ते मराठीत लिहावेत (उदा. १..२५ इ.)
- अखेरीस आपले संपूर्ण नाव नमूद करावे.
- आपले साहित्य 'मायक्रोसॉफ्ट वर्ड' किंवा 'गूगल डॉक' मध्ये लिहून पाठवावे.
- साहित्य वरील ईमेल वरतीच पाठवावे.
- ईमेल पाठवताना साहित्य अटॅचमेंट स्वरूपात पाठवणे.
- सोबत आपला फोटो पाठवावा.

# अध्यक्षीय

प्रिय वाचक हो,
नमस्कार.

दीपावलीचा मंगलमय सण नुकताच पार पडला. कोरोना काळातील विजनवासाच्या पार्श्वभूमीवर डोळे पुसून, उत्साहाने सण साजरा करायला आपण परत उभे राहिलो, घराघरात नक्षत्रांच्या ज्योती पुन्हा तेवू लागल्या, पुन्हा जगण्याची नवी उभारी आली.

याच पार्श्वभूमीवर सर्वांना एकत्र आणणाऱ्या 'धिनक धिन धा' या १२५ स्थानिक शिकागोवासियांनी अपार कष्ट घेऊन साजऱ्या केलेल्या कार्यक्रमाचा आनंदही आपण सर्वांनी लुटला. या कार्यक्रमाची कल्पनाच मुळात सुंदर होती, अनेक प्रसिद्ध गाणी आपण नेहमी ऐकत असतो, पण हे भारूड आहे, ही भूपाळी आहे, हा जोगवा आहे, असे त्या साहित्यप्रकाराकडे आपले सहसा लक्ष नसते. या कार्यक्रमात मराठीतल्या प्रसिद्ध गाण्यांची एक साहित्यप्रकार म्हणून नव्याने ओळख करून दिली होती. 'महाराष्ट्र मंडळ, शिकागो'ने सादर केलेल्या या सुंदर संकल्पनेला स्थानिक मराठीप्रेमी रसिकांनी भरभरून दाद दिली, हे सांगायला नकोच.

कोरोना काळात महाराष्ट्र मंडळाने विविध उपक्रमांमध्ये लोकांचे लक्ष गुंतवून ठेवले आणि कोरोनाच्या जीवघेण्या संकटाचा सतत विचार करण्यापासून त्यांना दूर ठेवले. इतिहासप्रेमींना 'इतिहासमंचा'वर भरपूर बौद्धिक खाद्य मिळले, साहित्यप्रेमी 'साहित्यकट्ट्या'वर साहित्यास्वादाच्या नवविध रसांत बुडून गेले, तर अध्यात्मप्रेमींना 'अध्यात्मपीठा'ने संतचरित्रात, नामजप संकीर्तनात, भक्तिरसात न्हाऊ घातले, प्रत्येक वयोगटातल्या प्रत्येक माणसासाठी काही न काही आवडीचे होतेच, युवा टीमने युवकांना अधिक समाजाभिमुख केले. वर्षानुवर्ष उत्तम पाककृती करणाऱ्या गृहिणींच्या पाककौशल्याचं 'अंगत पंगत'सारख्या कार्यक्रमातून कौतुक झालं. नृत्य, संगीत, नाट्य, साहित्य, सजावट अशी असंख्य क्षेत्रे, एक मोठे संघटनेचे जाळे लोकांच्या कल्याणासाठी, मनोरंजनासाठी, विधायक वातावरणासाठी वर्षभर मुंग्यासारखे अथक काम करत राहिले.

जे जे उपक्रम उत्साहाने सुरू केले, त्यांची मुळं भक्कम व्हावीत, आणि विधायक विचारांचा हा वृक्ष इथल्या जमिनीत रुजावा, फुलावा, फळावा, त्याने शिकागोवासी मराठी माणसांवर छाया धरावी, याच हेतूने महाराष्ट्र मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणीने पुन्हा निवडणुकीला उभं राहण्याचा निर्णय घेतला. आमच्या या निर्णयाला इथल्या मराठी लोकांनी पूर्ण प्रतिसाद दिल्याने आम्ही पुन्हा सज्ज झालो आहोत, आणखी नवनव्या विधायक कल्पनांसह! तुमच्या प्रेमळ प्रतिसादाच्या प्रतीक्षेत!

भेटू या लवकरच. आगामी वर्षाच्या उदंड शुभेच्छा!

आपली,

उल्का नगरकर

अध्यक्ष,

महाराष्ट्र मंडळ, शिकागो २०२१ आणि २०२२

# संपादकीय

चौथा अंक? विश्वासच बसत नाहीये. दिवस इतके पटापट पुढे सरकले की चौथा अंक तुमच्यासमोर ठेवण्याची वेळ कधी येऊन ठेपली ते कळलंच नाही. तर ह्या वर्षीचा हा शेवटचा अंक!

मला खरंच कधी वाटलं नव्हतं, की माझं नाव कधी कुठल्या मासिकाच्या,‘ संपादक’ ह्या पदाशी जोडलं जाईल. पण, महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा, उल्का नगरकर, ह्यांनी ही माझ्यावर जबाबदारी टाकली आणि हे काम मी करू शकेन हा विश्वास दाखवला, त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद!

ह्या गेल्या वर्षभरात, ‘रचना’ चे चार अंक करत असताना, मी खूप काही शिकले आणि माझ्या ह्या शिक्षणात महत्त्वाचा वाटा उचलणारे माझे शिक्षक, हे माझे सहकारीच होते. सुजाता महाजन, उल्का नगरकर, आशिष नगरकर, अंजली चाफेकर, अमृता जोशी, मिलिंद साळी ह्या प्रत्येकाकडूनच शिकण्यासारखं खूप काही आहे आणि ते मी शिकायचा प्रयत्न केला आहे. ह्या सर्वांच्या मदतीशिवाय ‘रचना’ची जबाबदारी पेलणं मला शक्य झालं नसतं. तर ह्या सर्वांचेही मनापासून आभार.

‘रचना’च्या ह्या वर्षीच्या चारही अंकामध्ये तुमचं सर्वांचं सहकार्य हे तर अतिशय मोलाचं होतं ह्यात शंकाच नाही. तुम्ही दिलेल्या सर्व प्रकारच्या लिखाणामुळे ‘रचना’ला आकार आला आणि त्यामुळेच ह्या वर्षी ‘रचना’ चे विक्रमी अंक आपण प्रसिद्ध करू शकलो. त्याकरता मी नेहमीच तुम्हा सर्वांची ऋणी राहीन.

तुमचा हाच पाठिंबा, २०२२ मध्येही आम्हाला मिळेल ह्याची मला खात्री आहे.

चला तर मग, पुढच्या वर्षी भेटूया.

लोभ आहेच तो वाढावा,

रश्मी चाफेकर
संपादक, ‘रचना’

# कार्यकारिणी

**President: Ulka Nagarkar**
President@mahamandalchicago.org

Chicagoland resident for 15 years. Volunteered for BMM 2011 NAPC committee, Rachana editor in year 2015, 2020, Smarnika lead in GJC 2019. Enjoys coordinating community enrichment efforts. Looking forward to a memorable and exciting year ahead. Let's all work together for the betterment of our community.

**Vice President: Prasad Athanikar**
karyakarini@mahamandalchicago.org

Chicagoland resident for over 14 years. Volunteered for Maharashtra/Marathi Mandals in USA over the past several years while leading sports and Lezim teams in MMC. Look forward to working with the 2021 team and bringing together the community for high quality programs and events.

**Vice President: Rashmi Chafekar**
karyakarini@mahamandalchicago.org

Chicagoland resident for over 28 years. Has participated in various programs over the years. Have written articles for Rachana. Loves to write and listen to music.

**Treasurer: Abhijit Rayarikar**
mmctreasurer@mahamandalchicago.org

Naperville based IT professional involved with Maharashtra Mandal activities for over 15 years. Regularly writes in Rachana and likes music, travel and hiking.

**Secretary: Priya Patankar**
karyakarini@mahamandalchicago.org

Chicagoland resident for 20+ years. I have been a member for last 15 years and have actively volunteered in recent years. I have been part of dance team for couple of years. I love to write poems, non-fiction, cook and am a traveler at heart.

# कार्यकारिणी

**Board of Director: Vaibhav Shringarpure**
karyakarini@mahamandalchicago.org

Chicagoland resident for over 25 years associated with Maharashtra mandal as member and volunteer in GJC. Looking forward to working with the team and help finance and marketing functions.

**Board of Director: Swati Pawar**
karyakarini@mahamandalchicago.org

Chicago resident for 25 years. Volunteered for BMM 2011 food team. Actively involved in Chicago Maharashtra Mandal since 2012. Like to work for our community. Looking forward to a wonderful and fun filled MMC 2021.

**Board of Director: Sanjeev Kulkarni**
karyakarini@mahamandalchicago.org

Resident of Chicago land for last 7 years and actively participating and supporting skits as part of programs in MMC. Excited and looking forward to support our MMC in 2021 to make our community stronger and grow in and around Chicago!

**Board of Director: Kashmira Magar**
karyakarini@mahamandalchicago.org

Chicagoland resident for 20 years. I have been associated with Maharashtra Mandal Chicago for 18 years. I enjoy music, art and architecture. I am excited to lead decoration/ youth team to contribute to the execution of MMC 2021 vision.

**Board of Director: Bharati Velankar**
karyakarini@mahamandalchicago.org

I am living in Chicagoland area since 2009 and have been associated with Maharashtra Mandal since 2009. I was a Dietitian by profession in India and now in the field of Health Information Technology. Traveling, reading, listening to music and cooking are my hobbies.

# कार्यकारिणी

**Board of Director: Deepali Sawant**

karyakarini@mahamandalchicago.org

Resident of the Chicagoland area for 22 years. Involved in MMC dance team since last 5 years. Looking forward to bringing the community together by organizing local festivals.

**Board of Director: Saurabh Neklikar**

karyakarini@mahamandalchicago.org

Chicagoland residence of 15+ years, Data Science Professional. Active MMC Karyakarini member for last 15 years. Actively involved in theater activities through Basement Theater. Looking forward to working with 2021 MMC team to bring high quality programs.

**Advisor: Ashok Lele**

karyakarini@mahamandalchicago.org

A Chicagoland resident for the last 46 years. Joined MMC Organization in 1975 and was involved in MMC until 1999. Worked as MMC Vice President IN 1981. President of MMC in 1986. Coordinated and presented Marathi Play "Ghashiram Kotwal". Worked as MMC Treasurer In 1988. Worked as a Treasurer for 3 Natya Mahostav arranged and organized by MMC. Worked as active member of Finance Team for BMM Convention in 2011. Active member of MMC GJC Registration Team in 2019. Looking forward to working with MMC 2021 EC Team as Advisor to achieve a very successful year for the MMC community.



**Advisor: Dr. Suresh Talathi**

karyakarini@mahamandalchicago.org

I was associated with MMC as committee Member, Treasurer, President and Trustee and enjoyed the work. Also associated with Maharashtra Foundation, the organization that people have enriched and through it about 40 million has been donated by people (Mostly Marathi to social causes of choice in past thirty years. Totally rewarding experience.

Ashish Nagarkar

Varsha Visal

Pankaj Akolkar

Vaishali Raje

Sameer Sawant

**MMC Trustees**

**BMM President**
Vidya Joshi

**BMM Trustee**
Niteen Joshi

**Chicago Marathi Vidyamandir – Shala Coordinator**
Sulakshana Kulkarni

**MMC Investment Advisor**
Sandeep Bag

**MMC Investment Advisor**
Milind Jogalekar

**MMC Investment Advisor**
Sandeep Raje

# MMC 2021 AMBASSADORS

Abhijit Rayarikar
Aditi Raut
Amita Bhalerao
Amol Shripal
Amruta Joshi
Anagha Shah
Aniket Sawant
Aniruddha Damle
Anjali Chafekar
Arati Khot
Archana Shripal
Ashish Nagarkar
Ashwini Kunte
Avani Deshpande
Bharati Velankar
Chetan Rege
Deepa Bhimanwar
Deepa Kamath
Dr. Sujata Mahajan
Dr. Suresh Talathi
Girish Patankar
Hema Sakhardande
Kalpana Neklikar
Kashmira Magar
Kavita Kulkarni
Kavita Purav
Ketki Deshpande
Leena Vaidya

Madhav Gogawale
Manasi Thatte
Manik Gosavi
Manisha Kulkarni
Manisha Ogle
Milind Sali
Mitesh Deshpande
Monica Patankar
Nameeta Vedak
Narasimha Kamat
Nayana Patankar
Nilesh Joshi
Niteen Joshi
Pallavi Betsur
Pallavi Date
Parth Deshpande
Prasad Athanikar
Prisha Athanikar
Priya Patankar
Priyanka Parekh
Rajesh Hatkar
Rashmi Chafekar
Sadanand Joshi
Saloni Nagarkar
Sameer Bongale
Sanjeev Kulkarni
Sara Bongale
Saurabh Neklikar

Savni Nagarkar
Shalaka Palkar Rege
Shipra Athanikar
Shree Chafekar
Shruti Kulkarni
Shweta Joshi Kulkarni
Snehal Vadvalkar
Sucheta Akolkar
Sujit Kulkarni
Swati Kukian
Swati Lakhe
Swati Pawar
Swati Vaze
Tejaswini Joshi
Trupti Kale
Ujwala Umarikar
Ulka Nagarkar
Urmila Damle
Usha Shedge
Vaibhav Shringarpure
Vaishali Belsare
Vallary Bhopatkar
Varsha Visal
Vidya Joshi
Vidya Shinde
Vikas Tarade
Vishal Kale
Vishal Navalkar

# MMC 2021 LOGO

# SPONSOR WALL

We wish to thank following people who have purchased Sponsorship Packages for 2021.

Pearl Moti:

- Sameer Bongale
- Hemlata Limaye
- Ashish Vaidya
- Nikhil Javeri

Ruby Manik

- Shilpa Deshpande
- Gauri Kulkarni

Life

- Chetan Rege

Life Emerald Pachu

- Nitin Joshi

Life Diamond Hira:

- Vidya Joshi
- Vaibhav Shringarpure
- Sanjay Savkur
- Ulka Nagarkar
- Abhijit Rayarikar
- Mandar Dewoolkar
- Pankaj Akolkar
- Ramesh Rathor
- Shridhar Damle
- Vrinda Pandav
- Urmila Date
- Shreedutt Raut
- Sanjesh Chaudhary

Donars:

- Laxminarayan Mahisekar
- Ujwala Pradhan
- Usha Shedge
- Amruta Joshi
- Runali Patil
- Aditi Raut
- Abhijit Londhe
- Ujwala Umrikar
- Chicago Kali Bari
- Abhijit Rayarikar
- Vaibhav Shringarpure
- Girish Patankar
- Ulka & Ashish Nagarkar
- Ravi & Vidya Joshi
- Dr. Prabhakar & Savita Joshi
- Deepa & Narasimha Kamat
- Dr. Maruti Bhorade

# दिवाळी २०२१ कार्यक्रम

# अध्यक्षीय चष्म्यातून

नमस्कार मंडळी,

*मेघ दाटले कोठून नकळे मनभर आल्या धारा*
*उत्कट ओल्या आठवणींचा झरे अनावर पारा*
*दिन जे गेले, त्यांचे झाले गहनगूढ आभाळ*
*बगळे होऊन झुलू लागली शुभ्र क्षणांची माळ...*

अध्यक्षीय चष्म्यातून हा २०२१ चा दिवाळीचा लेख लिहायला घेतला आणि बाहेर सुरू असलेल्या पाऊसधारा गेल्या काही महिन्यांतल्या अनेक आठवणी घेऊन आल्या. बघता बघता वर्ष संपत आलेय. कोव्हिडच्या विळख्यातूनही जग हळूहळू बाहेर पडायला लागलंय. मोकळया हवेत, मोकळ्या आकाशाखाली जगण्याचे उत्सवी रंग पुन्हा एकदा खुणावू लागले आहेत आणि 'लाइफ इज ब्यूटीफूल' अशी ग्वाही देऊ लागले आहेत.

या उत्सवाचाच एक रंग म्हणजे 'अटलांटिक सिटी, न्यू जर्सी' येथे १० ते १४ ऑगस्ट २०२२ रोजी होऊ घातलेले आपले BMM अधिवेशन. अटलांटिक सिटी, न्यू जर्सीतील 'कसिनोचे शहर' म्हणून ओळखले जाणारे हे शहर वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण अशा रिसॉर्टससाठी सुद्धा प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे अथांग असा समुद्र आणि बोर्डवॉक ही याची वैशिष्टये, हे काही सांगणे नकोच!! असं हे धमाल शहर म्हणजे अमेरिकेतला महत्त्वाचा टुरिस्ट स्पॉट आहे. शहराची उत्साही हवा अंगावर घेतच आम्ही पोहोचलो, ते आपल्या नियोजित कन्व्हेंशन सेंटरला. भव्य तीन मजली इमारत, २५-३० खोल्या आणि एकाच वेळी ६००० लोक मावतील एवढी व्याप्ती असलेलं हे कन्व्हेंशन सेंटर. पाहता क्षणी लक्ष वेधून घेणारी अप्रतिम बांधणी व सर्व सोयींनी सुसज्ज असलेले हे ठिकाण अधिवेशनाचा अविस्मरणीय अनुभव देईल यात शंकाच नाही. येथून जवळच ट्रॉपिकाना, सीझर, हरा अशी अद्ययावत हॉटेल आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण थीम्सनी आपल्याला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. कन्व्हेंशन सेंटरपासून या हॉटेल्सपर्यंत नेणाऱ्या जिटनी (Jitney) या छोट्या बसेसही आहेत. आज ही सगळी हॉटेल्स जवळपास पूर्ण भरलेली, गजबजलेली दिसली. याचाच अर्थ करोनाची भीती आता बरीच कमी झाली आहे हे नक्की.

पण मंडळी नुसतं ठिकाण प्रेक्षणीय असून काही उपयोग नाही. यजमानही तितकेच उत्साही आणि अगत्यशील असावे लागतात. मला सांगायला आनंद वाटतो, की अत्यंत उत्साही, कल्पक, येणाऱ्या पाहुण्यांसाठी अजून काय नवीन करता येईल याचा सतत विचार

करून त्यासाठी झटणारे असे आपले आयोजक आणि कार्यकर्ते आहेत. त्यांची तयारी पाहून अधिवेशनची उत्सुकता आणि अधीरता शिगेला पोहोचली आहे. अहो, आपल्या घरचंच कार्य हे. तर ही लगीनघाई जोरात सुरू झालीय बरं का आता! हॉटेलचे करार, अधिवेशन स्थळाची अनामत रक्कम, हे सगळं ठरवून तयार आहेत. सेलिब्रिटी शेफही नक्की केले आहेत. BMM च्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडत आहे. आपले आवडते सुप्रसिद्ध कलाकार आणि अनेक अभिनव उपक्रम यांची रेलचेल असणार आहे. तर मंडळी लवकरात लवकर https://bmm2022.org/donation/ या लिंकवर जाऊन आपले देणगी प्रवेश निश्चित करा नाहीतर नंतर मागची खुर्ची मिळाली म्हणून खंत करत बसावे लागेल. त्याचप्रमाणे लवकरात लवकर झालेली आपली प्रवेशनिश्चिती सर्वांगसुंदर आयोजनाच्या दृष्टीनेही आमच्या साठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेच. आपल्या अधिवेशनाविषयी अधिक माहिती पुढील लिंकवर जाऊन तुम्ही केव्हाही पाहू/वाचू शकता.

आपली वेबसाइट: https://bmm2022.org/

फेसबूक : https://facebook.com/bmm2022nj/

आपल्या कुटुंबीय आणि मित्रमंडळींसोबत अधिवेशनाचा हा अद्वितीय अनुभव घ्यायला जरूर या. आपल्या मराठी भाषेच्या या उत्सवाला आपण सगळे मिळून अविस्मरणीय बनवू या. चला एक नवा इतिहास घडवू या!!

बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या एकाहून एक उत्तम रंगारंग कार्यक्रमाची तयारीही नेहमीप्रमाणेच धडाक्यात सुरू आहे. ’ताल से ताल मिला’ म्हणत BMM चे ‘कराओके’ मंडळ गाण्यात रंगून गेलेले आहे. मानसिक आरोग्यासाठी सुरू असलेल्या मालिकेत योगा, रेकी, आयुर्वेद, होमिओपॅथी, प्राणिक healing या विषयांवरील व्याख्यान सत्रे यशस्वीपणे पार पडली आहेत. त्याचप्रमाणे ‘उत्तररंग’, ‘युवा’ या सत्रांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. `लेखक तुमच्या भेटीला’ हा आपल्या भोवतालच्या नवनवीन लेखकांची व त्यांच्या साहित्याची मुलाखतीतून ओळख करून देणारा उपक्रमही चांगलाच लोकप्रिय ठरणार आहे. साहित्यप्रेमी ह्या भेटीची नेहमीच उत्सुकतेने वाट बघत असतात.

मंडळी, कोव्हिड काळातही आपल्या मराठी शाळेचे ज्ञानदानाचे कार्य ऑनलाइन माध्यमातून अखंड चालू ठेवले होते. आनंदाची गोष्ट म्हणजे या काळातही मराठी शाळेच्या विद्यार्थी संख्येत झालेली वाढ लक्षणीय आहे.

आपल्या ‘रेशीमगाठी’ संकेतस्थळावरही २०० च्या अधिक इच्छुक वर-वधूंची नोंदणी झाली आहे बरं का! आता लवकरच या लग्नेच्छुक वधू वरांचा मेळावा आयोजित करण्याची योजना आहे. तुमच्याही घरी लग्नाळु मुले मुली असतील तर https://reshimgathee.bmmonline.org/ या वेबसाइट जरूर नावनोंदणी करा. एवढेच नाही तर शिकागोला ११ डिसेंबर रोजी पहिली वधू-वर meet up होणार आहे आणि त्यासाठी ५० हून अधिक लोकांनी नाव नोंदवले आहे.

BMM चे जागतिकीकरण आणि `Proud to be a BMM member’ हे दोन उपक्रम सुरू झालेत आणि आमची खात्री आहे, की बाकी सगळ्या उपक्रमांना जसा तुम्ही जोरदार प्रतिसाद आणि पाठिंबा दिलात तसा यांनाही द्याल.

कोव्हिडच्या कठीण काळात सामाजिक भान जागृत ठेवत BMM ने सुरू केलेल्या कोव्हिड हेल्पलाईनचा लाभही अनेकांना घेता आला, याचेही आम्हाला खूप समाधान वाटते.

बृहन् महाराष्ट्र मंडळाचा एक नित्यक्रम म्हणजे बृहन् महाराष्ट्र मंडळाचे दर महिन्याला प्रकाशित होणारे वृत्त. सर्वजण या वृत्ताची आतुरतेने वाट बघत असतात. दिवाळीत आपण बृहन् महाराष्ट्र वृत्ताचा दिवाळी विशेषांक प्रदर्शित करणार आहोत.

खरोखर आजवरच्या BMM च्या कामगिरीचा हा आढावा घेताना मन अतिशय समाधानी आहे. परंतु याच टप्प्यावर अल्लमा इक्बाल यांचा शेर कायम आठवतो,

‘सितारों के आगे जहां और भी है। अभी इश्क के इम्तिहां और भी है।‘

तेव्हा थांबून कसं चालेल? आपण वाटचाल करत राहायची. या पुढच्या टप्प्यावरही आपला सहभाग आणि प्रतिसाद असाच राहिला तर आपली मराठी खऱ्या अर्थाने ‘विश्वात्मक’ होण्याचा दिवस दूर नाही हे निश्चित!

आपली नम्र,
बृहन्महाराष्ट्र मंडळ अध्यक्षा
विद्या जोशी
vidya.joshi@bmmonline.org

# आघात

आघात उच्चारता
मनाचा थरकाप होतो
जीव गोठतो
आठवणींनी

प्रसंग तैसाच
सुन्न होई मन
विचार करून
राष्ट्राचा

मोठे नेतृत्व
अपघाती जळून गेले
होरपळून मेले
देशरक्षक

मुलेबाळे संसार
त्यांचे दुःख अपार
तरुण जीवनाधार
नाहीसे

दोष कोणाचा
शोधून काय कामाचा
गेलेला कायमचा
दूर

मनावरचा आघात
काळ सुसह्य करतो
सहन करण्या शिकवतो
लढायला

नीला जोशी

(भारतीय संरक्षण दलाचे प्रमुख बिपिन रावत यांचे नुकतेच हेलिकॉप्टर दुर्घटनेत दुःखद निधन झाले, त्यांना या कवितेतून कवयित्रीने श्रद्धांजली वाहिली आहे)

# ऋणानुबंध

ललिता ऑफिसच्या इमारतीबाहेर पडताच गारठल्या हवेची चपराक तिच्या चेहऱ्यावर बसल्यासारखी झाली. तिने कानटोपी अजूनच खाली डोळ्यांपर्यंत ओढून घेतली. चार वाजताच अंधारून आल्यासारखं झालं होतं. ऑफिसच्या पार्किंग लॉटभोवती खूपशी मेपलची झाडं होती. अगदी महिन्याभरापूर्वीच कशी रंगांची उधळण होती इथे! जणू एखाद्या चित्रात उतरल्यासारखं वाटायचं बाहेर पडल्यावर. आता सगळी पानं झडून गेली आहेत. नुसत्या काळसर काड्यांसारख्या फांद्या. उलट्या खराट्यासारख्या!

गाडी चालवता चालवता सवयीप्रमाणे तिचं घरी गेल्यावर काय स्वयंपाक करायचा याचं प्लॅनिंग सुरू झालं. तेवढ्यात तिला लक्षात आलं, की महेश आणि आयुष तर आता घरी नाहीत, भारतात गेले आहेत. मग सरळ सरळ सूप किंवा सॅलड करायचा बेत केला. सोप्पं सुटसुटीत. आता दोघांचाही जेटलॅग गेला असेल आणि आयुष आज्जीच्या प्रेमळ पाहुणचारात रमला असेल. त्याला अजूनही चुलत मावस भावंडं आणि आज्जी आजोबांची ओढ आहे याच तिला समाधान वाटलं. दरवर्षी किंवा अगदीच जमलं नाही तर वर्षाआड त्यांची भारतवारी चुकत नसे. आपण आता त्यांच्याबरोबर तिथे नाही आहोत याची तिला खूप खंत वाटली. या दोन वर्षात या pandemic मुळे काही जाता आलं नाही त्यामुळे ते तिघंही खूप कंटाळले होते.

यावेळी जाऊयातच म्हणून महेशने सुट्टी टाकली. आयुषची शाळा एखादा आठवडा बुडत होती पण त्याने सुद्धा परवानगी काढून आणून उत्साह दाखवला. पुढच्या वर्षी एकदा हायस्कूलला गेला, की जमेल की नाही म्हणून. त्यात आजोबांची सत्तरावी आली होती, काहीतरी पार्टी करावी असं घाटत होतं महेशच्या मनात.

त्यामुळे यावर्षी जाऊन यायचं ठरलंच. ललिता उत्साहाने खरेदी करायला लागली. एक दीड वर्ष असं  घरात कोंडून राहिल्यासारखं गेलं त्यामुळे कधी एकदा घरी जाऊन सगळ्यांना भेटतो असं झालं. पण ऐनवेळी पासपोर्ट काही renew होऊन आलाच नाही. प्रोजेक्ट्समध्ये सुद्धा अचानक काही फेरफार झाले आणि तिला मागे राहणं भाग पडलं... तेवढ्यात सिग्नलला लाल दिवा लागल्याने ती अचानक विचारचक्रातून बाहेर पडली. तिचा नेहमीचाच येण्याजाण्याचा रस्ता, पण अचानक एकदम अनोळखी भासला. तिने रस्त्याचं नाव पाट्यांवर पाहून पुन्हा खात्री करून घेतली. असंच होतं कधीकधी. अचानक कुठेतरी दूर अनोळखी ठिकाणी रस्ता चुकलो आहे असं वाटून मन धास्तावतंच उगाचच. खरं तर त्याच सरधोपट मार्गावर असतो अंगवळणी पडल्यामुळे. ऋतु बदलला, की नकळत डोळ्यांना ज्या ओळखीच्या

खुणांची सवय झाली असते त्यासुद्धा बदलल्यासारख्या वाटतात. आतासुद्धा ज्या झाडांनी त्या मागच्या घरांना आडोसा करून लपवलं होतं ती आता सरळ दिसत होती. त्यामुळे झाला असेल कदाचित असा गोंधळ, ललिताने मनाची समजून घातली. घरी येऊन थोडं फ्रेश होऊन बसेपर्यंत ऑड्रीचा फोन आला. "Hi Audrey, how are you feeling now?"

"All good! Will work from home tomorrow, just wanted to let you know!"

ललिताने न रहावून विचारलं, "How did the appointment go?"

"Ultrasound looks good, the baby is doing fine!"

चला, सगळं ठीक आहे तर. ललिताचा जीव भांड्यात पडला. ऑड्री काही महिन्यांपूर्वीच नवीन रुजू झाली होती. नुकतीच graduate झालेली ऑड्री खूप मन लावून काम करत असे. तिचं हे तसं पहिलंच काम. अनुभव तसा नाहीच. तिला ललिताने आपल्या पंखाखाली घेतलं म्हणा ना. हळू हळू त्यांचं सख्य जुळत गेलं.

त्यानंतर पुन्हा गप्पा सुरू झाल्या. एकमेकींच्या तब्येतीची चौकशी, ऑफिसचं पॉलिटिक्स, काम, लास्ट-मिनिट ख्रिसमस शॉपिंगची चौकशी, त्यावरून आठवलेल्या वेगवेगळ्या पाककृतींची देवाणघेवाण, घरच्यांची विचारपूस आणि पुन्हा तब्येतीची चौकशी असं वर्तुळ पूर्ण करून गेली.

अशा मनसोक्त गप्पा झाल्याच्या समाधानात ललिताने भराभर काम उरकली आणि उद्या संध्याकाळी तिच्या घरी जाऊन भेटून यायचं ठरवलं. जाताना तिच्या आवडीचा फ्राईड राईस घेऊन जायचं ठरवलं.

जेवण झाल्यावर तिने व्हिडिओ कॉल केला. सगळे जवळचे नातेवाईक महेशला भेटायला म्हणून आलेले. सगळ्यांच्या चौकश्या झाल्या. भारतात राहत असताना किती धम्माल करायचे सगळे मिळून. पण आता हळू हळू त्यांची विश्वं आणि ललिताचं विश्व वेगळी होत गेली आणि नकळत जाणवेल न जाणवेल असा अलिप्तपणा येत गेला. जणू तिथे घट्ट रुजलेली मुळं सैलावत जात आहेत. तिला त्याची खंत वाटायची पण हे अपरिहार्यच. सगळे अंगणात पायऱ्यांवर, बंगईवर चहा नाश्ता घेत गप्पा मारत निवांत बसले होते. लखलखीत सूर्यप्रकाश होता. सगळे हास्य-विनोदामध्ये गुंग. आजच्या इथल्या थंड काळोखल्या वातावरणातला विरोधाभास जास्तच ठळक करून जाणारं. तिचं सगळं मन तिकडेच अडकलं. तिला एकटं वाटलं एकदम. पुन्हा एकदा तिथे जाता आलं नाही याची खंत तीव्र झाली. आयुष

सुद्धा एक दोन वाक्य काय तो बोलला आणि खेळायला पळाला सुद्धा. अगदी एक दोन वर्षांपूर्वीच किती मॉम-मॉम करत मागे मागे असायचा आयुष! कसले कसले विज्ञानाचे प्रयोग किंवा मॉडेल्स करायची ती दोघं. शाळेत काय घडलं याच वार्तापत्र असायचं रोज. पण आता मोठा झाला! टीनएजर! घरी आला, की बाहेर काही ना काही प्लॅन ठरलेले असतातच आणि घरी असलाच तर आपल्या रूममध्ये. हे असंच व्हायला पाहिजे. वयानुसार हे असंच घडणार पण ललिताला मात्र चुकल्याचुकल्या सारखं वाटायचं. ताईची आणि माहीची मात्र आता किती छान मैत्री होते आहे ना? ललिताला जाणवलं. मायलेकी दोघी काय काय प्लॅन करतात. शॉपिंग करतात, मेकअप करून बघतात. आयुषपेक्षा चार पाच वर्षंच मोठी असेल माही. घरी आली, की लिली मावशी म्हणत चिमणीसारखी मागे राहायची. माहीने ठेवलेलं 'लिली' हेच नाव आता इथे रूढ झालं. तशी इथे त्याचं 'लालिडा', 'लॉलिटा' असं केलं जायचं त्यापेक्षा 'लिली' बरं.

दुसऱ्या दिवशी ती ऑड्रीच्या घरी डिनर घेऊन गेली. तिनंही नेहमीच्या उत्साहानं मिठी देऊन स्वागत केलं. गेल्या काही महिन्यांत त्यांच्यात घट्ट मैत्री झाली होती म्हणा ना. ललिताने आपल्या घरी तिचं बेबी शॉवर पण केलं. तीच तेवढी वेगळी होती त्यांच्यात. पण ऑड्रीनी तसं जाणवू दिलं नाही. ऑड्रीचे आई-बाबा, इतर मैत्रिणी, जॉशची आई आणि इतर नातेवाईक सगळेजण होते. ऑड्रीच्या मैत्रिणीनं गेम्स वगैरे ठेवले होते. धम्माल आली. तेव्हापासून तिच्या घरच्यांशी पण ओळख झाली. अमेरिकेत येऊन १७-१८ वर्ष लोटली पण कोणाशी पक्की मैत्री नाही झाली. इथल्या अभारतीय  मैत्रिणी झाल्या, त्यांच्याशी गप्पा व्हायच्या, कुठे बाहेर एखादवेळेला मूव्ही, लंच किंवा इव्हेंटला एकत्र जात असू पण ते तेवढ्यापुरतंच. पुढे जाऊन मैत्री वाढली नाही थोडं अलिप्तच वाटायचं. आणि त्याचं काही विशेष पण वाटलं नाही. ललिताला सुद्धा आपल्याबद्दल, संस्कृती, पद्धती, देशाबद्दल फार काही सगळ्यांना सांगावं वाटत नसे. तिला वाटायचं, हे सगळं त्यांना फार वेगळं exotic वाटेल. आणि त्यामुळे जी काही जुजबी मैत्री आहे त्यात सुद्धा विचित्र awkwardness येईल असे वाटे.

नुकत्याच स्थलांतरित झालेल्या तिच्यासारख्या बऱ्याचजणी सुरुवातीला एका ठराविक वर्तुळात राहतात ज्यात फक्त भारतातून आलेली मंडळी असतात. नवीन देशाशी, परिस्थितीशी जुळवून घेत घट्ट राहतात. तशीच ती जिथे राहायची तिथल्या भारतीय समवयस्कांशी तिची छान मैत्री झाली होती. पण हळू हळू तो ग्रुप पांगला. मुलं पण मोठी झाली होती. तिच्या सगळ्या जुन्या मैत्रिणींचे नवे ग्रुप सुद्धा झाले.

“Oh, I didn’t even ask you if you want to eat?” डब्यामधूनच फ्राईड राईस फस्त करत ऑड्री म्हणाली. तिच्या घाईघाईने पण मनापासून खाण्याचं ललिताला थोडं हसू आलं. पण ऑड्रीशी मात्र कायमच नातं असल्यासारखं वाटलं तिला. ऑड्रीच्या प्रेग्नन्सीच्या काळात ललिताने तिला शक्य तितकं जपलं. घरून काम करण्याची सवलत देणं, स्ट्रेस येत असेल तर मदत करणं, तिच्या न्युट्रीशनकडे लक्ष पुरवणं आणि जमेल तसं pamper करणं. जणू ललितातला मातृत्वगुण पुन्हा जागृत झाला. ऑड्रीला सुद्धा यात काही वावगं वाटलं नाही हे विशेष! तीही हक्काने आणि आनंदाने लाड पुरवून घेत असे.

“So, how are you holding up without your dear son?” ऑड्रीने गमतीने विचारलं.

“I miss him a lot but can’t say that he is missing me though!”

तिच्या लिव्हिंग रूममध्ये चार फुटी प्लास्टिकचा ख्रिसमस ट्री उभा होता. त्याच्याकडे लक्ष जाऊन ललिता नकळत त्याकडे गेली. जवळच एक मोठ्ठा ornamentsचा बॉक्स उघडा पडला होता आणि ऑड्रीने त्यात नीट पॅक करून ठेवलेले वेगवेगळे सुंदर सुंदर ornaments ठेवले होते. "So beautiful!" नकळत तिच्याकडून उद्गार निघाले. "Come, I will show you my treasure." म्हणत ऑड्रीने एकेक वस्तू नीट अनपॅक करत दाखवायला सुरुवात केली. हा माझ्या आज्जीने दिला आहे, हा माझ्या पणजीचा आहे ती लहान असतांना तिने केलेला, तिने मला दिला. हा मी शाळेत असतांना डॅड आणि मी सहलीला गेलो होतो तेथून आणला. हा मी माझ्या बहिणीच्या लग्नानंतर घेतला. असाच तिला पण दिला आहे. एका एका वस्तूच्या कथेबद्दल सांगतांना त्या त्या आठवणींत ती बुडून गेली. जणू त्यावेळचा आनंद ती पुन्हा अनुभवत होती. तिच्या चमकत्या डोळ्यांसमोर किती तरी दृश्यं तरळत होती. जणू ती त्या आज्जी, पणजीचा मायेचा स्पर्श आठवत होती. त्या बॉक्समध्ये कितीतरी नाती, आठवणी जपून ठेवल्या होत्या तिने. दरवर्षी या खजिन्यामध्ये नवीन भर पडणार. किती मित्रमैत्रिणी, नातेवाईक, गेल्या पिढीचे, त्यांच्याही आधीच्या पिढीचे लागेबांधे किती सुंदर राखले होते तिने मनात. नकळत हे वैभव आपल्या हातून निसटलंय किंवा निसटतंय याची जाणीव तिला झाली. आपल्या कितीतरी मैत्रिणी, आज्जी, अजून अशी कितीतरी नाती मागे सोडून आलो. त्यांच्याशी इतक्या वर्षात फारशी काही देवाणघेवाण झाली नाही, मैत्रीची वीण घट्ट व्हावी असे काही अनुभव घेतले गेले नाही. उलट ही वीण निसटतेच आहे एक एक धागा.

"Lily, will you celebrate Christmas with me here? Josh will go to his parents; I was going to go but don't want to travel now. ललिताने उत्साहाने होकार दिला. का कुणास ठाऊक पण एक सुंदर ornament घ्यायचा असं तिने ठरवून टाकलं.

ललिताला बेकिंगची फार हौस! लहानपणी आयुष पण मदत करत असे. Cheesecake, शुगर कुकीज आणि अजून काय काय भारतीय आणि अमेरिकन पदार्थ करायचं ठरवून ती घरी निघाली. हा रस्ता आतून जात होता. घरांवर सजावटी केल्या होत्या. छोटे रेनडियर्स किंवा सॅन्टाक्लॉजच्या प्रतिकृती घरासमोर मांडल्या होत्या. रस्त्याच्या दुतर्फा झाडांवर सुंदर लाईट्सच्या माळा लावल्या होत्या. झाडं दीपकळ्यांनी बहरून आली होती जणू . तिचं मन प्रसन्न झालं.

ख्रिसमस इव्ह आणि ख्रिसमसचा दिवस ऑड्रीकडेच राहिली ती. ऑड्रीच्या उत्साहाला उधाण आलं होतं. बेकिंगची तयारी, हे चिरून दे, त्याचे काप कर अशी स्वयंपाकात मदत सुरू होती ऑड्रीला. एकदोन casserole तिनंच केले, कितीही नाही म्हटलं तरी. दोघी असल्यामुळे सगळी कामं भराभर आटोपली जात होती. हसत खेळत, मदतीला गप्पा मारणारं कुणी असेल तर नेहमीची आणि कंटाळवाणी वाटणारी कामं पण किती उत्साहाने केली जातात नाही? गप्पा, हसणं खिदळणं आणि गाणी ऐकत कसे छान गेले दोन दिवस.

ऑड्रीसाठी 'ऑड्री हेपबर्न'च्या निवडक सिनेमांचं  कलेक्शन भेट म्हणून दिलं. ती आणि तिची आई ऑड्री हेपबर्नचे जबरदस्त फॅन! ऑड्रीचं नाव ही त्या ऑड्रीमुळेच. ललिताला एमिली डिकिन्सन्सचं कवितांचं संकलन भेट मिळालं. ते घेऊन अतिशय आनंदी आणि आल्हाददायक मनस्थितीत ललिता घरी निघाली. खरं तर तिचा पायच निघेना पण तिला आठवलं, की आज भारतात विडिओ कॉल आहे. आणि मग तिला घरची ओढ लागली. नाही म्हटलं तरी खूप धावपळ झाली होती दिवसभर म्हणून तिचा चटकन डोळा लागला. चांगली गाढ झोप लागली. रात्री जवळपास २-२.३० चा सुमार असेल फोनच्या सतत आवाजानं तिला दचकून जाग आली. आयुषने लावला असेल का फोन म्हणत तिने उचलला तर ऑड्रीचा घाबरा आवाज, " Lily, I think this is it! Do you think you can take me to the hospital?" ललिता पटकन उठली विद्युतगतीने तयार होत, वॉलेट, फोन वगैरे पर्समध्ये कोंबत तिने कार बाहेर काढली. एवढ्या रात्री रस्ता एकदम निर्मनुष्य होता. नेहमीचाच रस्ता पण वेगळाच वाटला. तिने गाडी भरधाव दामटली अगदी अर्ध्या वेळातच ऑड्रीकडे हजर. ऑड्री तयारच होती. तिने

आणि जॉशने बॅग आधीच भरून ठेवली होती emergency म्हणून. तसंही २-३ आठवड्यात लागणारच होती.

ऑड्री होती म्हणून आता मात्र ती काळजीपूर्वक व्यवस्थित रस्त्यावर लक्ष ठेवून गाडी चालवायला लागली. ऑड्री बऱ्यापैकी घाबरलेली वाटली. तिला धीर येण्यासाठी ती बाकी मैत्रिणींचे, तिचे किस्से वगैरे सांगत राहिली. हॉस्पिटल २० मिनिटांवरच होत. तेवढ्यात हलका हलका बर्फ सुरू झाला. सगळीकडे एक छोटा बर्फाचा पांढराशुभ्र थर जमा होत होता. जणू रस्ता पांढरी शाल लपेटून होता. या सुंदर दृश्याने जादू केली जणू आणि ऑड्री बरीचशी सावरली. तिने ललिताचा एक हात जो घट्ट धरून ठेवला होता त्याची पकड थोडी सैल झाली. तिच्या तळहाताला घाम फुटला होता.

" So… have you guys finalized on a name?” ललिताने ऑड्रीवरचा ताण अजून हलका करण्यासाठी विचारलं.

अपेक्षेप्रमाणे तिच्या चेहेऱ्यावर स्मित उमटलं. “We both like Evelyn or Emily.” ललिताला दोन्ही नावं खूप आवडली. “Those are really beautiful names!”

हॉस्पिटलला पोहोचल्यावर ऑड्री ऍडमिट झाली तेव्हा तिने ऑड्रीच्या आईला मेरीला आणि जॉशला फोन लावले. दोघंही तिकीट मिळतात का बघायला लागले. जरी तिकीटं मिळालीच तरी ५-६ तास तर नक्कीच लागले असते. मेरी, ऑड्रीची आई येईपर्यंत तरी ‘मीच तुझ्याबरोबर थांबू का?’ असं ललिताने विचारताच, ऑड्री कळकळीने म्हणाली, "Please, do stay!” ललिताच्या मनात एक विचार चमकला. बाळाच्या स्वागतासाठी हजर राहता यावं म्हणून तर ह्या अशा फुटकळ खुसपटी निघत गेल्या आणि भारतवारी रद्द झाली की काय जणू? नियती काय काय योगायोग घडवून आणेल काही सांगता येत नाही. “कुठले या बाळाशी ऋणानुबंध बाई?” असं वाटून तिच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं. असं कोणाशी तरी, इथल्या मातीशी नातं जुळावं, त्यांच्या आयुष्याचा नसला तरी आठवणींचा भाग होता यावं. आणि या इथल्या मातीत आता मुळं रुजावीत अशी तिची इच्छा अशा रीतीने तर सफल होत नव्हती ना?

सोनेरी जावळ असलेली, छान ६ पौंडाची गोंडस परी नर्सने ऑड्रीच्या हातात आणून दिली तेव्हा दोघींनाही आनंदाश्रू अनावर झाले. त्यानंतरचा सगळा वेळ बाळाला बघण्यात पटकन उडून गेला. काही तासांनी मेरी आली. जॉश सुद्धा पोहोचण्यातच होता. मेरी आल्यानंतर या दोन लेकींना आपापल्या आयांकडे सोपवून ती घरी निघाली. रस्त्याच्या दुतर्फा

झाडांवरचा बर्फ हळू हळू वितळून थेंबाथेंबांनी ओघळत गोठून गेला होता आणि त्या गोठल्या थेंबांची नक्षी सूर्यप्रकाशात चमचमत होती. ती घरी पोहोचली तेच कसलं तरी समाधान घेऊन. आनंद मन ओसंडून वाहत होता. बराच वेळ ती अशी शांतपणे बसून राहिली.

ललिताने तास दोन तास विश्रांती घेतली. पण लगेच उत्साहाने तिला जाग आलीही. ती पुन्हा नव्या उत्साहाने परत हॉस्पिटलला जायला तयार झाली. न राहवून थोडा शिरा सुद्धा करून घेतला बरोबर. ऑड्रीला आवडला होता नाही तरी मागे एकदा. आता जॉश, त्याचे आईवडील पण पोहोचले होते. सगळं छान वातावरण होत. गोडुली जॉशच्या हातात शांतपणे झोपली होती. ललिता शिरस्त्याप्रमाणे हात धुवून मास्क लावून आत गेली तो जॉशने बाळाला तिच्या हातात देत म्हंटले, "I present you our daughter, Evelyn Lilly Walker." कृतज्ञतेने आणि आनंदाने डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहत आहेत आणि मनापासून हसूही फुटते आहे अशा चमत्कारिक अवस्थेत ती बाळाला हातात घेत म्हणाली, "Hello, Evelyn Lilly, माझं पण नाव लिलीच आहे बरं का!"

श्रद्धा भट


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१
बोलका कट्टा
सहर्ष सादर करत आहे
'आनंदयात्री'
सादरकर्ते : डॉ. सतीश देसाई
साहित्य, सांस्कृतिक, राजकारण, क्रीडा, वैद्यकीय अशा क्षेत्रातील नामवंत व्यक्तींकडून मिळालेले धडे, आलेले अनुभव याबद्दलचे निखळ आणि धमाल किस्से!!
रविवार २६ सप्टेंबर,२०२१
वेळ स. ९.००(CST) सं ७.३०(IST)
स्थळ: यू ट्यूब लाईव्ह
http://youtube.com/c/MaharashtraMandalChicago


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१
*॥ इतिहासमंच ॥*
प्रस्तुत करत आहे
महात्मा गांधी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर
व्याख्यानमाला: श्री. नितीन आपटे
आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर,
शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले
वेळ: शुक्रवार, १ ऑक्टोबर २०२१
रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

# अद्वैताचे गाणे

जगी काळोख साचला
मनी झाकोळ झाकोळ
आस तुझी ग लागली
मन व्याकुळ व्याकुळ

नको राहू ग दूर तू
अंत असा ग पाहू तू
माझ्या रम्य आठवांचा
सखे बन ग पाऊस तू

आसावल्या पहाटे
मनी लागली चाहुल
रव नाजुकशी आली
तुझे वाजले पाऊल

सर आली ग धावुन
स्वप्न माझे ग होऊन
प्रसन्नले माझे मन
संगी सचैल नाहुन

जरा लागला हा डोळा
का ग गेलीस निघून?
मनी उठले काहुर
तू ग नससी पाहुन

*****

जरी जाईन मी
मनी राहीन मी
तुझ्या मिटल्या नयनी
पुन्हा येईन मी

जरी नसेन मी
मनी वसेन मी
पूर आठवांचा
मनी बनेन मी

श्वासा-श्वासात रे
तुझ्या असेन मी
तुझ्या सोबतीचा
गंध बनेन मी

जिथे जाशील तू
तेथे असेन मी
तुझी माया रे मी
तुझी छाया रे मी

तुझे शैशव मी
तुझे तारुण्य मी
तुझे सत्य ही मी
तुझे स्वप्न ही मी

सुधीर कुलकर्णी

# आधी चार घास गिळून घ्या

सकाळचे सहा वाजले होते. ती झोप असते बघा ज्यात आपण तासन् तास कूस बदलतही नाही, तसल्या गोड गाढ झोपेत आम्ही सगळे होतो. अचानक त्या पहाटेच्या शांत, स्तब्ध अंधाराला चिरत एक किंकाळी ऐकू आली. हा किळसवाणा आवाज रोज सकाळी असाच ऐकू येतो. ह्याला घड्याळाचा गजर म्हणतात. अत्यंत भेसूर वाटतं नाही का ते! पण त्याहून भेसूर वाटतं ते हे वाक्य,

"ऊठ ना यार, आज डबा कर ना प्लीज"

मी आजतागायत अतीव उत्साहात हे काम करायला उठणारी व्यक्ती पाहिली नाहीये. शेवटी जितका माफक विरोध मी करू शकलो बापडा, मी तो केला. पण दिवसाउजेडी, उघड्या डोळ्यांनी ज्याचं घरात काही चालत नाही, त्याचं त्या अंधारात, डोळे मिचकवत काय चालणार! मी उठलो, मुलाला रेटत, खेचत उठवला.

"काय करू रे डब्याला?", असा सवाल चिरंजीवांपुढे ठेवला. एक तर अमेरिकेत आल्यापासून ह्याची जीभ नको ते चोचले मागते. तिकडे पुण्यात गपगुमान पोळी भाजी जायची डब्यात. इकडे सँडविच, पास्ता, पिझ्झाच्या ऑर्डरी सोडल्या जातात. तसली फर्माईश फार क्वचित पूर्ण होते, हे तोही जाणून आहे. पण तरी तो फिर्याद करून बघतो बिचारा. आणि म्हणून मी, अजूनही अर्ध्या मिटणाऱ्या डोळ्या आडून, त्याच्या उत्तराची वाट पाहत होतो.

"पोहे", तो दुधाचा ग्लास धुवायला टाकत म्हणाला खरा पण माझा काही विश्वास बसेना बुवा.

"पक्का, पोहे?", मी तरी एकदा कानांना दिलासा द्यायला विचारलं.

इथे तो अंघोळीला जायचा थांबला, वळाला, आणि म्हणाला "कसंय फादर. तुम्ही काही रोज उठत नाही हे करायला. आणि उशीर झाला तर शाळेला चालत जायचा माझा मूड नाहीये आज. सो गेट डाऊन टू वर्क अँड लेट्स गो"

आगाऊ वाटेना का, पण पॉईंट होता भावाच्या वाक्यात. आमच्याकडे एक नियम आहे. शाळेला जायला त्याने जर उशीर केला, बस चुकली, तर शाळेत आम्ही चालत जातो; साधारण अर्धा तास लागतो पोचायला. घाबरून हा तपशील तो विसरला, की उशीर त्याने केला तरच हा नियम लागू आहे. घड्याळात ६.२० वाजले होते, ७ ला बस येते. मी भराभर कांदा कापला, कोथिंबीर चिरली, झाक मटार टाकून पोहे दहा मिनिटात रेडी! तोवर पोरगा अंघोळ करून डोकं पुसत आला समोर. मी डबा दाखवला, प्रचंड अभिमानाने छाती ताणून.

"हे सगळं ठीके फादर, बट आर्न्ट यू मिसिंग समथिंग!"

"अरे काहीच नाही विसरलोय लेका. मटार आहेत, लिंबू दिलाय वेगळा, कोथिंबीर सुद्धा भुरभुर", माझ्या पोह्याला सुद्धा RFE आली की काय असं वाटलं एकदम.

लेकाने शांतपणे घड्याळाकडे कटाक्ष टाकला, "वी स्टिल हॅव टाइम ऑन हॅण्ड".

आता मात्र मी थोडा चिडलो. एकतर पोहे झाक झालेले, पण हा प्राणी पटकन तयार व्हायचं सोडून कसलंतरी अचाट मिशन पूर्ण करायला निघालेला. आता मी थोडा वैतागून म्हणालो, "कसला टाइम! मुकाट्याने भर बॅगेत आणि चल गधड्या!"

तो मात्र शांत, "चिल डॅड, लेट मी हॅण्डल धिस, अँड थँक मी लेटर"

मी निष्प्रभ होऊन डबा त्याच्या हातात दिला. त्याने बॉम्ब डिफ्युज करावा तितक्या शिताफीने ते पोहे एका सुंदर ताटलीत ओतले; नव्हे, मांडले. कोथिंबीर वेचून वर काढण्यात आली. एक्सट्रा चिरलेली अजून त्या पोह्यात स्ट्रेटिजिकली पेरून झाली. घरात माझ्याइतकीच किंमत असलेल्या कडीपत्त्याला अचानक ग्लॅमर आलं. दाणे, मटारही वर दिसू लागले. लाईट्स ऑन! कडेला विनाकारण सॉसचा एक फटकारा आला.

"पोह्या सोबत सॉस! व्हॉट नॉन्सेन्स!", धर्म भ्रष्ट झाल्यावर पूर्वज ताटावरून ताडकन ओरडत उठत असतील तसा मी तणतणलो. तरी लेक माझा शांत. घड्याळ आता मात्र ओरडू लागलेलं.

"धिस इज नॉट नॉन्सेन्स, धिस इज ऍन आर्ट. कॅमेरा काढा बस्स, वी आर रेडी".

फोटो! अरतिच्या! इतका खटाटोप फूड फोटोसाठी हे माझ्या ध्यानात आलंच नव्हतं. मग माझाच फोन घेऊन लेकाने काही अँगल लावले आणि साधारण दहा कडक फोटो झाले. कडक म्हणजे फोटो भारी आले असं नाही. शिकागोच्या सकाळच्या थंडीत छान गरम पोहे, थंड होऊन कडक होईपर्यंत त्याने ते उघडे ठेवलेले. मी घड्याळाकडे पाहून मुकाट्याने कपडे बदलले आणि त्याला बसमध्ये बसवायला वेळेत पोचलो. पोहे कसे झाले, काय वाटलं खाऊन हा तपशील त्याने शाळेतून परतल्यावर दिला. पण तोवर साधारण अडीचशे लाईक्स पाहून, माय ईगो डिडन्ट नीड कौतुक एनीमोर.

फूड फोटोचं पेव आज फुटलंय असं नाही; म्हणजे फार जुनंही नाही. जेव्हापासून स्मार्टफोन, तेव्हापासून. त्याआधी छत्तीस फोटोच्या रोलने जर हे खूळ चालवायचं झालं असतं तर प्रचंड महाग पडलं असतं ओ! तरी साधारण दहा अकरा वर्षांपूर्वी, घरच्या अन्नाचा सार्वजनिक मांडव नव्हतो आपण उभा करत. अरे पूर्वी तर घरात कोणी आलं आपण जेवत

असताना, तर जेवायला बसलेले लगबगीने ताट, भांडी, वाट्या, आणि स्वतःच्या लुंग्या सांभाळत आत कसेबसे उठून जायचे. उगाच दृष्ट लागते वगैरे बाबी मोठ्या वाटायच्या. हातात साधा लाडू घेऊन मी एकदा उंबरठा ओलांडला तर आईने एक धम्मकलाडू पाठीत घातला होता. आणि आता त्या ब्रह्माण्डनायकाला नैवेद्य नंतर असतो, आधी संपूर्ण ब्रह्माण्डाला तो दाखवला जातो. त्यात पुन्हा फोटो क्वालिटी, लाईट इफेक्ट हे प्रकार आलेच.

पण हे किती घातक ठरू शकतं त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे आमचे कैवल्य जोशी आणि त्यांचं बिऱ्हाड. जोश्याच्या घरी मला आणि संतोषला जेवायला बोलावलं होतं. जोशीणबाई मटण मसाला करणार इतकंच माहीत होतं. तशी कार्तिकी जोशी फार सुग्रण असल्याची ग्वाही जोश्याच्या डब्याकडून कधी मिळाली नव्हती. पण बॅचलर माणसाला मेस सोडून घरचं जेवण मिळणार होतं; त्यात "घरचं वशाट ना राव!", असं बोलून कोल्हापुरी संत्याने जीभ चाळवली होती. आम्ही दोघे जोश्यांच्या घरी पोचलो; साधारण सात वाजले असतील संध्याकाळचे.

"या या या या", असं आदरातिथ्यही झालं.

"बुवा, खायची सोय केलायस ना बे? नाही, आतून काहीच वास येईना म्हणून थोडा डाऊट यायलाय." संत्याचा आगाऊपणा होता, पण ऑबझर्वेशन बरोबर होतं. स्वैपाकघरातून सुवास तर सोडा, आत कोणी आहे की नाही तेही कळेना.

"सोय! अरे, मित्रा तू आज उपाशी नाही झोपत लेका! काय टेन्शन घेतो!...", जोश्याने दिलासा दिला,

"...फक्त एक बदल आहे. माझ्या बायकोने कधीच नॉनव्हेज नाही बनवलं, तर आता तू तिला गाईड करणार आणि ती बनवणार. बाकी सगळं रेडी आहे.", आधी जोशी गंमत करतोय का काय असं आम्हाला वाटलं, but जोशीबुवा kidding करत नव्हते. आम्ही असला पांचटपणा खपवून कसा घेणार, म्हणून माफक विरोध करून निघायला उठणार तितक्यात आतून कार्तिकीताई आल्या.

"हो ना, मीच म्हटलं, की वर्षानुवर्षं ही जी परंपरा आहे पाहुणे-राउळे करायची, त्यात आता जरा change हवाच. शेवटी networking, relaxation, communication ही काय फक्त host चीच गरज नसते ना. Even guest सुद्धा त्याच हेतूने आला असतो. So why not share cooking too!". ह्या अचाट आगाऊपणाला, "नॉव्हेल आयडिया", असं लेबल लावून यजमान शांत चेहऱ्याने आमच्याकडे पाहू लागले, आणि काहीही समजायच्या आत,

संमोहित झाल्यासारखे त्यांच्या किचनमध्ये उभे दिसलो आम्ही. पाचव्या मिनिटाला माझ्या हातात कांदा कापायला दिला होता. संत्या, जो स्वतःच्या रूमवर स्वतःचाच चहाचा कप विसळत नसे, तिकडे सिंकवर मटण धूत उभा. स्वतः कैवल्य तिकडे पीठ मळू लागला. जोशीण मात्र आयुष्यात टिंडरवर नुसते राईट स्वाईप घेतल्याच्या थाटात उभी होती. बरं, काही बोलताही येईना! पोट उपाशी, पहिल्यांदाच ह्यांच्या घरी आलेलो, मित्राची बायको.

"बुवा, पोळ्या लाटायचा न्हाई मी.", संत्या कधी पिठाकडे, कधी कार्तिकीकडे बघत पुटपुटत का होईना, पण टापरला.

"नाही नाही, ते मी बघतो, रोजचंच आहे.", जोश्याने एक डोळा आणि ओठांचा हलका स्माईल बायकोकडे ठेवत हळूच उत्तर दिलं. इथे मी एक गोष्ट क्लिअर करतो. स्वैपाक पुरुषांनी सुद्धा केलाच पाहिजे, आलाच पाहिजे. फेमिनिझम वगैरे फार दूर राहिलं. पण गरज पडता आपल्याला करता येतं, आणि घरात सुद्धा एक बॅलेन्स राहतो, असा माझा स्वानुभव. पण म्हणून घरी येणाऱ्या पाहुण्यांना स्वैपाकाला उभं करणं म्हणजे अतिरेक होता ना राव!

"कार्तिकी, सगळं सामान तयार आहे, करायला घ्यायचं का आता?", संत्या आणि मी आवंढा गिळत आमच्या अन्नपूर्णेकडे पाहिलं. जोशीबुवा मात्र स्थितप्रज्ञ, जणू भविष्य जाणून असलेला मुनीच. तो तल्लीन होऊन सटासट पोळ्या लाटत, भाजत आणि डब्यात टाकत होता. एका बाजूला मीच लावलेला जिरा राईस शिट्ट्या सोडत होता. ओट्यावर चिरलेला कांदा, मॅरिनेटेड मटण, मसाले, सगळं रेडी. कार्तिकी मात्र, सापशिडीतल्या अजून पहिल्या घरात सोंगटी उभी रहावी, तशीच उभी. पण एक मात्र होतं, स्माईल कायम. After all बरका, she was the host ना रे!

"हो कर ना सुरू, मी बघते", संत्या आणि मी पुन्हा सापाने गिळल्यासारखे काही घर खाली आलो. पण मित्राची बायको, मित्राचं घर, मित्राची इभ्रत, हे सगळं सांभाळून बोलणं प्राप्त होतं. जोशी मात्र आमच्याकडे बघेचना. मीच उसनं अवसान आणून, चेष्टेवारी घेत, थोडं हसत बोललो मग,

"अगं, तू करणार होतीस ना मुली? कैवल्य सांगत असतो, what a fantastic cook you are."

"अरे, मी non-veg करते असं हा सांगतो? O, no, no, no. मी pure vegan आहे. Can't even stand the smell of an egg. In fact, कैवल्य म्हटला तुम्ही लोक मटण खायला येणार आहात तर I freaked out! कसला ओरडला माझ्यावर जोरात, अंगावर

almost धावूनच आला. म्हणून मग मी ready झाले.", हे अचाट खुलासे बाई अत्यंत शांतपणे करत होत्या, पण स्माईल अगदी वॉर्म बरं का. आफ्टरऑल, होस्ट!

"मी कुठे ओरडलो ग?", कैव्या जरा बुचकळ्यात पडलेला वाटत होता, पण आवाज मृदू.

"का? म्हणजे तू कधी ओरडत नाही माझ्यावर? कधी धावून येत नाहीस अंगावर? व्हॉट नॉन्सेन्स कैवल्य! असं मला खोटं नको पाडूस समाजासमोर", असं म्हणून कार्तिकीने एग्झिटच घेतला. पण मला जरा हायसं वाटलं. नाही, एकतर त्या खोलीत नुसत्या भाज्या चिरण्याचे, पाण्याचे, भाजणाऱ्या पोळ्यांचे, कूकरच्या शिट्ट्यांचे आवाज येत होते. शिवाय एकाच ठिकाणी उभं राहून पायाला मुंग्या येतात की. कार्तिकी तर गेला दीड तास मोबाईलचे मेसेज चोखत उभी होती.

"अरे काय लावलंय रे कैव्या!" मी तसा शांत माणूस, फार बोलायला नाही आवडत मला. पण शेवटी मी ही वैतागलो रे.

कैवल्य मात्र पॅनिक झालेला स्पष्ट दिसत होता,

"काहीही न बोलता मुकाट्याने ते मोठं भांडं गॅसवर ठेव भ*** आणि उरकून, खाऊन निघा. बाकी उद्या ऑफिसात बोलू."

ही केस कोणाच्या अंगावर धावून जाईल असं शक्य असेल का रे, तूच सांग! ऑफिसच्या फ्लोरवर काळा भोंगा उडत आला एके दिवशी तर कैवल्य जोशी दोन्हीही कानांवर हात ठेऊन पटकन मॅनेजरच्याच केबिन मध्ये घुसलेले, ते ही मॅनेजरची मीटिंग चालू असताना.

"What is this nonsense Joshi, please behave yourself", असं मॅनेजर ओरडल्यावर बुवा बोललेले, "No Jatin, the भोंगा goes in the ear. Very dangerous.".

असला मनुष्य अंगावर धावून जाणार आणि तेही बायकोच्या! संत्या काही बोलणार, तोच कार्तिकी पुन्हा किचनमध्ये आली. पुन्हा स्माईल.

"Ok, आपण आज माझ्या स्टाईलचं मटण करू", आता ती अतिउत्साहात दिसली.

"त्येच मी पन म्हनत होतो. एक नंबर असतोय तुझा स्वैपाक. आम्ही खातो ना रोज लंचला. आज मटन पन झाक होनार!", संत्या जरा सुखावला.

"ओह, नाही नाही रे. बनवणार तूच. रेसिपी माझी", जिने कधीच अंडं सुद्धा नाही बनवलं, ती त्या माणसाला मटण मसाला करायला गाईड करणार होती जो मटणाला सुद्धा वशाट म्हणत असतो. संत्याने "नाय, नको, तसं नाय" म्हणत थोडा चुकवायचा प्रयत्न केला, पण नाहीच.

कार्तिकी पुढे आली आणि "तेल टाक" असं म्हणाली. म्हणजे ओठातून ते "तेल टाक" असं ऐकू आलं, पण नजरेतून "मुकाट्याने" हा शब्द लख्ख दिसत होता.

तेल पडलं कढाईत. मसाला पडला on demand. काही इतर माफक बदल सोडता रेसिपी बरी वाटत होती. आणि तितक्यात.

"गूळ टाक"

एक निस्सीम शांतता पसरली अचानक. अचाट होती ही स्टेप, रेसिपीमधली. आम्ही तर सोडा, मॅरिनेटेड मटन थरथरलेलं मी पाहिलंय.

"मटनात गूळ!", कैवल्यने बायकोला आडवं जायचं धाडस केलं.

"तोच तर ट्विस्ट आहे लेका!", अशी थाप माझ्या पाठीवर देत कार्तिकी बोलली. ती अजूनही भयानक कॉन्फिडन्ट आणि उत्सहात होती रे! संत्याचं, माझं आणि तिच्याच नवऱ्याचं धाडस होईना. म्हणून मग ती स्वतः पुढे आली आणि अक्षरशः दोन मोठे खडे गुळाचे टाकले. हसण्यावारी नेण्याची क्षमता संपलेली आता. काहीही न बोलता आम्ही आमची जेवण्याची इच्छा आणि तो गूळ मटणात वितळताना पाहात उभे राहिलो.

कालांतराने आम्ही सावरलो, पण लगेच जेवलो असे नाहीच. Finest crockery from Spain मग बाहेर काढण्यात आली. एक DSLR कॅमेरा घेऊन कैवल्य स्वतः जातीने लक्ष घालून फोटो काढू लागला. एकाही फोटोत नरदेह नको होते, म्हणून आम्ही लग्नातल्या लांबच्या नातेवाईकासारखे किचन टेबलवर बसून राहिलो. दांपत्याने मात्र मनसोक्त पोज देत फोटो काढले. जोश्यांच घर बाविसाव्या मजल्यावरचं. एक फोटो तर त्यांच्या घराच्या बाल्कनीतून हात बाहेर काढून होता. कैवल्य जोश्याने कढई हातात धरलेली आणि असा त्या उंचीवरून अँगल घेणं चाललेलं. आम्ही गेस्ट, दोघे काय करणार होतो, उगी आपलं त्यांच्या ही-ही ला ही-ही, हा-हा ला हा-हा.

"कढई उलटी करता येतीये का बघ कैव्या", मी थोडा टोमणा मारण्याच्या तयारीत म्हणालो. माझा अत्यंत  पांचट जोक त्याला झेपला, तिला काही केल्या हसूच आवरेना रे. नाही, सेन्स ऑफ ह्युमर काहींचा अचाट असतो, फक्त ऐकून होतो तोवर!

शेवटी, पुन्हा मायक्रोवेव्हमध्ये ते अन्न गरम करण्यात आलं. संत्याला मटणाचा तुकडा पाण्याखाली धरून शुचिर्भूत केलेला पाहिलंय मी. गुळाचा लवलेश शक्य तितका काढून टाकत होता तो. शेवटी झालं लेका जेवण एकदाचं; रात्री बारा वाजता. घरी जायला खाली उतरलो

आम्ही दोघे आणि लिफ्टमधेच मोबाईलचं नोटिफिकेशन वाजलं. फेसबुकवर कोणीतरी टॅग केलंय असं कळालं. पोस्ट होती...

Feeling awesome for inventing a new recipe, "Shahi Gulaab-e-gul Mutton do-pyaja". The kids loved it!

"किड्स! अबे जोश्याला पोरंयत? अन आपल्याला का नाही दिसली मग? तोंडात गूळ दाबून बसवलं असनार बाईनं! चायला ह्या जोश्याच्या!", मोबाईलवरचे फक्त मटन डिशचे एकोणीस फोटो भराभर बोटाने टोलवत, आणि कमाल झोपेत-कम-संतापात संतोषसाहेब बोलले. त्या अख्ख्या अल्बममध्ये आमचा एक फोटो होता फक्त, तोही दातात कांदा आणि फ्रस्ट्रेशन चिरडताना.

"The kids म्हणजे तू अन मी, च*** ", मी त्याचा बाळबोध डाऊट क्लिअर केला.

सकाळपर्यंत ५५० लाईक्स, साधारण एकशेचाळीस कमेंट्स. झाली ना राव पार्टी भारी.

तर हे असंच चालू आहे सगळीकडे आता. चुकीचं आहे का? तर छे छे, नाहीच! आपल्याकडे कला आहे, तर जरूर दाखवावी आणि सोशियल मीडियाइतका चांगला मंच जर आता सगळ्यांना फुकट आहे, तर अन्न munch करायच्या आधी तो ह्या मंचावर टाकायला काहीच हरकत नाही. आता माझंच उदाहरण सांगतो. वयाच्या तब्बल तीस वर्षापर्यंत मला चहा सोडला तर काहीही येत नसे. परदेश दौरे सुरू झाले, आणि पश्चिमेच्या सगळ्या देशात ब्रेडचं प्रमाण जास्त. आठवडाभर आपण पिझ्झा सहन करू शकतो रे, पण नंतर साधी देशी राईसप्लेट हवीच.

आम्ही जोहान्सबर्गला पहिल्यांदा पोचलो तेव्हा अशीच अवस्था झाली. परदेशी जाणाऱ्या मुली एकट्या चालल्या असतील तर त्यांना असलं काही सहसा शिकवावं लागत नाही. बरेच पुरुष मात्र आजही उलथनं आणि झारीचे गुणधर्म आणि फरक शोधताना सापडतील. पण जसं कुठे एकटं राहण्याची वेळ आली की आधी हे किचन धडे आया आपापल्या कार्ट्यांना देताना आता दिसतात. मी ही पोळपाटावर लाटणं गिरवून आणि एक बटाट्याची भाजी करून ट्रेनिंग घेऊन घराबाहेर पडलेलो. पण अस्सल मैदानावरचा अनुभव वेगळाच.

आम्ही दक्षिण आफ्रिकेत एकूण चार जण एकत्र पोचलो. सुरुवातीला पिझ्झा सतत खाणे ही चैन भारी वाटलेली. आमच्यातला एक पंजाबी अव्वल चिकन बनवायचा. पण त्याला फक्त तेच यायचं. रोज रोज चिकन खाणं शक्य नव्हतं. आणि पोळ्यांचा एकंदर आनंदच होता. म्हणून

चौघांनी एक शपथ घेतली, की पोळ्या जशा बनतील तशा सगळे निमूट खातील. जळून कडक झाल्या तर खाकरा, कच्च्या लिबलिबीत राहिल्या तर रुमाली रोटी, जाड झाल्या तर नान, असं समजून निमूट खायचं. पण अट ही होती, की सलग आठवडा एकानेच पोळ्या करायच्या, म्हणजे त्याचा हात बसेल. पहिल्या आठवड्यात मी स्वतः लाटू लागलो. एका पॉइंटला तर मला वाटू लागलेलं की पोळपाट पालथं ठेवावं तव्यावर. म्हणजे चिकटलेली पोळी तशीच भाजता येईल. प्रयत्नही झाला. पण त्यात पोळपाट जळून काळं दिसू लागलं. मग पाणी कमी टाकल्याने चिकटपणा कमी होतो हे ज्ञान झालं. पंजाब्याने तर पाण्याऐवजी एकदा स्कॉच टाकून पाहिली, नंतर बीयर. कधी फ्रोझन पोळ्या, कधी भारतातून आणलेले थेपले, थालीपीठ, धपाटे असले ऑप्शन सुद्धा झाले, संपलेही. पण लोक हो, आम्ही कोणीच धीर नाही सोडला. यू ट्युब बघून-बघून स्वैपाक कौशल्य इतकं शिगेला पोचलं, की नंतर पोरं जास्तच धीट झाली. गाजराचा हलवा म्हणू नका, चिकनचं पार मेनूकार्ड म्हणू नका, बेसन लाडू, चिवडा, गुलाबजाम, सामोसे, अर्र्र्र्र्र, विचारू नका! पोरं नुसती पेटलेली. आता इतक्या महत्प्रयत्नाने, यातनांनी कमावलेल्या पाककौशल्याचे कौतुक तर व्हायलाच पाहिजे. म्हणून मग फोटोवर लाईकची हाव वाढली.

आता तर कॅमेऱ्यात सुद्धा फूड फोटोचं वेगळं सेटिंग असतं. त्याचा छोटासा स्टुडिओ सुद्धा मिळतो, ज्यात लाइटिंग, डिशला साजेसं असतं. लोक ऑनलाईन क्लास घेतात असे फोटो काढायचे कसे, कशाने, आणि कोणासाठी. क्षुल्लक काम नाही राहिलं आता ते.

बरं, ह्या कलांना उच्छाद म्हणायला तुम्हाला घराबाहेर भेटावं लागतं. हॉटेल, रेस्टॉरंट, कार्यालयं ही अशी ठिकाणं आहेत जिथे आपण काहीच बनवत नाही, पण जे समोर येतं, त्याचे फोटो काढण्यात काय सुख वाटतं लोकांना देव जाणे. शिल्पा माने ही आमची बालमैत्रीण. तिचा लग्नानंतरचा पहिला वाढदिवस डेस्टिनेशन करायचाच असा तिच्या नवऱ्याचा हट्ट. पुण्याजवळ एका पुरातन किल्ल्याचं रेस्टॉरंट केलंय. असे कैक वाडे सुद्धा आता नावारूपाला येतायत. त्यातलं हे डेस्टिनेशन शोधून, तिच्या नवऱ्याने आम्हाला चक्क निमंत्रण पत्रिकाही पाठवल्या.

"काय ग शिल्पे! भारी चाललंय की राव! लहानपणी एक किलोतला अर्धा केक तुझ्या घरचे आत घेऊन जायचे. उरलेला पंचवीस पोरात वाटला जायचा. पाकिटात फक्त वीस रुपये ठेवलेले म्हणून काकूंनी पुऱ्या संपल्या असं सांगितलं मला. आणि आता थेट शाही वाढदिवस! नवरा नवसाचा आहे का काय!", असा खवचट टोमणा मंदारच मारू जाणे.

"तेच तर नडलंय ना राव!", शिल्पाने रागाऐवजी सहानुभूतीच्या अपेक्षेचासूर लावला रे!

"म्हणजे ग शिल्पे?", कोणीतरी विचारणं प्राप्त होतं.

नवरा आणि स्वतःची आई दूर आहेत ना हे बघत आमची शिल्पी बोलली, "अरे आमच्या मातेला दाखवायलाच चाललंय हे सगळं. मी पर्सनल लोन, कार लोन, घराचे हप्ते भरत बसलीये आणि नवऱ्याने जगाला, आणि खास माझ्या आईबापाला दाखवायला हे डेस्टिनेशनचं काढलंय. अरे, एखादी मुंज किंवा साखरपुडा होईल इतक्या खर्चात. ऐकतच नाहीये."

आम्ही निमूट गेलो त्या जंगी वाड्यावर. पण तिथला सीन अचाट, अफाट होता. गेटवर सनई चौघडे. फुलांची भली मोठी आरास करून हार्ट काढलेला. त्यात "शिल्पा" असं गुलाबांनी गिरवलेलं. आत व्हरांड्यात आमच्या शिल्पीच्या चित्राची ही मोठ्ठी-च्या-मोठ्ठी रांगोळी. हॉलमध्ये "सजन रे झूट मत बोलो" हे गाणं चालू होतं.

"हे गाणं वाढदिवसाला!", असं मी विचारल्यावर तिचा नवराच बोलला, "तिची आवडती प्ले-लिस्ट लावली आहे!" आणि मग लगेच तब्बल चार कॅमेरामननी माझे चार वेगवेगळ्या पॉईंटवरून फोटो काढले; अगदी चहु बाजूंनी. लॉन्ग शॉट, क्लोज-अप, ग्राऊंड शॉट आणि पार ड्रोन शॉट, (आईशपथ काही विचारू नका! तेच सगळे तर मी मॅट्रिमोनी साईटवर वापरले आणि माझं लग्न ठरलं.) मग आम्ही आत गेलो, तर मोठ्या दोन पडद्यांवर फक्त त्या दोघांचे फोटो गुलाबी आग लावत होते. खाली गुलाबी धूर का धुकं सोडलेलं, जे काय असेल ते. माने काका आणि काकू, पोरीचं कौतुक बघत हैराण झालेले दिसत होते. काकू तशाही हैराण लुक मधल्या एक्सपर्ट. किमान दीडशे पब्लिक आलेलं राव. "काय काकू! जोरदार जावई मिळालाय तुम्हाला", आम्ही सोसायटीतली पोरं गेलो त्यांच्या जवळ.

काकू उलट खुश व्हायचं सोडून आम्हालाच ओरडल्या की रे, "हो! इतका पैसा आहे तर लग्नाचा अर्धा खर्च परत करा की म्हणावं.". दोन घराण्यातलं नातं किती घट्ट आहे ते एका वाक्यात स्पष्ट झालं. तितक्यात "वरात आली रे" असं कोणीतरी ओरडलं. वरात! म्हणजे वाढदिवसाच्या पार्टीत एक लग्नही उरकलंय हे ऐकून आयडिया भारी वाटली. आम्ही गेलो बाहेर आणि पाहतो तर उंटावर आमची शिल्पी आणि तिच्या अवतीभवती २ ड्रोन कॅमेरे भिरभिरत होते. शिल्पी जाम खुश दिसत होती, का नसावं तिने! प्रचंड कौतुक चाललेलं आमच्या मैत्रिणीचं. तितक्यात उंट खाली बसला तर अगदी तशी पोज शेजारी तिच्या नवऱ्याने घेतली. हा काय प्रकार बघायला मी गर्दीतून डोकं वर काढलं.

"तू काय करतोयस हे प्रद्युम्न?!", शिल्पी सुद्धा अमच्या इतकीच पझल्ड की. शिवाय ओशाळलेली जास्त आता. शिल्पाचा नवरा प्रद्युम्न, हे प्रकरण फारच रोमांचकारी होतं राव.

"इथून तुला मी पाठीवर आत नेणार", ह्या वाक्यावर प्रद्युम्नाच्या डझनभर मित्रांच्या शिट्ट्या, टाळ्या. आतून गाण्याचा आवाज ऐकू येत होता, "दादा मला एक वाहिनी आण". ती प्ले-लिस्ट एकदा वाचण्याच्या लायकीची होती, आय टेल यू. इकडे चक्क शिल्पा त्याच्या पाठीवर विराजमान झाली आणि प्रद्युम्नचा उंट कसाबसा हेलकावे घेत चार गुडघे चालला आणि थबकला. ह्या सगळ्या प्रकारात विडिओ आणि ड्रोन फुल ॲक्टिव्ह होते.

कालांतराने तीन मजली केक आला. तोंडाला फासण्याची जनरीत पार पडली. शिल्पाला देता येत नाहीत म्हणून तिच्या प्रद्युम्नला मग त्याच्या मित्रांनी उचललं आणि पार्श्वभागावर बर्थडे-बंप्स ही झाले. त्याच्या मित्रांनी नुसतं वर धरलेलं, पण मूळ लाथांची फटकेबाजी आमच्या सोसायटीतल्या पोरांनी पार पाडली. सगळं झालं आणि आता गिळायला काय मिळणार ह्याची वाट बघत आम्ही उभे राहिलो. जेवण काही दिसेना. आणि मग कोपऱ्यात एका टेबलावर काही कागदी प्लेट दिसल्या. त्यात काही चिप्स, तो केकचा तुकडा, दोन मेदुवडे दिसले, विथ चटणी. एक ड्रोन तिथेही वरती होताच. आम्ही मुकाट एक-एक प्लेट उचलली, तर प्रद्युम्नचा भाऊ माईकवर ओरडला. "पर पर्सन एक प्लेट घ्यावी. लेट अस नॉट वेस्ट फूड! आणि ड्रिंक्स घ्या नक्की". जवळच त्या वाड्याच्या एका पुरातन घमेल्यामधून लोक ऑरेंज ज्यूस, पेपर कप त्यात बुचकळून उचलताना दिसले. हे ते ड्रिंक्स!

काही दिवसांनी इन्स्टाग्रामवर मात्र नुसती खळबळ उडालेली. असले कातिल फोटो आणि व्हिडिओ की काय सांगू नका. नुसता धुव्वा! पण एकाही फोटोत एकाही चिपचा, वड्याचा क्लोजअप नाहीच. प्रद्युम्नराव हे इन्फ्लूएंसार म्हणून नाव कमावणार ह्यात शंकाच नाही.

तर तसे अनेक किस्से आहेत ह्या विषयावर सांगण्यासारखे. तुम्ही जेवायला घरी बोलवा तर खरं, मग सांगतो. पण एक कळकळीची विनंती आहे. ते सुग्रास अन्न थंड होईपर्यंत नुसते फोटोच नका काढत बसू यार. आणि काढलेच तर ते लगेच share करण्याची घाई कशाला! ते होईल की निवांत. त्या आधी चार घास गिळून घ्या.

समीर कुलकर्णी

# रचना

संपादक

रश्मी चाफेकर

मुखपृष्ठ, मांडणी आणि संकलन सहाय्य

आशिष नगरकर

मिलिंद साळी

मुखपृष्ठ

अमृता जोशी

मुद्रित शोधन (मराठी)

डॉ. सुजाता महाजन

मुद्रित शोधन (इंग्रजी)

अंजली चाफेकर

रहे ना रहे हम

प्रसन्न जोगळेकर

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१

*॥ इतिहासमंच ॥*

प्रस्तुत करत आहे

# लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर

## व्याख्यानमाला: श्री. नितीन आपटे

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर, शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले

वेळ: शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१

रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

**महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१**

**|| अध्यात्मपीठ ||**

सादर करीत आहे व्याख्यान

**विषय: बीजशुद्धी समर्थ संततीचे रहस्य**

**विषयतज्ञ: आयुर्वेदाचार्य श्री. लक्ष्मीकांत कोर्टीकर**

**दिनांक:** गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१
**वेळ:** रात्री ८:०० - ९:३० (शिकागो स्थानिक वेळ)

**आयोजन:** उर्मिला दामले, उल्का नगरकर,
अनिरुद्ध दामले, सुजाता महाजन,
माधव गोगावले, सौरभ नैकलीकर व चेतन रेगे

प्रस्तुत कार्यक्रम महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या यूट्यूब चॅनलवरून थेट प्रक्षेपण केला जाणार आहे. तरी खालील लिंक द्वारें कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा

**https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago**

# असे व्हावे

हळुवार सुरांच्या शाली
पांघरताना तू यावे
अलवार सुरांच्या भाळी
गीतांना तू रेखावे

हलकेच हात या हाती
निघतांना तू ठेवावे
लटकेच हो-ना करता
नेत्रांना शब्द स्फुरावे

ओठावर सूर अडकती
टिपताना स्तब्ध रहावे
उबदार स्वरांच्या खाली
निजतांना तानच व्हावे

अंगावर स्वप्नांच्या झूली
झुलतांना स्पर्श रुळावे
हळुवार सुरांच्या शाली
पांघरताना तू यावे

कल्पना कोठारे

# तिला काय xxx कळतंय !

कालिंदीच्या नव-याचं तिच्याबद्दलचं एक आवडतं विधान होतं, दिवसातनं एकदा तरी ते उच्चारलं जायचंच. ते विधान म्हणजे, "तिला काय xxx कळतंय." जाणकारांना फुल्यांच्या जागी कोणते शब्द घालायचे ते कळेलच. झेलम, कालिंदीची मुलगी, हे वाक्य अनेकदा ऐकायची, मधल्या शब्दांसहित. पुरुषाच्या शिव्याकोशाशी तिचा परिचय होता तो वडिलांमुळेच. पण तिला या शब्दाचा अर्थ कळायचा नाही. दर वेळेस हे वाक्य उच्चारलं गेलं, की तिच्या मनात प्रश्न उमटायचा, खरंच? आईला काही कळत नाही. झेलम आता आईची चेष्टा करण्याच्या वयात आली होती. साहजिकच 'पप्पा' म्हणजे ग्रेट! हे तिचं मत होतं.

तिचे पप्पा लेखक होते. जगाला तुच्छ लेखणं हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचाच भाग होता. त्यापैकी 'आई' ही त्यांची सर्वात आवडती शिकार होती.

कालिंदी सकाळी लवकर उठून चटचट कामं आवरायची. नव-याची, नव-याकडे येणा-या वाचकांची, मुलांची उस्तवार करता करता तिचा दिवस कुठल्या कुठे निघून जायचा. ती मुंगीसारखी सतत काम करणारी बाई होती. अस्वच्छता, गबाळेपणा, पसारा या गोष्टी तिला मुळीच आवडायच्या नाहीत.

ऊन डोक्यावर आलं तरी पांघरुणं डोक्यावर घेऊन पडणारी, भर दुपारी गाद्या टाकून, पांघरुणं घेऊन लोळत पडणारी माणसं, शेजारी खाल्लेल्या बोरांच्या बिया, चहाची रिकामी कपबशी, त्यावर घोंघावणा-या माश्या, अंथरुणाशेजारी खरकटं सांडलेलं, संध्याकाळी अंधार पडला तरी दिवे न लावता अंधुक प्रकाशात वाचत लोळत पडणारी माणसं... हे सगळं चित्र तिच्याच घरच्या बेशिस्त माणसांचं होतं. अत्यंत आळशी, वाचनात गुंगून जाणा-या, आरोग्याविषयी बेफिकीर असणा-या या माणसांमध्ये तिच्यासारखी मुंगीच्या जातीची बाई बेजार होऊन जायची. घर स्वच्छ, उजेडात भरपूर न्हायलेलं ऊबदार, आनंद आणि उजेड परावर्तित करणारं असावं अशी तिची सारखी धडपड असायची.

झेलम आईवर वैतागायची. तिच्या सतत आवरत राहाण्याने सुद्धा कंटाळायची. तिला वाटायचं, एक दिवस असा यावा, की हजारो तास झोपायला मिळावं, अंघोळीला सुट्टी देता यावी, अंथरुणाशेजारी भरपूर कधी न संपणारा खाऊ घेऊन म्हणजे हरबरा, बोरं, आवळे, संत्री, चुरमुरे, फुटाणे, लाह्या, बत्तासे, बेदाणे, पापड असं काहीही काहीही घेऊन एखादी लठ्ठ कादंबरी पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत निर्विघ्नपणे वाचता यावी. दारावर सेल्समन येऊ नयेत. आईबाबांच्या टिप-या नसाव्यात, ती वाचते तेच पुस्तक पळवणारा दुष्ट भाऊ

नसावा, साखर मागायला येणारे शेजारी नसावेत, तिची कादंबरी पूर्ण होईपर्यंत बाहेरच्या जगातली झुळूकही तिच्यापर्यंत येऊ नये.

पपा नवीन काही लिहिलं की आधी झेलमला वाचून दाखवायचे. खरं म्हणजे कालिंदी पण लिहिणारी, कळणारी होती. पण आपलं लेखन तिला कळत नाही, असं त्यांचं ठाम मत झालं होतं.

त्या दिवशीही असंच ते काहीतरी वाचून दाखवत होते. दोन-तीन पानंच लिहिली होती. त्या दोन-तीन पानातली अश्लील वर्णनं झेलमसमोर ऐकता ऐकता कालिंदीचा चेहरा लाल झाला. ती कसंबसं म्हणाली, "अहो, हे काय लिहिता तुम्ही?" झालं! पप्पांनी हातातली पानं खाली आपटली आणि बडबड करायला सुरुवात केली. 'तिच्यायला, तुला काय कळतंय साहित्यातलं? अस्तिस्तवाद कशाशी खातात माहीत आहे का? कुठून असली बायको मी घेतली. चांगल्या चांगल्या मुली सांगून आल्या होत्या." बायको 'घेतली' या शब्दप्रयोगाने झेलमची त्यांच्यावरची भक्ती नाही म्हटलं तरी डळमळीत व्हायचीच.

बडबड करून ते बाहेर निघून आले. कालिंदी झेलमला म्हणाली, "अश्लील लिहिलं तरच चांगलं लिखाण असतं का? प्रेमचंदांनी कधी अश्लील लिहिलं नाही. त्यांचं वाचलंयस तू? समाजाचं किती बारीक निरीक्षण, समाजातल्या प्रश्नांविषयी किती कळकळ! यांना सामान्य माणसाची भूक कधी दिसते की नाही? की नुसत्या मांड्याच दिसतात?" झेलमला वाटलं, कुणी काय लिहावं, कुणाला काय सुचेल, लिहावंसं वाटेल ते कसं सांगता येणार? पण त्याहून कळीचा प्रश्न हा आहे की, कुणाला कोणत्या पातळीपर्यंत कशी समज आहे हे कसं मापणार?

एक दिवस एक दिवाळी अंक घरात येऊन पडला. झेलम एकटीच घरात होती. तिने कुतूहलाने चाळला. त्यात कालिंदीची कविता होती. तिचं नाव वाचल्यावर झेलमला पोटात कसंनुसं झालं. एवढे सगळे व्याप सांभाळत केव्हा लिहिते ही बाई. मग तिला आठवलं, सकाळची सगळी कामं आटोपली, बाबा बाहेर पडले, की अर्धवट जाग्या झेलमला टेबलखुर्चीशी बसून तुफान वेगात आई लिहीत बसलेली दिसायची. कधी कधी ती थांबायची. कुठेतरी शून्यात बघत विचार करायची पुन्हा लिहायची. उठल्यावर आपण आईला वाचून दाखवायला सांगू असं ठरवून झेलम परत झोपून जायची आणि उठल्यावर विसरूनच जायची. कारण आई पुन्हा गृहिणी बनून कामाला जुंपलेली असायची.

झेलमने उत्सुकतेने अंक उघडला. कालिंदीच्या कवितेचं पान काढलं.

*"एक छोटासा किडा मारताना*
*दिसतो,*
*आयुष्याबद्दलच्या विश्वासाने*
*तुरुतुरु चालणा-याचा आपण*
*किती सहज करतो, तो*
*विश्वासघात!*
*आपण मिळवलेली असते शाश्वती*
*आपल्या उद्यापरवाची*
*आपल्या पुढच्या पिढीचीही*
*दुस-या जिवाबद्दल असतो आपण बेफिकीर*
*तडफड मृत्यूची जरी असली तरी*
*असते अगदी छोट्या आकारात*
*आपलं मन असतं इतकं छोटं*
*की,*
*गरम तव्याजवळ गोड पदार्थ ठेवताना*
*इकडे आड तिकडे विहीर झालेल्या*
*मुंग्या दिसत नाहीत,*
*आपल्या छोट्याशा मनाला.*
*आपल्या मनात मावूच शकत नाहीत*
*विश्वातल्या इतर जीवांचे आकार.*
*त्यांची सृष्टिनियमांप्रमाणे जगण्याची धडपड*
*हलणारे जीवच जर दिसत नाहीत आपल्याला*
*तर,*
*आपण सहजपणे धडाधड आपटतो*
*ती दारं खिडक्या,*
*लाथेने उडवतो ते स्टूल*
*कडकडा फांद्या मोडतो ती झाडं*
*या सगळ्यांचे वेदनेचे हुंकार काय ऐकू येणार आपल्याला?"*

कविता वाचल्यावर झेलम सुन्न झाली. तिला आईच्या कितीतरी गोष्टी आठवल्या, ज्या खूप खूप छोट्या होत्या पण किरकोळ नव्हत्या...

एकदा तिला कुणीतही हिरवागार ‘ख्रिसमस ट्री’ गिफ्ट दिला. तो हातात घेऊन रिक्षाकडे जात असताना मागे कुणीतरी आहे असं वाटलं म्हणून तिने वळून पाहिलं. तर एक शेळी उभी होती. ती वळल्यावर ‘बेंऽ बेंऽ’ करून तिने तिच्याजवळच्या ख्रिसमस ट्रीबद्दल उत्सुकता दाखवली. कालिंदीला हसू आलं, “बायो गं, हे काही खरं नाही” असं म्हणून तिनं शेळीच्या नाकाजवळ ते झाड धरलं. शेळीनं ते हुंगलं आणि ‘तरीपण आम्हाला दुसरं काही...’ अशा अर्थाचं बेंऽ बेंऽ केलं. तेव्हा कालिंदीने एक हरब-याची पेंडी तिला घेऊन दिली.

कुत्री, मांजरी, शेळ्या सगळ्या तिच्याशी थेट संवाद साधत. कुणीही भुकेजलं पाहणं तिला शक्य होत नसे. भिका-यांना तर इतकं देत रहायची की त्यासाठी प्रसिद्ध झाली होती.

एक दिवस दुपारी दार वाजलं. झेलमने दार उघडलं तर तान्ह्या बाळासारखं तोंडभर हसू घेऊन कालिंदी दारात उभी. सावळी कालिंदी, अत्यंत स्वच्छ धुतलेल्या, नीळ घातलेल्या कॉटनच्या साडीत धुतलेल्या कपड्यांचा एक खास वास आणि प्रकाश घेऊन आत आली. वर हसरे निष्पाप डोळे. त्याच्यातून ओसंडणारा एवढा आनंद कसला तर खरेदीचा.

जादूच्या पोतडीसारखी गच्च भरलेली पिशवी तिने खाली ठेवली आणि म्हणाली, “पाहिलंस, मी काय आणलंय?”

झेलमने पाहिलं, तर काही नाही. रोजच्याच आवश्यक वस्तू. साबण, पावडर, पाण्याचा मग... फिकट आकाशी रंगाचा मग हातात उचलून ती म्हणाली, “याचा रंग बघ, किती छान आहे. प्रसन्न वाटेल रोज याला पाहिल्यावर. आणि हा साबण बघ. खूप दिवसांनी आज माझ्या आवडीचा साबण मिळालाय. आणि सर्वात छान म्हणजे हे बघ.” तिने एक पिवळी घडी उलगडली. सुंदर डिझाईनचं टेबलमॅट होतं ते.

“आई, हे टेबलमॅट दिसतेय.”

“हो, सहाचा सेट असतो. पण मी एक घेतलंय सध्या. खूप आवडलं. आणि टेबल कुठेय आपल्याकडे?”

झेलमला वाटलं. टेबल कुठेय? तर कशाला घेतलं टेबलमॅट? पण सौंदर्यावर प्रेम करणा-या बाईला त्याचं काय?

कपबशा स्टँडला लावताना त्या सर्वांचं डिझाईन एकाच दिशेला येईल याची ती काळजी घेते, पालकाची भाजी निवडताना एखादं छोटं, कोवळं पान आलं तर “झेलम, बघ ना किती

छोटं पान'' असं म्हणून ते बाजूला ठेवते. ती मोलकरणीशी प्रेमाने बोलते. फुलांशी, झाडांशी बोलते. शंकर, राम, विठ्ठल, गणपती कुणी तिला काही दिलं नाही तरी ती सगळे देव तिची मुलंबाळं असल्यासारखी त्यांना स्वच्छ ठेवते. ती प्रेमचंद वाचते आणि तिला भुकेल्यांची भूक त्रस्त करते.

तरी पप्पा म्हणतात, 'तिला काय xxx कळतंय!' कळणं म्हणजे काय असतं? कुणाला काय कळत असेल, जगाच्या निबर कातडीखालचे प्रवाह कसे समजत असतील, कुठून जातात या प्रवाहांच्या धारा, कुठले असतात किनारे, कुठे असतात स्पंदनं? कुणाला समजते विश्वाच्या श्वासोच्छ्वासाची लय? कुणाचा प्रवास असेल किती खोलवर, आत आणि दूरवर, कोण कसं मापू शकेल?

पप्पा म्हणतात, तसं नाहीय. तिला कळतंय, जे पपांना कळत नाही. तिला दिसतंय, जे पपांना दिसत नाही. जगण्याच्या कणाकणातून जाणवणा-या चैतन्याला तिने समजून घेतलंय म्हणूनच या संसाराने तिला फक्त उपेक्षाच दिली, तरी तिची मुळं खोल रुजली आहेत या संसारात. वस्तूंचे आकार बिघडले, की बिघडते त्यांच्या अस्तित्वातली लयसुद्धा! हे नेमकेपणाने समजलंय तिला. तिला आवडणारी स्वच्छता, उजेड या वरवरच्या गोष्टी नाहीत. संसारातल्या प्रत्येक गोष्टीची उजेडाकडे वळण्याची धडपड वाचता येते तिला. एवढं सूक्ष्मदर्शी तिचं कळणं आहे. पप्पांना यातलं काय कळणार?

सुजाता महाजन

('शहरातला प्रत्येक' या कथासंग्रहातून)

# Dear Diary

Dear Diary,

On Nov 13, 2021 the MMC Diwali event was organized. I attended the event and had a lot of fun. The event was at the Yellow box auditorium, Naperville. I had a dance performance as part of the event. Let me tell you some things that happened before, during and after the performance. I wanted to get dressed up as soon as I reached the auditorium so that I could be prepared early and not have to hassle at the time of performance. My mom advised it was too early and she was right as the time was 1:00 pm and the performance started at 3:30 pm. My mom was performing too but she didn't seem to be in a hurry.

After some time we went to the gym where the MMC president election was being conducted. It was fun to see all the different activities but at the same time it was boring as I didn't have anything to do in the election process. There was a table at one end of the hall where grown-ups were registering and voting. Next we went downstairs where the changing rooms were located. Some of my mom's friends were there too. I changed, climbed back downstairs and went to the green room. Kids were supposed to wait in the green room until the time of performance. My dance was 3rd so we had to wait for a long time. I was getting bored there. My costume was a plain white shirt, red shiny skirt and a necklace. When our group's name was announced, we went to the stage. I was feeling nervous and a little scared while climbing the stage. But once our dance started, I had a big smile on my face. The time spent on stage was probably the best time of 2021 for me. After the dance we were sent backstage so as to make space for the next performing group.

Finally, we were sent to the babysitting area. I signed in and ate some snacks. I played with my friends and Legos. I didn't really enjoy the

babysitting center as we go to play with Legos, whereas kids above age 10 had an option to code. It kind of felt like a dungeon. After 2-3 hours my dad picked me up from the center. I had missed my mom's performance because I was in the center for too long. As the time passed mingling with others it was time to finish the event. I was given a bag of surprises at the exit.

Overall it was a good experience and I wish next time the babysitting center will have more options for kids to enjoy. I hope you all enjoyed reading my experience from the MMC Diwali event. I would also love to hear what others who attended the event.

Regards,

Meera Rahul Bapat

Age – 9 years

# दोन बाळांची बारशी

मोहक मोहिनीने गावातील सर्वांना मोहित करून सोडले होते. ती उंच, सडपातळ, सरळ नाकाची, पाणीदार बोलके डोळे, गोरीपान होती, याबरोबरच तिला मधुर आवाजाचीही देणगी मिळाली होती, मोहिनीने आपल्या आकर्षक बांध्याने नव्हे, तर मधुर स्वभावाने सर्वांना आपलेसे केले होते.

मोहिनीचे नववीपर्यंत शिक्षण झाले होते परंतु विचारांनी ती पदवीधर व्यक्तीपेक्षा कितीतरी पुढे होती.

मोठ्या खटल्याच्या घरात तिला दिले होते. तिने काही दिवसातच थोरल्या जावा, दीर, सासू-सासऱ्यांची मने आपल्या सेवाभावी व गोड वृत्तीने जिंकली. दोन धाकट्या जावा व नंणदा यांची ती खास मैत्रीण बनली. त्यांना काही लागले तर त्या मोहिनीला पुढे करून मोठ्यांची अनुमती घेत.

गावातील कोणी आजारी असतील तर मोहिनी त्यांना गोड- धोड करून नेत असे. बाळंतिणीची ती खास सेवा करायची. गावातील ज्येष्ठांच्या तर ती गळ्यातील ताईत झाली होती. भजन करणे, प्रत्येक सणावाराला गावातील महिलांना एकत्र आणून नागपंचमी, हरतालका, नवरात्री अशा उत्सवात ती हिरिरीने स्वतः भाग घेऊन इतरांना प्रोत्साहन देत असे.

गावात सर्वात जास्त शिकलेली तीच असल्यामुळे आठवड्यातून एक-दोन वेळा तरी गावातील शाळेत चक्कर मारून गुरुजी आणि मुलांची चौकशी करत असे. गावात फक्त चौथीपर्यंतच शाळा होती. १५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन आणि २६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाला ती स्वतः आपल्या हाताने शाळेतील मुलांसाठी खाऊ करून मुलांना वाटत असे. गावात पूजा, लग्नकार्य असेल तर ती अगदी घरच्याप्रमाणे मदत करत असे, हळदीची गाणी, लग्नातील मंगलाष्टके नेहमीच म्हणत असे. घरचेही तिला समाजकार्यात मदत करत.

आपल्या मधुर गोड वाणीने ती सर्वांना आदराने आजोबा, आजी, दादा, भाऊ, काका, काकू, मामा, मावशी त्यांच्या वयानुसार म्हणत असे. गावातील लहान-मोठे सर्वजण तिला ‘अक्का’ या नावानेच संबोधू लागले होते. अक्का मदत व समाजकार्यात सगळ्यात पुढे असे पण राजकारणापासून खूप खूप दूर होती. आपल्या निस्वार्थी सेवा व आदराने सर्वांची लाडकी झाली होती.

तिच्या लग्नाला आता आठ-नऊ वर्षे झाली होती. तिच्यानंतर ज्यांची लग्ने झाली होती त्यांना दोन-दोन, तीन- तीन मुले झाली होती पण तिची कूस मात्र अजून भरली नव्हती. मोहिनी व तिचा नवरा बालकिसन दोन-तीन पुणे-मुंबईतील स्त्रियांच्या तज्ज्ञांकडे जाऊन आले होते. त्यांनीही मोहिनीला अपत्य होण्याची शक्यता नाही असे सांगितले होते. त्या काळातील ग्रामीण भागाच्या रिवाजाप्रमाणे तिने आपल्या नवऱ्याला दुसरी बायको करण्यासाठी अनेक वेळा विनंती केली. घरातल्यांनीही सांगितले परंतु त्याने ती कल्पना प्रत्येक वेळी धुडकावून लावली. मोहिनी घरातील सर्व मुलांची तसेच गावातील मुलांची काळजी घेते त्यामुळे आम्हाला मूल नसल्याने काहीच फरक पडत नाही असे तो सांगत असे.

आई, सासू, आणि मैत्रिणींनी देवाला नवस करणे अंगारे-धुपारे सर्व केले होते. त्या गोष्टीत मोहिनीला मुळीच रस नव्हता आणि त्यावर विश्वासही नव्हता.

गावात सर्वजण गुण्यागोविंदाने नांदत होते, पण बाहेरील राजकारणी लोकांच्या भूलथापांनी त्यांच्या गावालाही सोडले नाही. ह्या वर्षी गावात ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार होत्या. नेहमी बिनविरोध निवडणुका होत असत पण ह्या वर्षी काही तरुणांना निवडणुका पाहिजे होत्या. उमेदवारी अर्ज भरण्याचे दिवस जवळ येऊ लागले. ज्येष्ठांनी या तरुणांना समजावण्याचा प्रयत्न केला पण ते आपल्याच तोऱ्यात राहिले.

गुरुवारी भजन झाल्यावर चावडीत गावबैठकीसाठी बहुतेक सर्व ज्येष्ठ मंडळी व तरुण जमले होते. भजने संपल्यानंतर मोहिनी व इतर महिला घरी जाण्यास निघाल्या पण काही ज्येष्ठांनी व तिच्या सासू-सासऱ्यांनी तिला त्या बैठकीला थांबण्यास सांगितले. मोहिनीला त्यात रस नव्हता पण मोठ्यांचा आदर व शब्दाला मान देऊन ती थांबली.

बैठक सुरू होताच बाचाबाची होऊ लागली. काही तरुण उतावळे होऊन बोलत होते. मोहिनी बारकाईने ऐकत होती. त्यातील एका वयस्कर व्यक्तीने मोहिनीला विनवले. “अक्का बरे झाले, तू थांबलीस. आता तूच यावर तोडगा काढ”. थोरांनी व महिलांनी एका आवाजात त्या सूचनेची री ओढली आणि तिला मध्यस्थीची विनंती केली. ‘नको नको’ म्हणत शेवटी थोरांच्या आदरापोटी अक्का बोलण्यास तयार झाली.

ती म्हणाली, “आपल्याला गावासाठी खूप कामे करायची आहेत. मागे ठरल्याप्रमाणे ज्या व्यक्तींना ठरवले होते त्यांना ग्रामपंचायतीचे सदस्य होऊ द्या. पुढच्या वेळी तुम्हा तरुणांना वाव देऊ.”

हे ऐकून रवी नावाचा तरुण मोठ्याने ओरडला, “ए वांझोटी तुला राजकारण काय समजते तू गप बस”.

क्षणभर सगळीकडे सन्नाटा पसरला. सगळेजण आ वासून आपले आश्चर्य व संताप व्यक्त करत होते.

दहा-पंधरा ज्येष्ठ व काही तरुण एकाच सुरात ओरडले, “गधड्या तुला अक्कल आहे की नाही? चालता हो या बैठकीतून”.

खूप गोंधळ माजला. रवीचा आजा उठला आणि रागारागात रवीकडे जाऊन त्याच्या मुस्काटात मारण्यासाठी हात उगारला, तेवढ्यात मोहिनीने त्यांचा हात धरला व म्हणाली, “आजोबा, माफ करा. रवी अजून अजाण आहे”.

‘वांझोटी’ शब्दाने तिच्या डोळ्यात अश्रू आले होते. सगळे ज्येष्ठ व महिला उठून म्हणाल्या, “आम्ही निघतो.”

काही व्यक्तींनी त्यांना थोडा वेळ थांबण्याची विनंती केली, माजी सरपंच म्हणाला, “या तरुणांचा माज उतरवलाच पाहिजे. त्यांना निवडणूक पाहिजे ना होऊ द्या.”

रवी व काही तरुण बाहेर निघून गेले. रवीला आक्काने चावडीत आजोबांपासून वाचवले होते, पण तो बाहेर येताच त्याच्या वडिलांनी त्याला जोरात कानशिलात लगावली. त्याच्या आईनेही त्याला चांगलेच सुनावले.

चावडीत थोर, महिला व बरेच तरुण अजूनही बसून होते. नेहमी शांत, प्रसन्न व हसरी मोहिनी थोडीशी निराश होती पण स्थितप्रज्ञाप्रमाणे तशीच उभी होती. ती घरी जाण्यास निघाली पण चार-पाच ज्येष्ठ वृद्ध व तीन-चार माजी सरपंचांनी तिला थांबवले. एक माजी सरपंच व ह्यावर्षी सरपंच होणार होता त्याने घोषणा केली, “यावेळी अक्काच सरपंच होणार. आम्ही तिला निवडून आणणारच.”

सगळ्यांना ते इतके आवडले, की काही तरुणांनी अक्काला खांद्यावर उचलून घेऊन घोषणा सुरू केल्या. अक्काची राजकारणात यायची मुळीच इच्छा नव्हती. ती म्हणाली, “मी बाहेरून हवी तेवढी मदत करेन पण मला नको हे.”

सासू, सासरे म्हणाले, “अक्का, तुला गावातील मुलांसाठी खूप काही करता येईल.”

त्याच बैठकीत सर्वांनी एकमताने त्यांचा पॅनल निवडला व निवडणूक लढायचे ठरवले.

रात्रभर मोहिनीला झोप आली नाही. गुपचूप खूप खूप रडली. सकाळी नेहमीप्रमाणे ती महादेवाच्या मंदिरासमोर रांगोळी काढत होती. तिची नेहमीची प्रसन्नता आज लोकांना दिसली

नाही. पडल्या चेहऱ्यावरचे भाव तिने लपविण्याचा प्रयत्न केला पण ते बोलके हसरे डोळे आज तिला साथ देत नव्हते.

निवडणुकांचे फलक साऱ्या गावात लागले होते. गावात कधी नव्हती ती दुफळी झाली होती. निवडणूका चार दिवसात होणार होत्या. रवीची बायको अचानक आजारी पडली. तिचे सासू- सासरे अक्काकडे आले. अक्काने लगेच आपल्या नवऱ्याला सांगून शिकारी बैलांच्या गाडीत रवीच्या बायकोला तालुक्याच्या ठिकाणी दवाखान्यात नेले. तीन दिवसानंतर बरे वाटल्यानंतर तिला गावी आणले.

दुसऱ्या दिवशी निवडणुका झाल्या व काही दिवसातच मतमोजणी होऊन मोहिनीच्या पॅनेलचे सर्व उमेदवार निवडून आले. एकमताने अक्काला त्यांनी सरपंच केले. अक्काने सरपंच पदाची सूत्रे हातात घेतली आणि गावातील अडलेली कामे करण्याचा धडाका लावला. गावातील पाण्याची विहीर खोल केली, घाटाच्या रस्त्याचे काम केले. तालुक्यात जाऊन सरकारी बांधकाम खाते व राजकारणी लोकांकडून गावच्या रस्त्याचे काम मंजूर केले आणि रस्ता केला. थोड्या दिवसात गावात एसटी बस पण येऊ लागली, फिरता दवाखाना आणला. यासारखे अनेक कामे गावकऱ्यांच्या सहकार्याने चालू ठेवली.

शेवटचा उपाय म्हणून तिच्या आईने एका सुईणीला तिच्याकडे आणले. सुईण मावशीने तिला व तिच्या नवऱ्याला खारीक, खोबरं, डिंक आणि काही औषधी वनस्पती घालून त्याचे लाडू खाण्यास सांगितले. तसे तिने दोन-तीन महिने केले पण त्याचा परिणाम झाला नाही. सुईणमावशी परत आली आणि तिथे काही आठवडे स्वतःच्या देखरेखीखाली तिला लाडू भरवत राहिली.

चावडीशेजारील छोट्या खोलीत पहिली ते चौथीपर्यंतची शाळा भरत असे. अक्काला हे बरे वाटत नव्हते. गावात नवीन शाळा बांधण्याचा तिचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी ती झटत होती. पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदार, खासदार यांच्या निधीतून गावाला शाळेसाठी ७५%निधी तिने मिळवला. मग काय, गावातील सुतार, गवंडी, टकारी तरूण सर्वजण आपापली कारागिरी व मजुरी स्वयंसेवेने देण्यासाठी तयार झाले. ठरलेल्या मुहूर्तावर पाया खोदण्याच्या मानासाठी तिने गावातील चार-पाच ज्येष्ठांना बोलावले.

सर्वांनी अक्काला विनवले, “आक्का तुझ्यामुळेच हे शक्य झाले आणि आता शाळा होईल. तुझ्याच हस्ते पहिली कुदळ पडू दे.”

पाया खोदण्याचा कार्यक्रम अगदी उत्साहात झाला. घरातील सर्वांची छाती अभिमानाने फुगली होती. सर्वांनी तिचे खूप खूप कौतुक केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच मोहिनीला उलट्या झाल्या. आई व सासूने दुपारीच अक्काला तालुक्याच्या गावी डॉक्टरकडे नेले. डॉक्टरने दिलेल्या बातमीने सगळेजण आनंदित झाले. सासू आणि आई तर हवेतच तरंगत होती. तीन महिने कोणालाही सांगायचं नाही आसे त्यांनी ठरवले. झाले एकदाचे तीन महिने. सासऱ्याने पूजा ठेवून सर्व गावाला जेवण्यासाठी बोलावले आणि आनंदाची बातमी सांगितली. सर्वजण तिच्यासाठी आनंदाने पुलकित झाले. सरपंच अक्काला बाळ होणार होते. वांझोट्या मोहिनीची कूस लग्नानंतर दहा वर्षांनी भरली होती.

शाळा बांधण्याचे काम जोरात चालू होते. आक्का दररोज शाळेकडे एक - दोन चकरा मारून कामाची देखभाल करत असे.

सातव्या महिन्यात रीतीरिवाजाप्रमाणे तिचा मोठ्या उत्साहात ओटीभरणीचा कार्यक्रम झाला. आई 'बाळंतपणासाठी माहेरी चल' म्हणत होती पण अक्का 'शाळेचे काम चालू आहे मी येथेच राहते' असं म्हणून गावातच राहिली.

शाळेचे काम आता पूर्ण होत आले होते. नवीन वर्षापासून बालवाडी व अंगणवाडीसाठी शिक्षकांचा तगादा तिने पंचायत समिती व जिल्हा परिषद शिक्षण खात्यात लावला होता. विद्यार्थी संख्या कमी होती. गावातील तरुणांना व महिलांना हाताशी धरून शेजारच्या दोन ठाकरवाडीतील मुलांना शाळेत नावे घालून लागणाऱ्या पटापेक्षा दुप्पट आकडा तिने केला.

एक दिवस कळा आल्यावर तिला तालुक्याच्या ठिकाणी प्रसूती केंद्रात भरती केले. अक्काने एका सुंदर सशक्त गोंडस बाळाला जन्म दिला. दहा दिवसाने बाळाचे वाजत गाजत गावात स्वागत झाले.

ठरल्या तारखेला नवीन शाळेचे उद्घाटन होणार होते. शाळेच्या उद्घाटनासाठी आमदार, सभापती व शिक्षण खात्यातील अधिकारी आले होते. शाळेच्या चारही खोलीत विद्यार्थी बसतील एवढा हजेरीचा पट तयार होता. सर्व मुले आणि गावकरी त्याठिकाणी हजर होते.

अक्का ओली बाळंतीण असूनही तिथे येऊन तिने उद्घाटनाच्या भाषणात शिक्षण अधिकाऱ्यांना कळकळीने आणखी शिक्षकांची मागणी केली. आमदार व तालुका पंचायत समितीच्या सभापतींनी ते उचलून धरले. ती नम्रतेने म्हणाली, आम्हाला आश्वासने नकोत, आणखी तीन गुरुजी पाहिजेत. शिक्षण अधिकाऱ्यांना माहीत होते की सरपंच आक्काने किती

हेलपाटे मारले होते. अनेक वर्षानंतर गरोदर असूनही समाजसेवा व शाळेसाठी झटत होती. अधिक शिक्षकांसाठी आवश्यक लागणाऱ्या सर्व बाबी तिने पूर्ण केल्या होत्या. तशा तयारीनेच ते आले होते. आनंदाने तिथेच सर्वासमोर तीन शिक्षकांची ऑर्डर काढली.

अक्काची तपश्चर्या फळास आली होती!!!

आक्काने एकाच वेळी आपल्या बाळाला व शाळेला जन्म देऊन अनेक मुलांची शाळेची व्यवस्था केली होती. दैवयोगाने शाळा- बाळाचे उद्घाटन रूपी बारसे आणि तिचे बाळ दोघांचे बारसे एकाच दिवशी झाले.

आक्कासाठी आणि गावासाठी किती किती आनंदाचा आणि भाग्याचा दिवस होता तो!



माधव ना. गोगावले


Helping generations achieve their goals.
Since Ameriprise Financial was founded back in 1894, we have been committed to putting clients first. Helping generations plan for the expected and unexpected.
As an Ameriprise financial advisor, I remain true to our vision of always putting clients' needs first. Discover how you can benefit from the strength of a global leader and the heart of a one-to-one relationship.
Narayan Athanikar
MS, CIMA®, CRPC®
Financial Advisor
Vice President
630.762.6538
3 N 2nd St, Ste 200
St. Charles, IL 60174
narayan.athanikar@ampf.com
ameripriseadvisors.com/narayan.athanikar
CA Insurance #0F60740
Ameriprise Financial
Be Brilliant.
Ameriprise Financial Services, LLC. Member FINRA and SIPC.
© 2020 Ameriprise Financial, Inc. All rights reserved.

# मराठी सिनेमा

मराठी माणूस हा आरंभशूर आहे असे आपण नेहमी म्हणतो आणि हे चित्रपटसृष्टीच्या क्षेत्रात तर अगदी प्रकर्षाने लक्षात येते. भारतात निर्मित झालेला पहिला चित्रपट ‘राजा हरिश्चंद्र,’ दिग्दर्शित केलाय दादासाहेब फाळके यांनी, हे आपण सर्वांना माहीतच आहे. ह्या चित्रपटात असलेले चारही नट मराठी आणि मूकपट असला तरी, त्यातल्या संभाषणाच्या पाट्या मराठी आणि इंग्रजीत होत्या. पहिल्या चित्रपटात स्त्री किंवा बालकलाकार नव्हत्या पण दुसऱ्या चित्रपटात मात्र दोन्ही होत्या दुर्गाबाई कामत आणि त्यांची मुलगी कमलाबाई गोखले ह्या बाल कलाकाराच्या भूमिकेत. ‘राजा हरिश्चंद्र’ चित्रपटाचे पहिले प्रदर्शन पण मुंबईत झाले. भारतात अशा प्रकारे चित्रपटसृष्टीची मायभूमी मुंबई तसेच तिचे जन्मदाते, पहिले कलाकार, तारणहार आणि प्रेक्षक पण मराठीच.

आज भारतीय चित्रपटसृष्टी जगातील सर्वात मोठी आहे चित्रपट संख्या किंवा जागतिक प्रेक्षकसंख्या ह्याचा विचार करता . भारतात दर वर्षी दोन हजारच्या आसपास चित्रपट निर्मित होतात, भारतीय चित्रपट सृष्टीने उदंड वाढ पाहिली आहे १९१३ मधल्या राजा हरिश्चंद्रपासून आजतागायत. मराठी चित्रपटांनी मात्र बरेच चढउतार पाहिलेत. पहिला बोलपट हिंदी होता आणि एक वर्षानंतर १९३२ मध्ये पहिला मराठी बोलपट ‘अयोध्येचा राजा’ व्ही शांताराम यांनी निर्माण केला. मराठी चित्रपटसृष्टीने जसे चित्रपट बनवण्याचे नवीन तंत्रज्ञान भारतात आणले, भारतीय राष्ट्रपती पदक विजेते चित्रपट बनवले तसेच तिला दूरदर्शनच्या जमान्यात प्रेक्षक वर्ग मिळवण्यासाठी संघर्ष पण करावा लागला.१९५४ मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये ‘श्यामची आई’ला पहिले वहिले सुवर्णपदक मिळाले. मूकपट ते बोलपट या प्रवासात धडपडणाऱ्या मराठी चित्रपट सृष्टीने ‘महाराष्ट्र फिल्म कंपनी’ १९३० मध्ये बंद होतांना पाहिली. मात्र १९३७ मध्ये ‘प्रभात’ फिल्म कंपनीचा ‘संत तुकाराम’ हा चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान मिळवून व्हेनिस फिल्म महोत्सवात झळकला होता हेही नवल होते. दूरदर्शन आणि विविध कारणांनी मागे पडलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला एकविसाव्या शतकात, जीवनावश्यक प्राणवायू, ‘श्वास’ ह्या चित्रपटाने ऑस्कर नामांकन मिळवून दिला. होता होता आज आपण सगळेच काही अतिशय नवनवीन कथानक आणि विषय असलेले मराठी चित्रपट आवर्जून पाहतो.

२०१९ मध्ये समीर विद्वांस ह्यांची निर्मिती असलेल्या ‘आनंदी गोपाळ’मध्ये १८७० चा काळ, तेव्हाची सामाजिक परिस्थिती ही अतिशय बारकाव्यानिशी सुंदर दाखवलेली आहेच

पण भाग्यश्री मिलिंद, ललित प्रभाकर आणि इतर कलाकारांनी पण अप्रतिम अभिनय केलाय. त्याच वर्षी प्रदर्शित झालेला ‘हिरकणी’! प्रसाद ओक ह्यांच्या ह्या निर्मितीला प्रेक्षक वर्गाने भरभरून चांगला प्रतिसाद दिला. ऐतिहासिक विषय आणि कथा ह्या जश्या चित्रीकरण करण्यासाठी अवघड असतात तसे सुंदर कथानक लिहिणे आणि ते पडद्यावर उतरवणे पण आव्हानात्मक असते. सचिन कुंडलकरांचा ‘गुलाबजाम’ अतिशय गोड़ कथानक असलेला एक सुंदर चित्रपट आहे. आत्मचरित्र चित्रपटात उतरवणे तर फारच अवघड पण महेश मांजरेकर दिग्दर्शित ‘भाई - व्यक्ती की वल्ली?’ ह्या निर्मितीने डोळ्यासमोर पु.लं. ना जसे दूरदर्शनवर पहिले होते तसे उभे केले! २०१८ मध्ये प्रदर्शित ‘आणि .. डॉ काशिनाथ घाणेकर’ अशीच एक अफलातून कलाकृती, चित्रपटामध्ये, मराठी चित्रपटसृष्टीमध्ये १९६० ते १९८० मध्ये झळकलेल्या एका हरहुन्नरी नटाची जीवन कथा सुंदर दाखवली आहे.

मराठी सिनेमाच्या प्रवासात काही चित्रपटांचा उल्लेख झालाच पाहिजे ते म्हणजे सूर्यकांत ह्या नटाने केलेले १९४० मधले ‘छत्रपती शिवाजी’, ‘साधी माणसं.’ काही वर्षां पूर्वी दोन्ही चित्रपट पाहायचा योग आला आणि त्या काळी केलेलं चित्रण, संपादन ह्याची गुणवत्ता पाहून अवाक झाले, कधी चित्रफीत मिळाली तर नक्की अनुभव घ्या. तसेच ‘शांतता! कोर्ट चालू आहे’ हा पं. सत्यदेव दुबे ह्यांनी दिग्दर्शित केलेला एक अतिशय सुंदर कथानक असलेला चित्रपट येऊन गेला. १९९० मध्ये दादा कोंडके ह्यांनी मराठी सिनेमा गाजवला. त्याच वेळी डॉ जब्बार पटेल ह्यांनी एक वेगळ्याच धाटणीचा खजिना निर्माण केला ‘सामना’, ‘जैत रे जैत’, ‘सिंहासन’, ‘उंबरठा’. ऐंशीच्या दशकात महेश कोठारेंनी ‘धूम धडाका’ बनवून एकदम धमाका केला तर सचिन पिळगांकर ह्यांच्या ‘नवरी मिळे नवऱ्याला’मधील गाणी आजपण वाजताना ऐकू येतात.

हल्लीच्या काळात अगदी नक्की पाहावे असे दहा चित्रपट म्हणाल तर ‘हरिश्चंद्राची फॅक्टरी’, ‘फॅन्ड्री’, ‘कोर्ट’, ‘नटरंग’, ‘कट्यार काळजात घुसली’, ‘बालगंधर्व’, ‘बकेट लिस्ट’, ‘नटसम्राट’, ‘मी शिवाजी राजे भोसले बोलतोय’, ‘लोकमान्य टिळक’ आणि अजूनही आहेत पण सगळे विविध कथा, विषय, मुद्दे मांडणारे आणि वेगवेगळ्या काळातले असे वैविध्य घेऊन आले आहेत.

मराठी चित्रपट सृष्टीच्या इतिहासात सर्वाधिक कमाई केलेल्या ‘सैराट’चा उल्लेख झालाच पाहिजे. खिळवून ठेवणारी कथा, अतिशय सुंदर चित्रीकरण, तडफदार संगीत ह्याचे जे

काही मिश्रण झाले ते एक कुशल, प्रेक्षक वर्गाला अतिशय आवडणारी नागराज मंजुळे यांची ही कलाकृती देऊन गेले.

मराठी सिनेमाची आत्ताची प्रगती पाहून मराठी माणसाने आपल्या इतिहासाला स्मरून जमान्याबरोबरच नव्हे, तर पुढे एक पाऊल टाकून मराठी चित्रपट सृष्टीचा मान, दर्जा उंच ठेवला आहे.

प्रिया पाटणकर

# स्पंदन

एखाद्याच्या हसण्यात स्वत:चं
हसू शोधता यायला हवं...
त्याच्या स्वप्नांत स्वत:च्या
स्वप्नांचं आभाळ तोलता यायला हवं...
एखाद्यावर कधीतरी हक्काने
रुसताही यायला हवं...
त्याच्या डोळ्यातील अश्रूंना
अलगद पुसता यायला हवं...
काहीही न बोलता सोबत
दोन घटका बसता यायला हवं...
कधीच कसलीही अपेक्षा
नसते निखळ प्रेमामध्ये...
फक्त समोरच्याच्या ह्रदयात,
आपल्या ह्रदयाच्या स्पंदनांना
अनुभवता यायला हवं...

अमृता जोशी

# सहवास

घरभर चहाचा वास पसरला होता. संध्याकाळी ४.३० ची वेळ होती. चहातील आल्याचा घमघमाट सुटला होता. बाहेर पावसाची रिमझिम चालूच होती. आप्पांनी किशोरकुमारची मस्त गाणी लावली आणि चहा गाळणार तेवढ्यात दारावरची बेल वाजली. अप्पांनी दार उघडले. दीप्ती आणि सोहम दोघांना एकत्र बघून अप्पा आश्चर्याने म्हणाले, “अरे वा....आज जोडीनं.. वा वा छान एकदम करेक्ट टाईमिंग आहे... चहाच गाळत होतो. या मस्त फ्रेश होऊन.. गरमागरम चहा घेऊ”.

दीप्ती म्हणजे आप्पांची मुलगी आणि सोहम जावई. दीप्तीची आई जाऊन पंधरा वर्ष होऊन गेली होती. अप्पांनीच दीप्तीला आईच्या मायेने वाढवलं आणि दोन वर्षांपूर्वी तिचं लग्न लावून दिलं. सोहम आपल्या आत्याकडेच लहानाचा मोठा झाला. दोघांचा ही जॉब मुंबईतच असल्याकारणाने त्यांनी लग्नानंतर मुंबईत फ्लॅट घेतला.. आणि अप्पा एकटेच महाडला राहत होते. मग दीप्ती आणि सोहमच्या आग्रहाखातर ते दीप्तीच्या नवीन घरी राहायला गेले. सोहमचा मार्केटिंगचा जॉब तर दीप्ती आय. टी. मध्ये होती. सहसा ही दोघं ऑफिसमधून एकत्र घरी येत नसत. सोहमला घरी येईपर्यंत रात्रीचे दहा वाजायचे तर दीप्ती आठ-साडेआठपर्यंत घरी यायची. राधाबाई घरी येऊन जेवण बनवून जायच्या.

आता सोहम आणि दीप्ती दोघेही फ्रेश होऊन आले. आप्पांनी मस्त आल्याचा चहा आणि पार्ले बिस्कीटं ठेवली. “हं, घ्या मस्त गरमागरम चहा...” आणि चहाचा पहिला भुरका घेताच ते म्हणाले, “वा सगळ्यांसोबत एकत्र चहा घेण्याची मजा काही औरच.”

दीप्ती आणि सोहम आल्यापासूनच जरा बेचैन दिसत होते आणि अप्पांच्या ह्या वाक्याने तर दीप्तीची बेचैनी तिच्या डोळ्यात अजूनच स्पष्ट दिसू लागली.

अप्पांच्या नकळत तिने चेहऱ्यावरचे भाव लपवत चहाचा मग हातात घेतला आणि ती म्हणाली, “मस्तच झालाय हं चहा”

“हो ना एकदम फक्कड...आल्याचा स्वाद मस्तच.”

सोहम आणि दीप्ती जणू सर्व नॉर्मल असल्यासारखे बोलू लागले. आप्पांनी उठून किशोरकुमारची गाणी थांबावली आणि विचारले, “काय झालंय बाळांनो? मी मघापासून बघतोय, तुमचं काही बिनसलंय का?”

"छे छे मुळीच नाही अप्पा" सोहमने विषय बदलण्याचा प्रयत्न केला. पण दीप्तीच म्हणाली, "सोहम, सांगून टाकू. अरे बावीस वर्षं सरकारी न्यायालयात जजचं काम केलंय त्यांनी, आपले कोणतेही भाव लपून राहू शकणार नाहीत त्यांच्यापासून."

अप्पांनी दीप्तीकडे बघून फक्त smile केलं अन त्यांनी सोहमकडे पाहिलं.

सोहम घसा खाकरतच म्हणाला, "अप्पा....मला परदेशी जाण्याची ऑफर आलीय आणि.... दीप्तीची इच्छा आहे की ती मी स्वीकारावी."

अप्पांचा चेहरा काही क्षणापुरता पडला पण चहाचा घोट गिळत चेहऱ्यावर आनंदाच्या आविर्भावाने ते म्हणाले, "वा छानच की.. तू ही ऑफर नक्कीच स्वीकार. दीप्ती बेटा, तुलाही तिथेच suitable जॉब शोध.... माझी मुळीच काळजी करू नका. मी राहीन महाडला.... अरे तिथे माझा मोठ्ठा मित्रपरिवार आहे.... मी मस्त राहीन हो तिथे......" न्यायालयातील नोकरीत एखाद्याला आमरण तुरुंगवासाची शिक्षा सुनावताना जो त्रास अप्पाना व्हायचा तसंच काहीसं त्यांना भासू लागलं. त्यांना ह्या गोष्टीची पूर्ण कल्पना होती, की त्यांचे महाडचे बरेचसे मित्र आता राहिले नव्हते. काहींना देवाज्ञा झाली होती तर काही त्यांच्या मुलांबरोबर इतरत्र वास्तव्यास गेले होते.

चहा संपेपर्यंत शांतता पसरली होती.

आता पाऊसही थांबला होता.

दीप्ती सोहमने वॉक घेण्यासाठी गच्चीत जाण्याचं ठरवलं . तितक्यात, "बाळांनो, सावकाश जा हो गच्चीत, पावसाने घसरडी झाली असेल" आप्पा काळजीने म्हणाले. सोहम आणि दीप्तीने एकमेकांकडे पाहिले आणि नजरेनेच त्यांनी एकमेकांचे भाव जाणले.

आप्पा, दीप्ती आणि सोहम गच्चीत जाईपर्यंत त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होते. ते दिसेनासे झाल्यावर आप्पांनी अलगद दार लावलं. त्यांच्या पोटात एकाकीपणाच्या भीतीचा मोठ्ठा गोळा आला. अप्पा त्यांच्या रूममध्ये गेले आणि दीप्तीच्या आईच्या फोटोकडे एकटक बघत राहिले . दीप्तीचं लग्न झाल्यानंतर मुलांच्या आग्रहाखातर आप्पा मुंबईला आले आणि त्यांना सोहम सारखा मुलगाही लाभला...दोघांचा शनिवार रविवार बुद्धिबळाचा, रम्मीचा मस्त खेळ रंगत असे आणि क्रिकेट तर दोघांचा जीव की प्राण... पण आता हे सगळं आठवणीतच राहणार होतं. दारावरची बेल वाजली. आप्पांनी पटकन डोळे टिपले आणि डोळ्यावर चष्मा चढवला. दार उघडले, तर राधाबाई जेवण करायला आल्या होत्या.

“आप्पा, काय बनवू आज? तुमच्या आवडीची अळूची पातळ भाजी बनवू? राधाबाईंनी फ्रिजचा दरवाजा उघडत विचारलं.

“नको अग. ती भाजी सोहमला विशेष नाही आवडत... तू भरली भेंडी कर आणि थोडा गोडाचा शिराही कर. सोहमला भेंडी खूप आवडते आणि दीप्तीला गोड शिरा......”

“आज काय इशेष? मंजी गोड धोड न भरली भेंडी?” पदर खोचत राधाबाईनी विचारलं.

“अग, मुलांना आवडतं ना.... तेच विशेष आणि आमचा सोहम आणि दीप्ती तर...”अप्पा एकदम गप्प झाले.

राधाबाईंनी स्वयपाक करायला सुरुवात केली तसे अप्पा हॉलमधील त्यांच्या आराम खुर्चीत बसले. गंभीर मुद्रेने येणाऱ्या भविष्याचा विचार करू लागले. दीप्ती सोहमच्या सहवासाची त्यांना सवय झाली होती आणि ती सवय आता सोडावी लागणार होती. दीप्तीची आई गेली त्यावेळेसही असंच काहीसं त्यांना वाटून गेलं पण त्यावेळेस दीप्तीच्या संगोपनात आणि त्यांच्या सरकारी नोकरीत त्यांनी स्वतःला व्यस्त ठेवलं. पण आता परिस्थिती वेगळी होती. ही सवय सोडणं आप्पांना खूपच कठीण वाटू लागलं..आणि या विचारात एक तास कसा निघून गेला ते त्यांना कळलंही नाही

तेवढ्यात, “अप्पा, उद्या येते, जेवण झाकून ठेवलंय ताईंना तेवढं गरम करून वाढायला सांगा.” राधाबाई स्वयंपाक आटपून घरी जाण्यासाठी निघाल्या. दार उघडलं, तर समोरच दीप्ती आणि सोहम येताना दिसले.

“ताई, येते मी जेवण गरम करून घ्या.” राधाबाई प्रेमळ ऑर्डर देऊन गेल्या. दीप्तीने हसून होकार्थी मान डोलावली.

दीप्ती सोहम दोघेही फ्रेश होऊन आले. आज सोहमनेच देवापुढे दिवा लावला आणि तो थेट अप्पांच्या पायाशी येऊन बसला. “अरे, हे काय? इथं कुठं?” अप्पा एकदम गडबडून गेले . पण आप्पांचं एक न ऐकता सोहम बोलू लागला, “आप्पा, मी आणि दीप्तीने खूप विचार करून असा निर्णय घेतलाय, की तुम्ही आमच्यासोबत परदेशी येणार असाल तरच मी ही ऑफर स्वीकारेन नाहीतर आपण इथेच राहू... तुम्ही आम्हाला आमच्या सोबत हवे आहात कायम.” आता मात्र आप्पांना काय बोलावे हे सुचेना. त्यांना गहिवरून आलं त्यांनी सोहमच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला आणि त्यांचा आनंद त्यांच्या डोळ्यातून वाहू लागला.

विपुला अधिकारी

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१
*॥ इतिहासमंच ॥*
प्रस्तुत करत आहे

# लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर
## भाग-२
### व्याख्यानमाला: श्री. नितीन आपटे

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर,
शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले

वेळ: शुक्रवार, २२ ऑक्टोबर २०२१
रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१
बोलका कट्टा
सहर्ष सादर करत आहे
प्रसिद्ध अभिनेत्री व संवाद लेखिका
मुग्धा गोडबोले
ह्यांच्याशी गप्पागोष्टी
रविवार २४ ऑक्टोबर,२०२१
वेळ स. ९.००(CST) सं ७.३०(IST)
स्थळ: यू ट्यूब लाईव्ह
http://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

MAHARASHTRA MANDAL
CHICAGO
महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१
|| अध्यात्मपीठ ||
सादर करीत आहे
"मेघमणी"
संतकथा, भक्तिगिते, ओव्या यांचा सुरेल कार्यक्रम
संगीत:
हेमंत साने
गायिका:
आकांक्षा पालकर-परमार
लेखन-सादरीकरण:
मेघना साने
सहगायिका: सुप्रिया महाजन, निलिमा सबनीस, रुचिता कांबळी, माधुरी काळे
दिनांक: गुरुवार, २८ ऑक्टोबर २०२१
वेळ: रात्री ८:०० - ९:३० (शिकागो स्थानिक वेळ)
आयोजन: उर्मिला दामले, उल्का नगरकर,
अनिरुद्ध दामले, सुजाता महाजन,
माधव गोगावले, सौरभ नेकलीकर व चेतन रेगे
प्रस्तुत कार्यक्रम महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या यूट्यूब चॅनलवरून
थेट प्रक्षेपित केला जाणार आहे. तरी खालील लिंक द्वारें
कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा
https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१
*॥ इतिहासमंच ॥*
प्रस्तुत करत आहे

# छत्रपती शिवाजी महाराज
# आणि
# स्वातंत्र्यवीर सावरकर
## व्याख्यानमाला: श्री. नितीन आपटे

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर,
शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले
वेळ: शुक्रवार, २९ ऑक्टोबर २०२१
रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

# शब्द

दिला की त्यास म्हणतात वचन
बंबाळ केले तर मात्र होते प्रवचन

झेलला तर त्यात राखले आहे भान
टाकला तर तुमचाच आहे त्यात मान

छल म्हणजे उगाचच काथ्या कूट
कोषात सापडते अर्थाचे मेतकूट

वाढवला तर तो मानसिक वार आहे
साधनेत मात्र या भाषेचे सार आहे

कोड्यात राखा उभ्या-आडव्याचे भान
रचना याद्वारे हे आहे माझे योगदान

अभिजित रायरीकर

# शब्दकोडे

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | | ४ | | ५ | | ६ |
| | | | | | | | | | | |
| ७ | | | | ८ | ९ | | | १० | | |
| | | | | | | | | | | |
| ११ | | १२ | | १३ | | १४ | | १५ | | |
| | | १६ | | | | १७ | | | | |
| १८ | | | | १९ | २० | | | २१ | | २२ |
| | | | | | | | | | | |
| २३ | | २४ | | २५ | | २६ | | २७ | | |
| | | | | | | | | | | |
| २८ | | | | | | २९ | | | | |

अभिजित रायरीकर

## उभे शब्द

१. असमानता, शत्रुत्व
२. दाणेदार, कणीदार
३. मऊ, मुलायम, बारीक विणीचे
४. कायदा, अट, ठराव
५. भराव, निरनिराळ्या आकाराच्या दगडांचा समुदाय
६. ९३ साली क्रिकेट विश्वचषक जिंकणारा भारताचा कर्णधार
९. ढंग, शैली, धाटणी
१२. शंकराचे वाद्य
१३. सर्व जण, लोक समुदाय
१४. दौड, (घोड्यावरची) सफर
१५. आंगण, परसू
१८. (लग्नात) वाद्य वाजवणारे
२०. लोखंडाचे सोने करणारा दगड
२२. आप्त, नातलग
२४. आलाप, तान
२५. अजागळ, खुळचट, वेडसर
२६. नौबत, मोठा ढोल, चर्मवाद्य
२७. गोल, वर्तुळ

## आडवे शब्द

१. तत्त्ववेत्ता, मर्मज्ञ
४. मतदारांनी उमेदवार पसंत करण्याची कृती
७. मृदू, शांत, कोमल
८. जखमेवर लावायचे स्निग्ध औषध
१०. यावनी फलज्योतिषविद्या
११. लग्नाची मिरवणूक
१३. भारी, तीव्र, अवाढव्य
१५. जन्मभराचे
१६. चिंतन, ध्यान
१७. पंतप्रधान
१८. गायीचे पारडू
१९. शीघ्रकोपी
२०. कागदावरचा उभा स्तंभ
२३. तीन पाने असलेले
२४. आवरण, गाठोडे
२७. जंगलात पेटलेली आग
२८. मुलेबाळे असलेला
२९. रसायनाविषयीचे

# दैनंदिन मराठी शब्दप्रयोग कोडे

तुमचे मराठी भाषेचे ज्ञान अजमावून पहा!

मराठी भाषेत असे अनेक शब्द आहेत जे आपल्याला माहीत असतात, पण दैनंदिन व्यवहारात आपण ते वापरत नाही. असे शब्द तीन गटात मांडले आहेत, शब्दांचे वर्गीकरण त्यांच्या सामान्य संभाषणातील वापरानुसार केले आहे.

प्रत्येक शब्दाचे पहिले अक्षर 'प्र' आहे.. 😊 तर बघूया आपल्याला यातील किती शब्द माहीत आहेत?

स्व प्राथमिक

१. खुद्द = ________
२. देखावा = ________
३. उघड, दृष्य = ________
४. खूण, चिन्ह = ________
५. वंदन = ________

प्रबोध

१. उत्तर = ________
२. स्वानुभव = ________
३. फसवणूक = ________
४. तेजस्वी, चेतावलेला = ________
५. उपोदघात = ________

प्रगल्भ

१. अवरोध = ________
२. संध्याकाळ = ________
३. शुद्ध करणे = ________
४. खात्री, अनुभव = ________
५. विखुरलेले = ________

अभिजित रायरीकर

SIMPLIFYING LEGAL PROCEDURES IN INDIA

**MANASI PINGLE**
Advocate & Solicitor
Email : mnpingle@gmail.com
Phone: +91-93222 62270

**Address:**
A-703, Joy Homes, L.B.S. Marg,
Bhandup (West), Mumbai – 400 078

Many Indians who have settled abroad or are working abroad are looking for trustworthy legal advisors to advise and support them on their legal requirements viz. property matters, will, probate, gift deeds, power of attorney, legal documentation in a seamless and professional manner.
Typical challenges pertaining to immovable property matters include understanding the complexity of the paperwork required and procedures to be followed in India.

Areas of expertise:
- Property Matters
  - Sale / Purchase Agreements
  - Leave and licence Agreements
  - Devolution on demise of owner
  - Transfer of property
  - Gift deed
  - Search report
  - Title certificate
- Will
- Probate
- Power of Attorney
- Cooperative society matters
- Registration of legal documents
- Stamp duty payment
- Notary

| Matters | Common Considerations |
|---|---|
| Buying property | ✓ Conduct a proper background check and give a search report and title verification<br>✓ Proper documentation |
| Letting out premises | ✓ As per the latest circular, registration of leave and licence agreement is mandatory<br>✓ Police verification procedure needed |
| Cooperative society matters | ✓ Nomination and Transfer procedures which are in line with the new bye-laws issued by the Maharashtra Government |
| Transfer of property & Gift | ✓ Transfer of property and the different ways viz. release deed, deed of family arrangement, gift, partition, probate of will. It is crucial to decide the correct approach based on the circumstances |
| Selling property | ✓ Getting a fair price for the property and payment of applicable taxes both are critical<br>✓ Securing payment and handing over possession in a timely manner with appropriate safeguards |

DRAPER &KRAMER MORTGAGE CORP.

# Gyan Srivastava

Residential Mortgage Lending

- Home Purchase and Refinance Loan Specialist
- Lender Credit Available to Offset Closing Costs
- Cash-out Refinancing Options Available
- Fixed/Jumbo/Adjustable-Rate Mortgages (ARMs)
- No PMI Program
- In-House Underwriting and Closing
- Investment Properties/Second Homes
- Home Equity Lines of Credit (HELOCs)
- FHA/VA/Interest Only
- Quick Turn Times

*Contact me for a low rate quote and a mortgage consultation!*

Mobile: 630-670-1645 gyan.srivastava@dkmortgage.com
Office: 630-268-5447 www.dkmortgage.com/gyan

701 E. 22nd Street, Suite 125 • Lombard, IL 60148

EQUAL HOUSING LENDER

Gyan Srivastava (IL:031.0027115 NMLS:287055) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (IL:MB.0004263 NMLS:2551) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (NMLS:2551) an Illinois Residential Mortgage Licensee located at 1431 Opus Place, Suite 200, Downers Grove, IL 60515, 630-376-2100. IL: Illinois Residential Mortgage Licensee No. MB.0004263 - Licensed by the Department of Financial and Professional Regulation, Mortgage Banking Division, 100 West Randolph, 9th Floor, Chicago, IL 60601, (888) 473-4858. 02970-01 03/2018

# 'इतिहास मंच'च्या निमित्ताने

इतिहास मंचाचा उपयोग काय?
त्यातून तुम्हाला मिळणार काय?
अहो, प्रश्न नेहमीचेच,
उत्तरे शब्द बदलून सांगणे तेच.
आपसात भांडण तिसऱ्याला फायदा
येऊन लावतो भलताच कायदा.
जुन्या चुकांचा अभ्यास करायचा,
मार्ग प्रगतीचा शोधायचा.
पुढे जाण्याच्या नादात मागे वळून पहा
किती अंतर काटलंय त्याचा अंदाज हवा.
उद्याचं जुनं पुराण आजचं ज्ञान होणार,
पुढची पिढी आपल्याला नावं ठेवणार.
मुठीचा प्रहार त्यात ताकद फार
एकीचे बळ, त्याला नेटका आकार
कष्टांचे मोजमाप,  संकटांची व्याप्ती
मग जाणीव होते भव्यत्वाची,
दुर्दम्य इच्छाशक्तीची, आशा प्रगतीची.
काळाची बंधनं असतात,
तरी कष्ट हे कष्टच राहतात.
ज्ञानात जुनं नवं काहीच नसतं,
फक्त निखालस सत्य असतं.

सुचेता भालेराव

# गेला कूपर कुणीकडे?

थँक्स गिव्हिंगच्या आदल्या दिवशी दिनांक २४ नोव्हेंबर १९७१ रोजी एक गोरा साधारणपणे चाळिशीचा माणूस हातात काळी ब्रिफकेस घेऊन नॉर्थ वेस्ट ओरियंट एअरलाईन्सच्या सिएटलला जाणाऱ्या विमान क्रमांक ३०५ मध्ये पोर्टलँड इंटरनॅशनल विमानतळावरून चढला. उंची सूट, आत काळा टाय, पांढरा शर्ट व डोळ्याला काळा चष्मा या पेहरावातील या व्यक्तीकडे बघून कुणालाही तो एक बिझनेसमन वाटणं सहाजिकच होतं.

त्या आधी त्याने तिकीट काउंटर वर आपले तिकीट कॅश पैसे घेऊन काढलं होतं आणि तिकीट काढताना आपलं नाव डॅन कूपर असं सांगितलं होतं.विमानाच्या अगदी मागच्या बाजूला असलेल्या तीन सीटच्या रांगेमधील मध्यभागी असलेली 18C क्रमांकाची सीट त्याला मिळाली. विमान धावपट्टीवर असतानाच त्याने स्वतःसाठी एक ड्रिंक मागवलं.

दोन वाजून पन्नास मिनिटांनी विमानाने आकाशात भरारी घेतली. विमानाच्या मागच्या भागात जिथे तो बसला होता त्याच्या मागच्याच बाजूला फ्लाईट अटेन्डन्ट फ्लोरेन्स हिची सीट होती. कूपरने आपला हात लांब करून तिच्या हातात एक चिठ्ठी दिली. तिला वाटलं, की तो आपलं बिझनेस कार्ड देत आहे म्हणून तिने ती चिठ्ठी न वाचताच आपल्या पर्समध्ये टाकली तेव्हा कूपर तिला म्हणाला "प्लीज, मी दिलेली चिठ्ठी नीट वाच." ती चिठ्ठी वाचताच फ्लोरेन्स भयचकित झाली. त्या चिठ्ठीत लिहिलं होतं "माझ्याकडे बॉम्ब आहे!"

आता कूपरने फ्लोरेन्सला आपल्या बाजूच्या सीटवर बसवून घेतलं आणि त्याची ब्रीफकेस तिला अर्धवट उघडून दाखवली. आत  खरोखरच एक जिवंत बॉम्ब होता. कूपरने तिला शांतपणे सांगितलं, की "आता मी जे काही तुला सांगतो आहे ते तू इंटरकॉमवरती पायलट आणि बाकीच्या अटेंडंटना सांग. त्यांना सांग, की मी हे प्लेन हायजॅक करत आहे."

विमान फक्त एक तृतीयांश भरल्यामुळे बाकीच्या प्रवाशांना विमानाच्या मागच्या बाजूला काय चाललंय याबद्दल काहीच कल्पना नव्हती. फ्लॉरेन्सने इन्टरकॉमवरती कॉकपिटमध्ये बसलेल्या वैमानिकांना कळवलं. विमानाचा पायलट विल्यम स्कॉट याने अमेरिकेच्या आर्मीत काम केलेलं असल्याने त्याने ताबडतोब सिएटलच्या एअर ट्रॅफिक कंट्रोलला कळवलं आणि परिस्थिती  समजावून सांगितली. विमानात अजून पस्तीस पॅसेंजर आणि सहा कर्मचारी होते.

पायलटने अनाउन्समेन्ट केली, की काही तांत्रिक कारणामुळे आपलं विमान सियाटलला उतरण्यास विलंब होणार आहे त्यामुळे सर्व प्रवाशांनी शांत बसावे.

इकडे कूपरने आपल्या मागण्या पायलटमार्फत खाली कन्ट्रोल रूमला कळवल्या. त्याला दोन लाख डॉलर कॅश आणि चार पॅरॅशूट हवे होते. लक्षात घ्या, त्या काळातले दोन लाख डॉलर म्हणजे आजचे जवळपास दीड मिलियन डॉलर. सिएटलच्या पोलिसांनी आणि एफ.बी.आय.ने सांगितलं, की आम्ही तुझ्या मागण्या मान्य करू, मात्र आम्हाला जमवाजमव करायला दोन तास लागतील.

कूपरच्या एकंदरीत बोलण्यावरून त्याला विमान, आकाश टेहाळणी आणि पॅराशूट वापरण्याचे ज्ञान असावे. विमान हायजॅक केल्यानंतर देखील कूपरने अजिबात आवाज चढवला नाही. अत्यंत शांतपणे आणि विनम्रपणे त्याने आपल्या सूचना केल्या. विमान आकाशात घिरट्या घालत असताना त्याने अजून एका पेयाची ऑर्डर दिली आणि त्याचे पैसे कॅशमध्ये अटेन्डन्टला दिले. सिएटलला जेव्हा विमान थांबेल तेव्हा जर क्रूला जेवण करायचं असेल तर ते देखील विमानात मागून घ्या अशी त्याने सूचना केली. एफ.बी.आय. एजंटने पैसे जमा झाल्याचे ५:२४ ला कळवल्यावर साधारणपणे संध्याकाळी ५:३९ मिनिटांनी विमान धावपट्टीवर उतरलं आणि एका निर्जन अशा टोकाला जाऊन थांबलं. सूर्यास्त त्याआधीच झाल्यामुळे विमानतळावर अंधार होता. एका विमान अधिकाऱ्यांच्या मार्फत मागितलेली कॅश आणि चार पॅरॅशूट विमानात एका अटेंडंटच्या मार्फत पोहोचते करण्यात आले. आपण मागितलेल्या गोष्टी मिळाल्या हे बघितल्यावर कूपरने सर्व प्रवासी आणि सहापैकी दोन क्रू मेंबर्सला खाली उतरण्याची सूचना केली. बहुतेक सगळ्या प्रवाशांना उतरल्यावर देखील कल्पना नव्हती, की आपलं विमान हायजॅक झालं होतं.

विमानात पुन्हा एकदा फ्युएल भरण्यात आलं. कूपरने आता विमान तेथून २८१८ मेल लांब मेक्सिको सिटीला घेऊन जा असे सांगितले परंतु पायलट म्हणाला, की आपल्याला इतकं लांब जाता येणार नाही. आपल्याला एका ठिकाणी मध्ये कुठेतरी थांबावं लागेल आणि पुन्हा एकदा इंधन भरावे लागेल. पायलटने कूपरला चार विमानतळाचे पर्याय दिले. त्यातला नेवाडा राज्यातील रेनो हा विमानतळ कूपरने पुन्हा पेट्रोल भरण्यासाठी निवडला. बोईंग 727-51 जातीच्या विमानाला शेपटीच्या खाली एक प्रवाशाला उतरता येईल असा दरवाजा असतो. उड्डाण करताना कूपरने हा दरवाजा उघडा ठेवा असा आदेश दिला परंतु विमानाच्या सहवैमानिकाने हे धोकादायक आहे त्यामुळे अशा पद्धतीने आपण टेक-ऑफ करू नये हे त्याला समजावून सांगितलं. हे त्याने मान्य केलं मात्र विमान किती उंचीवर न्यायचे, त्याचा वेग किती असावा आणि उडाल्यावर देखील विमानाची चाके पोटात घ्यायची नाहीत या सूचना त्याने

वैमानिकांना दिल्या. त्याप्रमाणे वैमानिकांनी विमान उडवलं. यावेळी संध्याकाळचे सात चाळीस झाले होते. या विमानाच्या उड्डाणाच्या बरोबरच अमेरिकन नौदलाची दोन विमानं सुरक्षित अंतर ठेवून विमानाच्या मागावर निघाली. दुर्दैवाने हवामान खराब असल्याने बाहेर प्रचंड पाऊस आणि विजांचा कडकडाट होत होता. कूपरने आपल्या बाजूला बसवून घेतलेल्या अटेन्डन्टकडून विमानाच्या शेपटीकडचा दरवाजा कसा उघडायचा हे समजावून घेतलं आणि तिला सांगितलं, की तू आता बाकीच्या लोकांबरोबर कॉकपिटमध्ये जाऊन बस आणि बाहेर येऊ नकोस. रात्री आठ वाजून तेरा मिनिटाच्या सुमारास कॉकपिटमध्ये बसलेल्या लोकांना विमानास जरा हादरा बसल्याचं जाणवलं पण मग काही क्षणातच त्यांनी विमान परत एकदा स्थिर केलं. विमानाला हादरा बसला तेव्हा कूपरने शेपटीकडच्या दरवाजातून जवळपास १०,००० फुटांवरून पॅराशूटसह विमानातून उडी मारली होती. त्याच्या अंगात काळे कपडे असल्यामुळे आणि वादळी हवा पाऊस असल्यामुळे तो रडारवर किंवा त्याच्या मागावर येणाऱ्या विमानांना दिसला नाही.

दुसऱ्या दिवशीपासून जिथे त्याने अंदाजे उडी मारली असावी त्या सर्व भूभागाचा प्रचंड मोठ्या प्रमाणात शोध घेण्यात आला. अतिशय अथक परिश्रमानंतर देखील त्याचा मागमूस लागला नाही. काही तज्ज्ञांचे म्हणणं होतं, की तो कदाचित अशा पद्धतीचे डेन्जरस स्टन्ट केल्यामुळे मृत्युमुखी पडला असावा परंतु त्याचा मृतदेह किंवा पैशाची बॅग किंवा पॅरॅशूट यापैकी काहीही कुणाला सापडलं नाही. नाही म्हणायला १९८० मध्ये म्हणजे घटना होऊन गेल्यानंतर नऊ वर्षांनी आश्चर्यकारकरीत्या त्याने जिथे उडी मारली असावी असा अंदाज होता त्यापासून बत्तीस किलोमीटर लांब पाच हजार डॉलरच्या नोटा आठ वर्षाच्या एका छोट्या मुलाला नदीकाठी सापडल्या. त्याच्या वडिलांनी त्या पोलिसांकडे जमा केल्या. नोटांच्या सिरीयल नंबरवरून पोलिसांना कळले, की या नोटा कूपरला दिल्या गेल्या होत्या मात्र बाकीचे पैसे कधीच सापडले नाहीत. असे म्हणतात, की कूपर हे नाव देखील खोटं असावं. कूपरचा बराच शोध घेण्यात आला पण तो कधीच सापडला नाही.

शेवटी जुलै २०१६ मध्ये एफ.बी.आय.ने अधिकृतरीत्या ही फाईल बंद केली. आजतागायत कोणालाच माहीत नाही, की हा कूपर नेमका कोण होता? अमेरिकेच्या गुन्हेगारी जगतातील हे एक अदभुत, न उलगडलेले गूढ आहे.

सत्यजित खारकर

# जीव

माणसाने माणसाला लावावा जीव
शब्दांचे जीवघेण्या, न द्यावे हींव.
माणसाने जडवावा जिवावर जीव
नये तोडू मैत्र, जिवात असेतो जीव.
माणसाने टाकावा ओवाळून जीव
नये खेळू जिवाशी, जपावी ठेव.
जिवात जीव असेतो, करावे प्रेम
जीवन जाईतो पुसावे, कुशल क्षेम.
जिवाच्या आकांताने मारावी हाक
जिवास जीव देणारे, जमवावे लोक
जीवघेणे असते, कुणासाठी झुरणं
जीव देऊ नये, राखावं बेणं.
जीवेभावे करावी, वडिलांची सेवा
जीव ओतून जगणे, हाच खरा ठेवा

कल्पना कोठारे

# माशाची कोशिंबीर / कळपुटी

बघता बघता, २०२१ वर्षातला ‘रचना’चा हा चौथा अंक. या वर्षीची ही शेवटची पाककृती सादर करताना मला आनंद तर होत आहेच, पण थोडी हुरहूर सुद्धा आहे. या वर्षी मला ‘रचना’मध्ये लिहिण्यासाठी विचारल्याबद्दल संपादिका रश्मी चाफेकर आणि अध्यक्षा उल्का नगरकर यांचे मनःपूर्वक आभार.

तुम्ही बऱ्याच पद्धतीच्या कोशिंबिरी केल्या असतील, पण आजची ही कोशिंबीर अगदी खास आहे. ही आहे माशांची. गिरगावातील ‘सत्कार’ हॉटेलमध्ये ही मी प्रथम खाल्ली होती आणि नंतर ती माझी अगदी आवडती कोशिंबीर बनली. ही पाककृती शिकवल्याबद्दल माझी वहिनी सौ दीपाली जव्हेरी हिचे खूप आभार!

साहित्य:-

- माशाचे आठ ते दहा छोटे तुकडे
- अर्धा चमचा हळद
- अर्धा चमचा मीठ
- अर्धा चमचा लाल तिखट
- अर्धा चमचा मिरी पावडर
- अर्धी वाटी ओले खोबरे
- अर्धा चमचा कोकम आगळ किंवा तीन ते चार कोकम (तुम्हाला आंबट जसे आवडत असेल तसे)
- अर्धा छोटा कांदा बारीक चिरलेला
- एक मोठा चमचा तेल
- अर्धा चमचा हिंग

कृती:-

1. हळद, मीठ, मिरी पावडर, ओलं खोबरं, कोकम/आगळ आणि लाल तिखट, माशाच्या तुकड्यांना लावून अर्धा तास ठेवावे.
2. पातेल्यात तेल गरम झाल्यावर, हिंग घालावे.
3. नंतर कांदा परतवून गुलाबी करून घ्यावा.
4. नंतर माशाचे सर्व तुकडे घालावे.
5. झाकण ठेवून मस्त शिजू द्यावे.

ही माशाची कोशिंबीर गरम वरण भाताबरोबर किंवा सोलकढी भाताबरोबर किंवा चपातीबरोबर मस्त लागते.

नक्की करून बघा आणि तुमच्या प्रतिक्रिया कळवा. काही प्रश्न असतील तर मला ratnangimmc@gmail.com या संकेतस्थळावर ई-मेल पाठवा.

रत्नांगी निलेश मालपेकर

# Thai Red Curry Noodle Soup

Perfect recipe for quick lunch or Dinner. You can also give this recipe to your college going kid to make in a jiffy. Perfect Flavors and Noodles make it oh so satisfying.

Why we love this recipe:

- Excellent one pot meal
- Easy to make
- Easy to swap out the veggies

Ingredients:

- 1 Tbsp. Coconut oil or Canola Oil
- 1 Onion red or yellow chopped
- 1 Red Bell pepper chopped
- 3 cloves Garlic
- 1 inch Ginger minced
- 1 Small head of Bok Choy
- 3 Tbsp. Thai Red curry paste
- 2 Tbsp. Soy Sauce
- 3 Cups Vegetable Broth
- 1 can Coconut Milk
- 1 Tbsp. Lime Juice
- 4 oz. Japanese Udon Noodles or Pad Thai Noodles dry weight

Instructions:

1. Chop Onion, Red Bell Pepper and Bok Choy in medium to small pieces.
2. In a large Saucepan, take One Tbsp. of oil and heat on medium flame.
3. Add Onion and Sauté for 2 minutes. Add Red Bell Pepper and Bok Choy, sauté for another minute.
4. Add Ginger and garlic to the pan and sauté for 30 seconds.
5. Vegetables should look roasted but not fully cooked
6. Add Vegetable Broth and Red Curry Paste and bring to boil
7. Add Soy Sauce and let simmer for another minute
8. Add Water from Coconut Milk can (Keep the Milk solids for later) and Noodles and let simmer depending on Noodle cooking time. Check the Noodle packaging for cooking time.
9. If the Noodle cooking time is 10 minutes then let simmer for about 8 minutes.
10. Add Coconut Milk Solids and mix well. Sprintz some Lemon if you so fancy
11. Cover and keep for 10 minutes before serving for Noodles to cook through

Storing and making ahead tips:

The soup is preferably to be eaten within an hour of making. If you would like to make ahead, make the soup but do not add Noodles. Keep refrigerated for up to two days and add cooked noodles when reheating.

Amita Bhalerao

# Team Admins

## साहित्य कट्टा

रश्मी चाफेकर

अश्विनी कुंटे

सुजाता महाजन

श्री चाफेकर

उल्का नगरकर

# अध्यात्म पीठ



अनिरुद्ध दामले

सुजाता महाजन

उर्मिला दामले

चेतन रेगे



माधव गोगावले

उल्का नगरकर

सौरभ नेकलीकर

# इतिहास मंच

प्रसाद अथणीकर

चेतन रेगे

उल्का नगरकर

शलाका रेगे


माधव गोगावले

## ढिपाडी-ढिपांग (Dance)

प्रिया पाटणकर

केतकी देशपांडे

प्रियांका पारेख

उल्का नगरकर

## ज्येष्ठ नागरिक

स्वाती पवार

उल्का नगरकर

## आम्ही सारे गवय्ये (Karaoke)

रश्मी चाफेकर

विकास तरडे

मितेश देशपांडे

निलेश जोशी

उल्का नगरकर

## चाय-टाऊन अंगत पंगत (Food)

स्वाती पवार

अवनी देशपांडे

उल्का नगरकर

## MMC माझा बातम्या

रश्मी चाफेकर

प्रसाद अथणीकर

अश्विनी कुंटे

उल्का नगरकर

## MMC शाळा आणि ढोल ताशा

संजीव कुलकर्णी

प्रसाद अथणीकर

उल्का नगरकर

## परंपरा - Local Festival

भारती वेलणकर

दिपा कामत

उल्का नगरकर

## Finance & Marketing

अभिजित रायरीकर

वैभव शृंगारपुरे

उल्का नगरकर

## MMC लेझीम, बाल लेझीम आणि क्रीडांगण (Sports)

प्रसाद अथणीकर

उल्का नगरकर

## दृक्–श्राव्य रचना

रश्मी चाफेकर

श्री चाफेकर

प्रसाद अथणीकर

आशिष नगरकर

उल्का नगरकर

# अश्शी कश्शी कॅथरिन...

दिवसभर झोपा काढते
रात्रभर दंगा करते
जिवाचं ही रान करते
अश्शी कश्शी कॅथरिन ?

सगळा खाऊ फस्त करते
द्यावे तितके हवेच म्हणते
पाणी पिताना डोळे मिटते
अश्शी कश्शी कॅथरिन ?

कुंडीतील माती खाली फेकते
खेळणी सोडून सगळं खेळते
सैरावैरा पळत असते
अश्शी कश्शी कॅथरिन ?

खिडकीबाहेर बघत बसते
पक्ष्याप्राण्यांशी गप्पा करते
सर्वांशी कसं जुळून घेते
अश्शी कश्शी कॅथरिन ?

पायामध्ये घुटमळत असते
कपड्यांमध्ये घुसून बसते
सतत सोबत फिरत असते
अश्शी कश्शी कॅथरिन ?

मूल असे वा माऊ म्हणावे
म्याऊ म्याऊ ने कर्ण भरावे
सार्थ सोबती धन्य व्हावे
अश्शी अश्शी ही कॅथरिन !

मिलिंद साळी

# गोकुळ

गोकुळ म्हटले, की नंद-यशोदेचे गाव व कृष्णाने गोपांबरोबर केलेल्या खोड्या, गवळणींना दिलेले त्रास हेच आठवतात. दह्या-दुधाचे घडे डोक्यावर घेऊन मथुरेच्या बाजारात दही दूध विकायला जाणाऱ्या गवळणी व पाणवठ्यावरून परतणाऱ्या गवळणींच्या घड्यांना खडे मारणारा श्रीरंग हेच सारे आठवते ना!

माझे माहेर खरंच गोकुळ होते. जिथे म्हातारी माणसे व त्यांच्याकडून लाड करून घेण्यासाठी मुले व नातवंडे भरपूर असतात, त्या घराला गोकुळ म्हणतात. माझे माहेर अगदी तसेच मुंबईत अंधेरीला होते.

पन्नास-पंचावन्न वर्षे माझे माहेर त्याच घरात होते. मला चार भावंडे होती आम्ही सर्वच मोठे होऊन लग्न होऊन आपापल्या घरी राहात होतो. अंधेरीला सगळ्यात धाकटा भाऊ वहिनी व त्यांची मुलगी राहात होते. ते माझ्या आई-वडिलांची काळजी घेत असत. घरातली नात सतत आजोबांच्या मागे असे. ते पूजेला बसले, की तिची बैठक आजोबांच्या मांडीवर मधोमध असे. तिला वाटे, माझेच आजोबा व आजी पण माझीच एकटीची. आम्हा सर्व भावंडांना दोन दोन अपत्ये होती. सणावारी सगळेच अंधेरीला जमत. घर फक्त तीन खोल्यांचा ब्लॉक होता पण सर्व मुले तिथेच जमत. अगदी गणपती दसरा दिवाळीला आम्ही सर्व एकत्र तिथेच भेटत होतो .आई वहिनी व बहीण मिळून सारा स्वयंपाक करत. मी मात्र घरात सासू-सासरे मुले व आम्ही दोघे साऱ्यांचे नाश्तापाणी आवरून दादरहून अंधेरीला सगळे जाईतो बारा वाजत. त्यामुळे मी फक्त पाने वाढणे एवढ्याच कामाला पोहोचत असे. घरात व अंगणात मुलांची धावपळ चालूच असे. त्यांच्याकडे लक्ष ठेवण्याचे काम माझे बाबा म्हणजेच मुलांचे आजोबा करीत. तळमजल्याला घर असल्याने पुढच्या मागच्या दारातून घराला वळसे घालून पळापळी सर्व मुले खेळत. कुणी पडले वा खरचटले तरच भोकाड ऐकायला येई. पण लगेच हळद लावून धोतराच्या फडक्याची पांढरीशुभ्र पट्टी बांधली जायची व पोरं खेळू लागत.

जेवणाची शिस्त, वदनी कवळ घेता म्हणायचे, सगळे खायचे, पानात काहीही टाकायचे नाही. नावडती वस्तू आधी खायची, असे नियम सर्वच मुले पाळत. त्यांच्या पंगतीला आजोबाही जेवत. जेवण झाले, की आजोबा व मुले पत्ते खेळत, सावकार भिकार. फक्त रंग जुळला की हात. तिथेसुद्धा पत्ते वाटताना बोबडकांदा असलेल्या नातवंडांची भांडणे चालत. आजोबा सगळ्यांना सांभाळत. नुसते बघायला पण मजा यायची. त्यांच्या पत्त्यांमुळे आमची जेवणे शांतपणे होत. जेवण झाल्यावर एखादा भाऊ दोन-चार फोटो काढे.

फोटोसाठी सगळी मुले दाटीवाटीने आजोबांजवळ बसत त्यात चार पाच जणं तेव्हा बोबडकांदा होती जो तो म्हणे “मादे आदोबा”. मांडीवर मधोमध घरातली नात मग दोन मांड्यांच्या टोकाला दुसऱ्या दोघी नाती, मग ढकलाढकली करून छोटा मुलगा जागा करून घेई. माझी मुले थोडी मोठी असल्याने आजोबांच्या खांद्याजवळ उभी राहात.फोटो झाला की पुन्हा पळापळी खेळत. तोच फोटो माझ्या माहेरच्या गोकुळाची आठवण आहे. “मादे आदोबा” म्हणत ढकलाढकली करत कुणी त्यांना “आबो” म्हणत तर कुणी “आबोजा” तर छोटी नात “आबू” म्हणे. मग आजोबा सांगत “मी सगळ्यांचा आजोबा आहे कुणी भांडायचं नाही”. दुपार कशीबशी थोडे झोपत व आई बरोबर कुजबुजत जाई. संध्याकाळी ओवाळायचे असायचे, की पुन्हा गोकुळाचा तोच सीन असायचा. त्यात शेजारच्या कुटुंबातल्या चार नातवंडांचीही भर असे. पण दिवाळीत ते गावी जात म्हणूनच नसायचे. नाहीतर दसऱ्याला सकाळपासून रात्री ओवाळणे झाल्याशिवाय तेही आजोबांवरचा हक्क सोडत नसत. सोने देऊन पाया पडायला आईवडील आले, की त्यांच्याबरोबर नाईलाजाने घरी जात त्यानंतर आम्ही ही सर्व परतत असू.

दिवाळीत भाऊबीजेला गंमत असे. मला व मोठ्या भावाला व बहिणीला एक एक मुलगा मुलगी होते पण मधल्या दोन भावांना दोन दोन मुली होत्या त्यामुळे मुलगे तीन व बहिणी सात. त्या दिवशी भाऊ बहिणींच्या तेल चोपडण्याच्या भीतीने आधीच आंघोळ उरकून अंधेरीला येत. पक्वान्नाचे जेवण व मुलांचे खेळणे आटोपले, की घरी जाण्यापूर्वी ओवाळण्याचा कार्यक्रम असे. ओवाळणी एक एक रुपयाचे नाणे असे पण ती प्रत्येकीला आपली वेगळी हवी असे. मग मोठ्या नातीपासून छोटी पर्यंत सर्व जणी रांग लावून उभ्या राहात. आईबरोबर सगळ्यांनी एकदम ओवाळावे असे सांगितले, की कलकलाट करत व म्हणत, “आम्ही वेगवेगळ्या ओवाळणार” प्रत्येक जण आईबरोबर ओवाळत असे व तबकातली आपली ओवाळणी आपल्या फ्रॉकच्या खिशात ठेवत असे. ते पाहताना खूपच गंमत वाटायची. पण त्या एक रुपयात केवढा आनंद असायचा! त्यावेळचे गोकुळाचे चित्र पाहिले, की साऽऽरे आठवते.

गौरी गणपतीत गौरी जेवायच्या दिवशी सर्वजण जमत. तेव्हा पुरणपोळी असे. आईच पुरणाच्या पोळ्या करीत असे. मी पुरण वाटून ठेवले, की माझ्या आईपाशी सारी नातवंडे जमा होत. आम्ही आईला मा म्हणत असू. आपले छोटे छोटे हात पुढे करत बोबड्या शब्दात सांगत, “आजीमा थोलुश पुडण दे ग” मग आजीमा सगळ्या छोट्या हातांवर एक एक छोटा छोटा पुरणाचा गोळा देई, असंच पाच-सहा पोळ्यांचे पुरण संपून जात असे. तेवढा एक एक गोळा

खाल्ला, की सगळे बाहेर पळून जात. त्यांना काय संतोष होई तेवढं खाल्ल्याने! आरतीच्या वेळी सगळे मोठ्ठ्या आवाजात गात, जसे उच्चार येतील तस्से म्हणत, टाळ्या वाजवत. एक हात दुखला की उजव्या हातावर डावा मारून टाळ्या वाजवत. त्या प्रेमाच्या गराड्याचा माझ्या आई-वडिलांना कधीच कंटाळा आला नाही. सगळ्या नातवंडांचे त्यांनी भरपूर लाड केले. इतके प्रेम कुठून होते त्यांच्याकडे! त्यांच्या प्रेमाच्या घागरी नातवंडांनी खूप वाटून घेतल्या. आता असे गोकुळ कुठे दिसते?

नीला जोशी

# Life

Life is tortuous
with full of streaks and stain,
No one can refrain from it
unless one faces it with pain.

Sometimes windfall smiles at you
and life gets cherished with cheers
and sometimes it makes you cry
ending it up in deep tears.

Life is full of enigma
everyone caught in a quagmire
One who face it with great courage
deserves to be truly admired!!!

Life is full of hopes
everyone wafts with flow of life
with thin dazzling ray of hopes
for their dreams to shine in the limelight.

Vrushali Anaokar

**महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१**
***॥ इतिहासमंच ॥***
**प्रस्तुत करत आहे**

# छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे नेतृत्व गुण

## व्याख्यान: श्री. प्रसाद तारे

**आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर, शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले**

**वेळ: शुक्रवार, १९ नोव्हेंबर २०२१**

**रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)**

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१ साहित्यकट्टा
सहर्ष सादर करत आहे,
बोलका कट्टा
धमाल एकपात्री प्रयोग 'अस्सा नवरा!'
सादरकर्त्या: कल्पना देशपांडे
स्थळ: यू ट्यूब लाईव्ह
रवि. दि २८नोव्हेंबर, २०२१ सकाळी ९
वाजता (CST)
(रात्री ८.३० भारतीय वेळेनुसार)

**महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१**

**|| अध्यात्मपीठ ||**

सादर करीत आहे

## "आध्यात्मिक उन्नतीसाठी रुद्राक्ष"

**विषयतज्ज्ञ : सौ. संध्या विजय जोशी**

(M.Sc.(Microbiology), B.Ed., PhD in Astrology)

**दिनांक:** गुरुवार, २ डिसेंबर २०२१

**वेळ:** रात्री ८:०० - ९:३० (शिकागो स्थानिक वेळ)

**आयोजन:** उर्मिला दामले, उल्का नगरकर,
अनिरुद्ध दामले, सुजाता महाजन,
माधव गोगावले, सौरभ नेकलीकर व चेतन रेगे

प्रस्तुत कार्यक्रम महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या यूट्यूब चॅनलवरून थेट प्रक्षेपित केला जाणार आहे. तरी खालील लिंक द्वारें कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा

**https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago**

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१

*॥ इतिहासमंच ॥*

प्रस्तुत करत आहे

# सम्राट कृष्णदेवराय - भाग १

## व्याख्यान: डॉ. अस्मिता हवालदार

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर, शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले

वेळ: शुक्रवार, ३ डिसेंबर २०२१

रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

ASKM
ESTATE SOLUTIONS
You Ask, We Do The Task!
Worried about buying or selling properties?
kw INFINITY
KELLERWILLIAMS.
ASK YOUR REALTY PARTNER
Experienced in dealing in out of State properties
HURRY, BOOK AN APPOINTMENT!
YOU ASK, WE DO THE TASK!
If you have any questions related to property,
ASK SANJAY
SANJAY MARATHE
Real Estate Broker
(630) 915-2970 (Cell #) (630) 778-5800 (Office)
608 S Washington St #100, Naperville, IL 60540
www.askmrealty.com sanjaym@kw.com
Search for homes from cell phone
TEXT: KWS8KPH TO: 87778

Archana Paranjape
real estate broker
630.854.9137
arch@atproperties.com
@properties
Stop looking, start finding®
Your Neighbor
Your Realtor
If you have any real estate buying, selling or rental needs in the Chicagoland and surrounding suburban area, then feel free to contact me!
I will be more that happy to help you find your perfect home!
Archana Paranjape
Cell: (630) 854 9137
Email: arch@atproperties.com

BUYING OR SELLING
Your house or investment properties
Total solution at one stop with dependable support team of
Priya Pathak
Call: 805-657-4706
• ATTORNEY • HOME INSPECTOR
• MORTGAGE • MOVING SERVICE
• INSURANCE • CLEANING SERVICE
• HANDYMAN • PROPERTY MANAGEMENT
PROVIDENT REALTY, INC.
Provident Realty Inc.
800 Woodfield Rd. Suite # 105 Schaumburg, IL 60173
847.995.0007 | Email: pathakrealtor@gmail.com
FREE MARKETING ANALYSIS
Call Priya for all your Real Estate needs

# वाट पाहतो मी

त्या टेकडीवर भेटायची तू रोजच, दिवस ते आठव
राहिल्या त्या आठवणी, डोळ्यांत आता आसवांचाच साठव

यायची तू लपत छपत, माझ्या भेटीची ती ओढ
अल्लड तुझे येणे अन् त्याला म्रुदु बोलण्याची ती जोड

झाडाच्या त्या खाली, हसत अखंड तुझ्या त्या गप्पा
तुला बघत नकळत पार झाला, जीवनात हा टप्पा

तुझे लडिवाळ ते बोलणं, मलाही बोलकं करणं
वाटे मज संपुन न जावो, तुझं नकळत मला धरणं

रोमरोमातुनी ग लहरी, जाणिवे जो तू येई मिठीत
क्षणांत का ग गेलीस जशी वाळू सुटून गेली मुठीत

आजही मी रोज येई त्या टेकडीवर, असे ओढ तुझ्या भेटीची
वाटे येशील तू कधीतरी, तुलाही शपथ आहे माझ्या प्रेमाची

त्या टेकडीवर भेटायची तू रोजच, दिवस ते आठव
राहिल्या त्या आठवणी, डोळ्यांत आता आसवांचाच साठव

दीपक नाईक

# दोन शोकांतिका

सुमित्रा आणि मंजुळा या दोघींनी एकाच वेळी मोठ्या नवसाने आपली मुलं जीवन आणि रमण यांना पाच दिवसाच्या अंतराने जन्म दिला. लंगोटी यारच नाहीतर ते बाळूते मित्र होते. जीवन श्रीमंत घरातील आणि रमण त्यांच्याकडे काम करणाऱ्या हरीचा मुलगा. दोघांचेही एकमेकांच्या घरी एकसारखे येणे जाणे असे. जीवनच्या आईने रमणची आई मंजुळाला घर कामासाठी आणि वडिलांना दुकानात कामासाठी ठेवले होते. सालाने काम करणारा गडी होता हरी. रमणची आई मंजुळा अतिशय प्रेमळ होती. आपल्या मुलाप्रमाणेच ती जीवनचीही खूप काळजी घ्यायची. जीवनची आई सुमित्राबाईही जेव्हा जेव्हा रमण जीवनकडे येईल त्यावेळी आपल्या मुलासारखेच त्याला सगळे चांगले पदार्थ खाऊ घालायची. त्याला महागड्या खेळण्याबरोबर पण खेळून द्यायची.

काही काळातच शाळेत दोघेही बाराखडी व पाढे शिकू लागले. जसजसे ते वाढत गेले तसतशी त्यांची गट्टी आणखीनच वाढत गेली. ते दोघे जिवलग मित्र झाले. दोघेही शाळेत चमकदार व खेळातही चांगले होते. एकमेकांना ते नेहमी पाठिंबा देत असत. एकत्र खाणे, खेळणे, अभ्यास करणे - जणू ते जुळे भाऊच! गावात त्यांच्याबद्दल बरीच चर्चा चाले. दोघेही मनमिळाऊ होते, ते वृद्ध माणसांना मदत करत, ज्येष्ठ व्यक्तींशी आदराने वागत. समाजकार्यतही ते हिरिरीने भाग घेत असत मग ती गणपतीची वर्गणी असो किंवा गावच्या यात्रेची, दोघेही बरोबरच जात असत. जर बाहेर कोणी एकमेकांबद्दल वाईट बोलले किंवा छेडलं तर ते दोघे एकत्र येऊन त्यांना गपगार करत.

दोघेही शाळेत चांगलेच चमकू लागले. पहिल्या पाचांमध्ये ते नेहमीच असत. गोड बोलणारे, थोरांना मदत करणारे, अशा वर्तणुकीमुळे गावातील सर्वांचे ते आवडते झाले होते.

काळाच्या गतीबरोबर ते वाढले. दोघेही मॅट्रिकच्या वर्गासाठी तालुक्याच्या गावी गेले. हरी दररोज त्यांचे जेवणाचे डबे घेऊन जात असे. झाल्या एकदाच्या मॅट्रिक बोर्डाच्या परीक्षा!

परीक्षा होताच लगेचच ते गावी आले गावच्या यात्रेचे त्यांना वेध लागले होते. गावातील लोकांचे विशेषतः जीवनचे वडील हिराचंद वाणी यांना यावर्षी गावची यात्रा वेगळ्या प्रकारे करायची होती. हिराचंद वाणी गावातील प्रत्येक सणावारांना सढळ हाताने मदत करत. गावातील हरिपाठ सप्ताह, गणेश उत्सव, जन्माष्टमी, शाळेतील १५ ऑगस्ट व २६ जानेवारी कार्यक्रमांना ते नेहमी मदत करत असत. सर्वांशी ते चांगले वागत असल्यामुळे गावातील एक आदरणीय व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. बैलगाड्यांच्या शर्यती आणि

पहिलवानांचा कुस्तीच्या आखाड्याबरोबर, ह्या वर्षी खास भारुड मनोरंजनासाठी ठेवले होते. एकदम उत्साहात गावची यात्रा झाली.

आता सगळ्यांचे लक्ष लागले होते ते बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाकडे. दोघांनाही चांगल्या यशाची कल्पना व खात्री होती. जसजसा निकालाचा दिवस जवळ येऊ लागला तसतशी त्यांच्या छातीत धडधड वाढत गेली. त्यांच्या केंद्रात पहिल्या दहामध्ये आपल्यापैकी कोण लागणार याबद्दल ते विचार करत होते. शेवटी निकालाचा दिवस उगवला. त्या केंद्रात रमण पहिल्या तीन नंबर मध्ये आला होता. जीवनचे नाव कोठेच नव्हते. सर्वांना वाटले तो नापास झाला. जीवनने हाय खाल्ली.

दुसऱ्या दिवशी खोलीच्या छताशी लटकणारा निर्जीव देह साऱ्यांना दिसला. घरातील मंडळींनी आकांत केला. रमण तर छाती फोडून धाय धाय रडत होता. सुमित्रा आणि हिराचंद याच्या मनावर खूप वाईट परिणाम झाला. शून्यात दृष्टी लावून दोघेही नवरा बायको गप्प होते. नियतीपुढे इलाज नव्हता. दशक्रियाच्या दिवशी शोकसागरात बुडालेल्या हिराचंदकडे एक सरकारी तारवाला आला. हातात तार दिली, मॅट्रिकच्या बोर्डाची तार होती ती. गेलेला जीवन केंद्रात दुसरा आला होता. चांगल्या मार्कांने पास झाला होता. बोर्डाने झालेल्या चुकीची दुरुस्ती केली होती. पण आता नियती काय बदलणार होती? पिंडावर ती पास झाल्याची तार ठेवली. झाडावरून एक मोठा कावळा आला आणि ती तार आपल्या चोचीत घेऊन उंच उडून दूर पसार झाला.

हिराचंद व सुमित्रा त्या धक्क्यातून सावरलेच नाहीत. हरी व मंजुळाने त्यांना खूप सावरण्याचा प्रयत्न केला. हिराचंदची मोठी मुलगी काही दिवस राहिली. रमण पण त्यांची काळजी घेत होता. एक महिन्याच्या आतच हिराचंद् व सुमित्राही देवाघरी गेले. त्यांच्या जावयाने तिथले त्यांचे दुकान व सर्व काही विकून टाकले.

हरी व मंजुळा आपल्या मुलाला तालुक्याच्या ठिकाणी पुढे कॉलेज व स्वतःचा उदार निर्वाहसाठी गेले. पाहिजे ते काम करत आपला उदरनिर्वाह करत करत रमणाला शिकवत होते. त्यांनाही जवळचे कोणीच नातेवाईक नव्हते. रमण मन लावून शिकत होता. हिराचंद वाण्याची आपला मुलगा व रमण यांनी वाणिज्य शाखेत शिक्षण घ्यावे अशी इच्छा होती. त्याप्रमाणे रमण याने वाणिज्य शाखेत चांगल्या मार्कांनी प्रथम श्रेणीत पदवी घेतली. हरी व मंजुळा आता थकले होते. अचानक एक दिवस त्यांनीही ह्या जगाचा निरोप घेतला. रमणवर तर आकाशच कोसळले. रमणची झोपच उडाली होती. पोटात आग भडकत होती. नोकरीसाठी सगळीकडे

वणवण फिरू लागला. पोटात अन्न नाही तर या डिग्रीचं मी काय करू? अनेक ठिकाणी त्याने नोकरीची याचना केली. प्रत्येक ठिकाणी उत्तर एकच - अनुभव नाही तर नोकरी नाही. नोकरीशिवाय अनुभव नाही व अनुभवाशिवाय नोकरी नाही. पहिले अंडे की पहिली कोंबडी यासारखी ही गत होती. सगळीकडे फिरून त्याच्या पायाला फोड आले होते. शिक्षणाला अनुभवाची जोड नव्हती.

शेवटी एक दिवस त्याला एक काळे धंदेवाला माणूस भेटला. त्यांनी त्याला कामाला लावले. मटक्याच्या पावत्या व पैसे गोळा करण्याचे काम दिले. मटक्याच्या पावत्या लिहून लिहून पोटाचा खळगी तो भरू लागला. दिवसामागून दिवस चालले होते पण रमण यात समाधानी नव्हता.  शिक्षणाचा अभिमान दिवसेंदिवस मातीमोल वाटू लागला होता. काळे धंदेवाल्या मालकाने गावाबाहेर एका झाडाखाली पत्र्याचे झोपडीसारखे घर त्याला दिले होते.

पावसाळा आता जोरात सुरू होता. एक दिवस वादळाने एक पत्रा उडाला व मुसळधार पावसाने साऱ्या झोपडपट्टीत पाणीच पाणी आले. सगळी कपडे व त्याच्या डिग्रीचे कागद भिजून ओलेचिंब झाले. साऱ्या सर्टिफिकेटचा लगदा झाला होता. पावसाने सर्व राडा करून टाकला होता. नियतीने व क्रूर समाजाने किती मोठा अविचार, अन्याय त्याच्यावर केला होता? त्याला आता वेगळ्याच कामाचा अनुभव आला होता.

काही दिवसातच मटका किंग खत्री यांच्या कुकृपेने त्याने स्वतः मटक्याच्या बेटिंगचा धंदा सुरू केला आणि जोडीला हातभट्टी पण टाकली. रमण आता असल्या कधीही कल्पना न केलेल्या जीवनात नाईलाजाने रमून गेला होता.



माधव ना. गोगावले

# My Own Chicago

The sun sleeps but the street thrives
This was the moment for which we survive
The signs everywhere light up
Nothing else exists but I feel reality interrupt
I am greeted by the scent of popcorn and coffee
We make our way in, I've never felt so free
For a minute, a moment, just one second
My own personal utopia beckons
A smile spreads to both of my ears
I feel my eyes brim with tears
The lights dim, the room vibrant
Soon, we are all pindrop silent
The notes begin to play
My heart seems to say
That it wishes to stay here forever
Matching the feeling is an impossible endeavor
When it's over, my soul aches to stay
A never-ending serenade it would play
But alas, we must return
To the life from which we tried to turn
Like a dream I woke up from,
Wanting more of it instead of feeling numb
So we leave, the cold air dries my tears
Now it's back to pain, heartache, and fears
I miss the echoing voices, the orchestra pits
I know it will come again so I wait for it

Archisha Pathak

# या चिमण्यांनो

लहानपणी रोज भेटणारी चिऊताई पुण्यातून आता हद्दपार झाली आहे. मेणाचं घर बांधणारी चिमणी, आपली ओली पाटी वाळवण्यासाठी वारा घालणारी चिमणी, पोपटाने "का गं तुझे डोळे ओले?" विचारल्यावर "काय सांगू बाबा तुला, माझा घरटा कोणी नेला" असे कळवळून म्हणणारी चिमणी. अभ्यास करत असताना धीटपणे खोलीत येऊन मान वेळावून काहीतरी खायला शोधणारी चिमणी. आपली बालपणीची पहिली मैत्रीण – तेव्हा शाळेत दोघांनी एकच चिंचेचे बुटुकदेखील खाताना 'चिमणीच्या दातांनी' तोडले जायचे!

एकेकाळी थव्यात वावरणारी, बाहेर अंगणात किडे चापून त्याच 'चिमणीच्या दातांनी' घरातील पोळीचा तुकडा तोडणारी ही बालमैत्रीण अचानक नाहीशी झाली. जुने वाडे गेले, वळचणी गेल्या, नव्या ओनरशिपच्या घरांनी चिऊताईचा घरटा नेला! नव्या संस्कृतीत बंद दारांच्या घरात माणसे राहू लागली. नवरा-बायकोच्या नोकऱ्यांनी, पाळणाघरांनी, पहिलीपासूनच टक्का-टक्का मिळवण्याच्या शर्यतीत लावलेल्या क्लासेसमुळे मुलांचे निरागस बालपण हिरावून घेतले. या जीवघेण्या बदलांमध्ये बिचाऱ्या चिमणीकडे पहायला कोणाला वेळ होता?

मध्यंतरी एक अमेरिका वारी घडली आणि अहो आश्चर्यम! मला माझ्या गावी न भेटणारी चिमणी शिकागोला भेटली. मला तेथे चिमण्या निरखण्याचा छंदच जडला. अमेरिकन चिमण्या दिसायच्या आपल्या चिमण्यांसारख्याच, पण होत्या चांगल्या गलेलठ्ठ – भारतीय आणि अमेरिकन माणसांच्या बांध्यात, खाण्या-पिण्यात जसा फरक असतो, तसा या अमेरिकन चिमण्यांमध्ये असावा. आणि गंमत म्हणजे, पुण्यातल्या चिमण्या सतत चिवचिवाट करत, तर या चिमण्या अबोलपणे गवतात किडे शोधत, पण घरात येत नसत. परदेशातली अपॉईंटमेंट न घेता कुणाच्या घरी जाऊ नये ही शिस्त त्या चिमण्यांच्याही अंगी बाणली असावी. भारतात असताना 'कल्ला' करणारी, बिनधास्त लाल दिवा असतानाही बाईक दामटणारी आपली मुले अमेरिकेत गेली की नाही का रात्री बारा वाजता, पोलीसमामा नसला तरी सिग्नल हिरवा व्हायची वाट पहात?

मला उगीचच वाटले, या चिमण्यादेखील आपल्या मुलांप्रमाणे चांगलं आयुष्य जगण्याच्या ईर्षेने अमेरिकत आल्या असाव्यात. निमूटपणे कडाक्याच्या थंडीत सतत काम करताना त्यांनाही वाटत असेल, पुण्याला जावं, स्वयंपाकघरात शिरून मस्त थालीपीठ किंवा

पोह्यांवर ताव मारावा, मित्र-मैत्रिणींचा घोळका करून एखाद्या कट्ट्यावर मनमुराद दंगा करावा, फुल-टू धमाल करावी.

इथे एकांती निरुत्साही सांजेला परदेशात हरवलेल्या आपल्या चिमण्यांची आठवण येते. मन उदास होते. गदिमांचे गीत मनात रुंजी घालू लागते – “या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे अपुल्या..”

सुधीर कुलकर्णी

# धिनक धिन धा

अस्सावा सुंदर
चॉकलेटचा बंगला
टप टप पडती अंगावरती...

ॐ नमोजी आद्या...
अगं ग ग ग ग...
विंचू चावला...
गाणी...

मेडले...

पिकल्या पानाचा... लावणी...

बॅन्ड बाजा वरात घोडा...

गल्यान साखली सोन्याची...

निवेदक

महाराष्ट्र मंडळ शिकागो ढोल ताशा पथक

पोवाडा
लल्लाटी भंडार... जागर...
जयोस्तुते...

सहभागी कलाकार
कार्यकारिणी

# मूगलेट

साहित्य:-

- एक कप मूगडाळ
- एक लहान कांदा
- एक लहान टोमॅटो
- एक लहान सिमला मिरची
- एक दोन हिरव्या मिरच्या
- तीन चार लसूण पाकळ्या
- अर्धी वाटी कणसाचे दाणे
- अर्धी वाटी किसलेले बीट
- दोन टीस्पून तीळ
- थोडीशी कोथिंबीर
- अर्धा इंच आलं
- पाव चमचा हळद
- दोन मोठे चमचे तांदळाचे पीठ
- अर्धा चमचा जिरे
- दोन-तीन मोठे चमचे तेल
- अर्धा चमचा इनो
- चाट मसाला
- टोमॅटो केचप
- चवीप्रमाणे मीठ

कृती:-

मूग डाळ एक दोन तास भिजत ठेवावी. पाणी निथळून घ्यावे. मिक्सरच्या भांड्यामध्ये डाळ, लसूण, आलं घालून बारीक पेस्ट करणे. नंतर कांदा, टोमॅटो, हिरवी मिरची सर्व बारीक चिरून घ्यावेत. एका बाऊलमध्ये पेस्ट काढून घेणे. त्यात चिरलेले सर्व साहित्य तांदळाचे पीठ, हळद, जिरे, मीठ घालून चांगले मिक्स करून घ्यावे. गॅसवर पॅन गरम करत ठेवावा. पॅनमध्ये दोन टेबल स्पून तेल पसरून घ्यावे. गॅस मध्यम आचेवर ठेवावा. चमच्यात अर्धा चमचा इनो घेऊन त्यावर किंचित पाणी घालावे. फसफसल्यानंतर पिठात घालून चांगले हलवून घ्यावे. लगेच पीठ पॅनवर पसरवून घ्यावे. वरून कोथिंबीर घालून झाकण ठेवून दोन मिनिटे शिजवून घ्यावे. उलटवून दुसरी बाजू शिजवून घेणे. परत उलटवून घेणे. मध्यापासून सुरीने कट करून त्याला कोनाचा शेप देणे.

कोनाच्या आकाराचे मूगलेट करून घ्यावे त्यात सजावटीसाठी उकडलेली सिमला मिरची, त्यानंतर किसलेले बीट व त्यावर उकडलेले कणसाचे दाणे टाकावेत. वरून कोथिंबीर टाकून सजावट करावी आणि त्यावर तीळही टाकावेत.

वरून चाट मसालाही टाकू शकतो. असे मस्त मूगलेट केचप किंवा चटणी बरोबर खावेत.

दिपाली सावंत

# मुद्दा भाजी

नमस्कार मंडळी! भाज्या तर आपण खूप प्रकारच्या करतो, पण खूप प्रथिनांनीं भरलेली, चवीला मस्त आणि पटकन होणारी, ही मुद्दा भाजी, काही वेगळीच. ही पाककृती मला शिकवल्याबद्दल माझी मैत्रीण, अर्चना साखरे, हिचे खूप आभार.

साहित्य:-

- १/२ कप  मूग डाळ
- १/२ कप तूर डाळ
- १/२ च. हिंग
- १ च. जिरं
- १ च. हळद
- १/२ च. मीठ
- २-३ मोठे च. गूळ
- २ कप पालक
- ४-५ मोठ्या लसूण पाकळ्या (ठेचून)
- १ मोठा च. तेल
- १/२ कप चिंच-गूळ पाणी
- २ च. मोहरी
- १ च. तिखट
- १/२ कप भाजलेले शेंगदाणे
- २ कप गरम उकळलेले पाणी

कृती:-

1. डाळ १/२ पाण्यात भिजत घालावी.

2. २ वाट्या पाणी घालून, १/२ च. हिंग, १ च. जिरं, १ च. हळद, १/२ च. मीठ, २-३ मोठे च. गूळ घालून कुकरमध्ये शिजवून घ्यावी.
3. पालक धुवून, चिरून घ्यावा.
4. भांड्यात तेल घालून, पालक परतवून घ्यावा.
5. नंतर त्यात शिजवलेली डाळ घालावी. १/२ कप चिंच-गूळ पाणी घालावे.
6. सगळं मिक्स करून घ्यावं. मंद गॅसवर ठेवावे.
7. फोडणीसाठी २ मोठे तेल कढल्यात घेऊन, त्यात २ tsp मोहरी घालून, ठेचलेली लसूण घालावी. नंतर त्यात मीठ आणि १ tsp तिखट घालावे, नंतर १/२ कप भाजलेले शेंगदाणे घालावे.
8. सर्व फोडणी एकत्र करून, भाजीत घालावी.
9. नंतर ५ मिनिटे गॅसवर ठेवावी.

ही मुद्दा भाजी गरमागरम तूप भाताबरोबर झकास लागते. नक्की करून बघा आणि तुमच्या प्रतिक्रिया कळवा.

काही प्रश्न असतील तर मला ratnangimmc@gmail.com या संकेतस्थळावर ई-मेल पाठवा.

रत्नांगी निलेश मालपेकर

# Staying Healthy in winter with Ayurveda

This article explores Ayurveda's recommendations for staying healthy and happy during winter.

Ayurveda identifies winter as a Kapha season with strong hints of Vata. The winter season is characterized by cold, moist, and heavy weather with many cloud-covered days. Everything appears to be grounded, slow and no wonder it's the season for many animals to go into hibernation. These qualities belong to the Kapha Dosha, which is why winter is primarily a Kapha season.

However, if the climate in winter gets exceptionally cold and dry where you live, or if you tend to feel more isolated during the winter months, then Vata will also be a strong component of your winter season, and you will want to consciously keep Vata pacified as well.

**Ayurvedic Daily Routine (Dinacharya) for winter**

- Instill a short energizing morning routine to nourish your body and mind such as scraping your tongue, followed by oil pulling and brushing teeth.
- Start your morning with a glass of warm water, or green tea or Cumin Coriander Fennel aka CCF tea to stimulate your digestive system
- Treat your body with a warm oil massage (abhyanga) using an herb infused sesame oil
- The best exercise to shake off sluggishness is light yoga. Incorporate Sukshma kriyas to release accumulated Vata from the joints.

## Ayurvedic Skin care during winter

- Daily oil massage (Abhyanga) is highly recommended, as it keeps skin moist, muscles soft and joints lubricated. Abhyanga is the best Vata pacifying self-care ritual.
- Limit the use of soap and hot water. Hot water and soaps strip away natural oil from our skin. Therefore, a quick shower with not so hot water is advisable in winter. Limit the use of soap only to those areas that get dirty. A paste of besan and water is a great alternative to soap.
- Massage your scalp using warm sesame oil.
- Use Ayurvedic oils, such as kumkumadi oil as a moisturizer for your face. Avoid frequent face washing.
- A nightly foot massage is a must during winter. Use warm sesame oil for extra pampering. The process is Vata pacifying and promotes sleep.
- Applying ghee to your lips before bedtime will keep them moist and soft.

## Ayurvedic Diet during winter

In winter, a Vata-pacifying diet of grounding foods can help keep the digestive fire functioning at its best. Care must be taken not to aggravate Kapha by ingesting heavy foods.

- Warm soups, stews, and chilies are the perfect food for this time of year. Soft Khichdee with vegetables and ghee is an ideal meal during winter.
- Well-cooked vegetables and hearty grains keep Vata Dosha balanced without aggravating Kapha Dosha.

- Warm milk, and a variety of cheeses are well tolerated during winter. Dairy is great for Vata as it is heavy and has an oily quality but use caution as dairy can be too cooling and heavy for Kapha.
- Incorporate homemade ghee prepared from cultured organic butter daily. It keeps the body and mind unctuous.
- Incorporate Turmeric into your diet. This versatile spice is both Vata and Kapha balancing. A warm cup of milk with ½ tsp Turmeric before bedtime is a perfect winter drink.

**Mind care during Winter**

Cold temperatures, gray skies, and short days often trigger seasonal depression for many individuals. Recognizing and managing it is the key.

- Get regular exercise. If outdoor exercise such as walking is not possible then find ways to exercise indoors. At home, or at the gym.
- Whenever possible, get together with family and friends. Potlucks, board games, and breakfast clubs are the perfect ways to stay connected during winter.
- Regular practice of Pranayama and Meditation uplifts the mind and enhances our mood. Incorporating these practices in daily routine helps fight seasonal mental disorders for sure.

Take care this winter! Stay warm and stay healthy!

Kalpana Nimkar

# देव याहुनी काय वेगळा?

बीजामधुनी उगवे अंकुर
लाजत मुरकुत ये भूमीवर
मृदू मुलायम हरित कोवळा
देव याहुनी काय वेगळा?

विस्मित बालक मुठीमुठीने
उधळी सोनेरी पानें
आनंदाचा स्वर्ण सोहळा
देव याहुनी काय वेगळा?

विविध रंगे नटले अंबर
गंध मनोहर फुलें भुईवर
ज्याच्या हाती जादू कुंचला
तोच देव मम भासे मजला

चंद्र तारका सूर्य अंबरी
मनें मारती उंच भरारी
हृद्स्पंदन जो देई मजला
आणि चैतन्य सर्वस्वाला
तोच नव्हे का देव आपुला?

बालक, अंकुर, धरती, अंबर
सर्वांमध्ये एक दिगंबर
सातत्याने तो अनुभवला
अनंत नमनें परमात्म्याला!

मंदा नाडकर्णी

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१

*॥ इतिहासमंच ॥*

प्रस्तुत करत आहे

# सम्राट कृष्णदेवराय - भाग २

## व्याख्यान: डॉ. अस्मिता हवालदार

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर,

शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले

वेळ: शुक्रवार, १० डिसेंबर २०२१

रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

BOOST YOUR ENERGY SECRET IS WITHIN YOU

**WHAT WE WILL LEARN TODAY**

- Make you aware of your Body and its "Balance"
- How to activate the most important balance system in your body
- How to align your spine and experience its benefits
- How to align your body through simple exercises
- How to activate your inactive muscles to balance your joints

Maharashtra Mandal Chicago 2021 Parampara team presents " Secret of Boosting Your Energy" Importance of Body Alignment and Balance seminar by American Board Certified Dr. Vinaya Chitale Chakradeo on Sunday, December 12 from 9-10.30am (CST) Watch us on youtube

https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago



महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१

*॥ इतिहासमंच ॥*

प्रस्तुत करत आहे

# काश्मीर प्रश्न

## व्याख्यान: श्री. नितीन आपटे

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर, शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले

वेळ: शुक्रवार, १७ डिसेंबर २०२१

रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

**Maharashtra Mandal Chicago 2021**

MMC 2021 Dance Team
Dhipadi Dhipang Presents
Tribute to the Legend : Pt. Birju Maharaj
Saturday, December 18th @ 6.00pm CST
Watch us on YouTube :
https://youtube.com/c/
MaharashtraMandalChicago

**महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१, साहित्यकट्टा सहर्ष सादर करत आहे बोलका कट्टा.**

**व्याख्याते: ८८व्याअखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, लेखक,विचारवंत, तत्त्वज्ञ डॉ. सदानंद मोरे**

**विषय :- 'मराठी भाषा आणि ज्ञानेश्वर'**

**वेळ: रवि. दि. १९ डिसेंबर, स. ९ वा. ( शिकागो वेळेनुसार) रा. ८.३० वा. भारतीय वेळेनुसार)**

https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

# शब्दकोडे – उत्तर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वि | चा | २ र | वं | ३ त | | ४ नि | व | ५ ड | णू | ६ क |
| ष | | वा | | ल | | य | | ब | | पि |
| ७ म | वा | ळ | | ८ म | ९ ल | म | | १० र | म | ल |
| भा | | | | | क | | | | | दे |
| ११ व | न्हा | १२ ड | | १३ ज | ब | १४ र | | १५ आ | जी | व |
| | | १६ म | न | न | | १७ पे | श | वा | | |
| १८ वा | स | रू | | १९ ता | २० प | ट | | २१ र | का | २२ ना |
| जं | | | | | क्ष | | | | | त |
| २३ त्री | द | २४ ल | | २५ बा | स | २६ न | | २७ व | ण | वा |
| वा | | के | | व | | गा | | ल | | ई |
| २८ ले | कु | र | वा | ळा | | २९ रा | सा | य | नि | क |

# दैनंदिन मराठी शब्दप्रयोग कोडे – उत्तर

प्राथमिक

| | |
|---|---|
| १. खुद्द | = प्रत्यक्ष |
| २. देखावा | = प्रदर्शन |
| ३. उघड, दृष्य | = प्रकट |
| ४. खूण, चिन्ह | = प्रतीक |
| ५. वंदन | = प्रणाम |

प्रबोध

| | |
|---|---|
| १. उत्तर | = प्रतिवाद |
| २. स्वानुभव | = प्रचीती |
| ३. फसवणूक | = प्रतारणा |
| ४. तेजस्वी, चेतावलेला | = प्रज्वलित, प्रदीप्त |
| ५. उपोदघात | = प्रस्तावना |

प्रगल्भ

| | |
|---|---|
| १. अवरोध | = प्रतिष्टम्भ |
| २. संध्याकाळ | = प्रदोष |
| ३. शुद्ध करणे | = प्रक्षालन |
| ४. खात्री, अनुभव | = प्रतीती |
| ५. विखुरलेले | = प्रक्षिप्त |

# रहे ना रहे हम

गेल्या काही महिन्यात आपल्याला सोडून गेलेल्या
विविध क्षेत्रातील दिग्गजांना श्रद्धांजली!

द.मा. मिरासदार (ज्येष्ठ मराठी साहित्यिक)
स. प्र. निंबाळकर (ज्येष्ठ योग् गुरु)
अरविंद त्रिवेदी (ज्येष्ठ अभिनेते, रामायण सीरिअलमधील रावण)
लीलाधर सावंत (ज्येष्ठ कला दिग्दर्शक)
घनश्याम नायक (टेलिव्हिजन अभिनेते)
पुनीत राजकुमार (तरुण कन्नड अभिनेता)
पं. प्रभाकर जोग (ज्येष्ठ संगीतकार, व्हायोलिन वादक)
गुरुनाथ नाईक (ज्येष्ठ थरारकथा लेखक)
शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे (ज्येष्ठ इतिहासकार, महाराष्ट्र भूषण, पद्मविभूषण, साहित्यिक)
माधवी गोगटे (मराठी हिंदी अभिनेत्री)



# HELP YOUR BUSINESS SUCCEED!

Naperville Learning Center

## AUTOMATE YOUR WORK

Performing repetitive tasks in Excel?
We can help your organization automate these tasks so you can save time and perform more productive work.

Contact us for a free quote!

*What do we do?*

- Automate: weekly reports generation, download data, rearrange and clean data, and update your pivot tables
- Create data entry forms for your worksheet with validation, lookup capabilities, search facilities, and navigation (first, previous, next, last) to speed up tasks
- Bring data from external sources like databases, Facebook, web pages, etc
- Analyze your business data in Excel and/or databases and generate dashboards

## GET NOTICED ON DIGITAL PLATFORMS

This is the digital marketing age. It is essential to get more traffic on your website. We can help your company build your presence on various digital platforms like Google, Bing, Youtube, Facebook, Twitter, etc.

*What do we do?*

- Build professional website for your business.
- Conduct a comprehensive SEO audit for existing websites and give recommendations.
- Develop 9 steps Digital Marketing Strategy
- Campaign execution and analytics

NAPERVILLE LEARNING CENTER

## CONTACT INFORMATION:

EMAIL: INFO@NLCUS.NET
PHONE NUMBER: +1 (510)-648-0060

PICCONY & PATANKAR P.C.
ATTORNEYS AT LAW
WITH OUR BEST COMPLIMENTS FROM PICCONY & PATANKAR, P.C.
AREAS OF PRACTICE
Estate Planning
Taxation
Real Estate Buy and Sale
Family Law
Business Formation
Personal Injury
Traffic Law
Piccony & Patankar, P.C.
1700 North Farnsworth Avenue, Suite 28, Aurora, IL 60505
Phone: 630-820-8877
www.picconypatankar.com

SAVE BIG$$$
PMSInc
Great Rates & No Closing cost Options
Wide variety of mortgage products with great service and support
1
Compare wholesale mortgage rates from multiple banks and lenders
2
No monthly M.I. Mortgage options upto 95% loan to value
3
Get more loan options. We work with multiple banks and lenders.
FREE Consultation
Knowledgeable and Responsive
Ashok Lakshmanan
Mortgage Broker
NMLS#238977
Professional Mortgage Solutions, Inc.
(An Illinois Residential Mortgage Licensee)
NMLS#237990
630.205.8676
1776 Legacy Circle, Ste#107 • Naperville, IL 60563 • Off: 630.717.3600 • Fax: 630.717.3601